# महाराष्ट्राचे शिल्पकार शंकरराव चव्हाण



डॉ. सुरेश सावंत

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# महाराष्ट्राचे शिल्पकार
# शंकरराव चव्हाण

**डॉ. सुरेश सावंत**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती : जुलै २००६
महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. २८

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुबंई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
प्रमोद भोगटे,
स्नेहेश प्रिंटर्स,
३२० - ए, शाह अँड नाहर इंड. इस्टेट अ-१,
धनराज मिल आवार, सीताराम जाधव मार्ग,
लोअर परळ, मुंबई-१३. (दूरध्वनी : २४९४ ५६१५)

मुखपृष्ठ : राजा बडसल, पुणे

किंमत : रू. ४५/-किंमत : रू. ४५/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

कै. शंकररावजी चव्हाण यांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये फार मोठे योगदान होते. खरेतर त्यांचा कार्यकाल महाराष्ट्र राज्य स्थापन होण्यापूर्वीच सुरू झालेला होता. मराठवाड्याच्या निझामी राजवटीतून मुक्त होण्यासाठी त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली मोठा संघर्ष केला. नंतर निझामाचे राज्य संपुष्टात आल्यावर आणि मराठवाडा महाराष्ट्रात सामील झाल्यानंतर महाराष्ट्राची त्यांनी विविधपरीने सेवा केली. १९६० साली महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली आणि त्यांचे राजकारभारामध्ये प्रत्यक्ष कार्य सुरू झाले. त्यानंतर महाराष्ट्राचे दोन वेळा मुख्यमंत्री, भारताचे शिक्षणमंत्री, अर्थमंत्री, नियोजनमंत्री, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, संरक्षणमंत्री, गृहमंत्री आदि अत्युच्च पदावरून त्यांनी जे महात्त्वाचे कार्य पार पाडले त्याला तुलना नाही. या सर्व पदांवर काम करीत असताना त्यांनी आपली जन्मभूमी मराठवाडा व कर्मभूमी महाराष्ट्र यांना कधीही नजरे आड केले नाही. महाराष्ट्राच्या राजकारणावर आणि प्रशासनावर त्यांची बळकट पकड होती. ते कठोर प्रशासक होते आणि त्यांना अशी एक थोर दृष्टी उपजतच लाभली होती की त्यामुळे ते समग्र महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने विचार करू शकत होते. त्याचवेळी राष्ट्र उभारणीच्या कार्याचेही त्यांना सम्यक भान होते. त्यामुळे महाराष्ट्रात विविध पदावर काम करताना त्यांनी जसे महाराष्ट्राचे हितसंबंध जोपासले

तसेच राष्ट्रीय पातळीवर विविध पदे सांभाळताना एकूणच हिंदुस्तानच्या जडणघडणीचा व विकासाचा विचार केला.

शंकररावजींनी जी विविध खाती सांभाळली त्यामध्ये त्यांच्या विशेष आवडीचे खाते होते ते जल व्यवस्थापनाचे. पाणी व त्याचे नियोजन या विषयी त्यांना विशेष आस्था होती व त्याबाबतीत त्यांचा सखोल अभ्यास होता. या पुस्तकामध्ये डॉ. सुरेश सावंत लिहितात त्याप्रमाणे शंकररावजी चव्हाण हे महाराष्ट्राच्या जलसंस्कृतीचे जनक होते. मराठवाड्यातील त्यांच्या संकल्पनेतून निर्माण झालेले जायकवाडी आणि विष्णुपुरी हे जलप्रकल्प केवळ भारतातीलच नव्हे तर अशिया खंडातील भव्य व हजारो हेक्टर्सनी पिण्यासाठी व पिकासाठी पाणी पुरविणारे जलप्रकल्प आहेत. मराठवाड्याच्या एरवी सुपीक परंतु पाण्याविना नापीक राहिलेल्या प्रचंड भूभागाचे नंदनवन कसे होईल याचे सुंदर स्वप्न शंकररावजींच्या प्रतिभेने पाहिले आणि जायकवाडी आणि विष्णुपुरी या दोन महान जलप्रकल्पांची निर्मिती त्यांनी अतिशय पद्धतशीरपणे केली. परंतु या दोन प्रकल्पांपुरतेच त्यांचे कर्तृत्व मर्यादित नव्हते. महाराष्ट्राच्या एकूणच जलसंपदेचा विनियोग राज्याला कसा उपयुक्त होऊ शकेल, याबद्दलच्या त्यांच्या व्यापक संकल्पना होत्या व त्यानुसार त्यांनी प्रशासनामध्ये यथोचित परिवर्तन घडवून आणण्याचा प्राणाणिक प्रयत्न केला. एकाचवेळी प्रगल्भ राजकारणी, द्रष्टा समाजकारणी, अथक काम करणारा कार्यकर्ता, पाटबंधारे व जलनीती तज्ज्ञ व लोकनेता अशा विविध पातळ्यांवर शंकररावजींच्या कार्याचे मोजमाप करता येते. त्यांच्या रूपाने महाराष्ट्राला व

देशाला एक थोर द्रष्टा लोक नेता (visionary) लाभला होता.

'महाराष्ट्राचे शिल्पकार' या ग्रंथमालेमध्ये अशा थोर लोकनेत्याच्या चरित्राचा अंर्तभाव व्हावा असे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष प्रा. रा. रं. बोराडे यांना वाटले आणि त्यांनी त्याप्रमाणे योजनाही केली. त्यानुसार डॉ. सुरेश सावंत यांची संकल्पित चरित्राचे लेखक म्हणून नियुक्ती झाली. डॉ. सुरेश सावंत यांना शंकररावजींचा जवळचा सहवास लाभला होता व त्यांचे व्यक्तित्व व कर्तृव जवळून पाहण्याचा अनुभव त्यांना आलेला होता. त्यामुळेच त्यांच्यासारखा दुसरा लेखक शंकररावजींचे चरित्र लिहिण्यासाठी मिळणार नाही हे मंडळाचे मत सर्वार्थाने खरे ठरले. डॉ. सुरेश सावंत यांनी परिश्रमपूर्वक शंकररावजींचे चरित्र अल्पावधीत लिहून मंडळाला दिले. हे चरित्र प्रकाशित करताना मंडळाला विशेष आनंद होत आहे.

**(मधु मंगेश कर्णिक)**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुंबई
दिनांक : १४ जुलै, २००६

# लेखकाचे मनोगत

मा. ना. श्री. शंकरराव चव्हाण हे महाराष्ट्राच्या जलसंस्कृतीचे जनक होते, महाराष्ट्राचे शिल्पकार होते. महाराष्ट्राचे दोन वेळा मुख्यमंत्री, भारताचे शिक्षणमंत्री, अर्थमंत्री, नियोजनमंत्री, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, संरक्षणमंत्री, भारताचे गृहमंत्री इ. पदांवरून त्यांनी जे लोकभिमुख रचनात्मक कार्य केले, ते इतिहासात अविस्मरणीय आहे. १९७८ साली जेव्हा उमरी येथे ना. चव्हाण साहेबांशी आमची पहिली भेट झाली, त्यावेळी आम्ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने अतिशय प्रभावित झालो. पुढे २००४ पर्यंत अधूनमधून ना. चव्हाण साहेबांच्या भेटीचा योग येत गेला आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या एकेका उज्ज्वल पैलूचे दर्शन होत गेले. या आधुनिक भगिरथाचा आम्हाला काही काळ सहवास लाभला, हे आम्ही आमचे परमभाग्य समजतो. शंकरराव चव्हाण हा केवळ दर्शनाचा विषय नसून तो सखोल अभ्यासाचा व संशोधनाचा विषय आहे, हे सारखे जाणवत असे.

दि. २६ फेब्रुवारी २००४ रोजी ना. शंकररावजी चव्हाण यांचे निधन झाले. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष प्राचार्य रा. रं. बोराडे यांनी ‘महाराष्ट्रचे शिल्पकार’ या मालिकेसाठी ना. शंकरराव चव्हाण यांचे चरित्र लिहिण्याची सूचना केली. असे असले तरी या चरित्रलेखनामागची खरी प्रेरणा कविवर्य प्रा. फ. मुं. शिंदे यांची आहे. त्यांच्या प्रेमळ पाठपुराव्यामुळेच हे

चरित्रलेखन सिद्धीस गेले. प्रा. फ. मुं. शिंदे यांनी या चरित्रलेखनाची पाठराखण केली. त्यांचे ऋण शब्दातीत आहे.

प्रस्तुत चरित्रलेखनात ज्या ग्रंथांचा, विशेषांकांचा व नियतकालिकांचा आधार घेण्यात आला, त्या सर्वांची कृतज्ञतापूर्वक नोंद संदर्भसूचीमध्ये घेतली आहे. चरित्राची मुद्रणप्रत तयार करण्यासाठी अक्षर मुद्रणालयाचे मालक आमचे स्नेही श्री आनंद कल्याणकर आणि संगणकचालक श्री परशुराम वेणीकर यांनी जी तत्परता दाखविली, त्याबद्दल 'अक्षर' परिवाराचे ऋण व्यक्त करतो.

चरित्रलेखनात काही त्रुटी राहू नयेत, ते अधिकाधिक निर्दोष व अद्ययावत व्हावे, यासाठी चरित्राच्या पाच प्रती तयार करून मा. शंकररावजी चव्हाण यांच्याशी संबंधित मान्यवरांना देण्यात आल्या. त्यापैकी डॉ. जे. जी. वाडेकर, डॉ. सौ. तेजस्विनी वाडेकर, प्रा. भु. द. वाडीकर, प्राचार्य दत्तात्रेय धनपलवार, प्राचार्य गोविंदराव थेटे आणि माझी पत्नी प्रा. डॉ. सौ. मथु यांनी अतिशय आस्थेने व काळजीपूर्वक चरित्राचे वाचन करून काही मौलिक सूचना केल्या. शारदा भवन शिक्षण संस्थेचे सचिव श्री डी. पी. सावंत, जलतज्ज्ञ श्री द. मा. रेड्डी आणइ प्रा. उत्तमराव सूर्यवंशी यांच्याशी वेळोवेळी झालेल्या चर्चा अतिशय उपयुक्त ठरल्या. त्यामुळे हे चरित्र अधिक निर्दोष, वस्तुनिष्ठ, सर्वस्पर्शी आणि वाचनीय होऊ शकले, याबद्दल या मान्यवरांचे मनःपूर्वक आभार.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष आदरणीय श्री मधु मंगेश कर्णिक आणि प्रभारी सचिव श्री उ. बा. सूर्यवंशी यांनी अत्यांत कमी वेळात तरीही आकर्षक स्वरूपात हे चरित्र प्रकाशित केले, त्याबद्दल या उभयतांचे तसेच मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांचे ऋण व्यक्त करून या मनोगताला पूर्णविराम देतो.

**डॉ. सुरेख सावंत**

'मथुरेश', शाहूनगर, नांदेड.

१९६३ चा नोव्हेंबर महिना श्री. एस. व्ही. लकडे हे औरंगाबाद जिल्ह्यातील अप्पर दुधना या प्रकल्पाच्या बांधकामावर उपअभियंता म्हणून काम पाहात होते. त्या दिवशी त्या प्रकल्पाचे काम पाहण्यासाठी मंत्री महोदय येणार होते. त्यादृष्टीने प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता व उपअभियंता हे एक आठवडा आधीपासून तयारी करीत होते. उपअभियंता आपणच तयार केलेल्या टिपणीचे दिवसातून तीन-चार वेळा वाचन करीत होते. जणूत्यांना त्या विषयावर एखादी परीक्षाच द्यायची होती आणि ते काही अंशी खरेही होते. कारण प्रकल्पाला भेट देणारे मंत्री महोदय हे महाराष्ट्राचे पाटबंधारेमंत्री होते. ते कोणत्या वेळी कोणता प्रश्न विचारतील याचा काही नेम नव्हता. प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रापासून ते धरणाच्या विविध पातळ्या, त्यांचे वेगवेगळे डिझाईन्स, धरणाची संचयक्षमता, धरणामुळे निर्माण होणारी सिंचनक्षमता या संदर्भात केव्हा कोणता प्रश्न कसा विचारला जाईल हे सांगता येत नव्हते. त्यामुळे त्यांनी तशी तयारी करणे स्वाभाविकच होते.

त्याकाळी सबंध मराठवाड्यासाठी पाटबंधारे विभागाची फक्त दोनच मंडल कार्यालये होती. एका कार्यालयाकडे पूर्णा आणि मन्याड या मोठ्या धरणांचे बांधकाम होते तर दुसऱ्या मंडल कार्यालयाकडे सर्व मध्यम व लघू पाटबंधारे प्रकल्पांची कामे होती. या मंडळाचे अधीक्षक

अभियंता हे एक अत्यंत कडक स्वभावाचे आणि शिस्तप्रिय असे इंजिनीअर होते. त्यांच्या सहकाऱ्याच्या हातून जर काही चूक झाली तर ते त्याची मुळीच गय करीत नसत. सहकाऱ्याला पाठीशी घालून त्याला संरक्षण देणे त्यांच्या स्वभावातच नव्हते. त्यांच्या सहकाऱ्यांना साहेबांच्या या स्वभावाची सारखी भीती वाटत असे. अनेकांना त्यांच्या समोर जायचे म्हणजे धर्मसंकट वाटत असे. हे अधीक्षक अभियंता महाशय मंत्री महोदयांबरोबर दौऱ्यात होते. ते आपल्याशी एखाद्या परीक्षकासारखेच वागणार याची खात्री असल्यामुळे उपअभियंता अक्षरशः परीक्षेला निघालेल्या एखाद्या विद्यार्थ्यासारखे सगळी तयारी करीत होते. त्यामुळे धरणावर काम करणाऱ्या अभियंत्यांची शब्दशः झोप उडाली होती.

अखेर मंत्री महोदयांच्या भेटीचा दिवस उजाडला. मंत्री महोदयांचे धरणस्थळावर आगमन झाले.

धरणाचे मातीकाम एका मोठ्या ठेकेदाराकडे होते. त्यांच्याकडे स्क्रेपर्स, टिप्पर्स, ट्रॅक्सकॅव्हेटर्स इ. सगळी आधुनिक यंत्रसामुग्री होती. अन् तिच्या सहाय्याने धरणाचे काम वेगाने चालले होते. मंत्री महोदय धरणाची पाहणी करणार म्हणून जागोजागी धरणाची विशिष्ट ठिकाणी व पातळ्या आणि दिशा दर्शविणारे रंगीबेरंगी झेंडे लावले होते. प्रत्येकजण नीटनेटका पोशखा करून, आपापल्या कामांची माहिती सोबत घेऊन, धरणावर ठरवून दिलेल्या जागी शिस्तीत उभा होता. एकदाचे मंत्री महोदयांचे आगमन झाले. मंत्री महोदयांकडून धरणची पाहणी सुरू झाली. मंत्री

महोदयांसोबतचा गाड्यांचा ताफा धरणाच्या खालच्या बाजूस थांबविण्यात आला. मंत्री महोदय चालू लागले. त्यामुळे सर्व जण पायीच निघाले. धरण्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत फिरून झाले. मंत्री महोदय आणि अधिकारी यांच्यात काही प्रश्नोत्तरे झाली आणि मंत्री महोदयांचा परतीचा प्रवास सुरू झाला.

धरणावर काम करणाऱ्या उपअभियंत्याचा जीव भांड्यात पडला. त्यांनी सुटकेचा निःश्वास टाकला. परंतु त्यांचा तो आनंद फार काळ टिकला नाही. मंत्री महोदय एकदम एका ठिकाणी थांबले. त्यांनी इकडे-तिकडे पाहिले आणि अधिक्षक अभियंत्यांना जवळ बोलावून प्रश्न विचारला,

“या ठिकाणी धरणाच्या पाळूच्या संपूर्ण रुंदिमध्ये मुरुमच दिसतो. काळी माती दिसत नाही. हे कसे काय?”

अधिक्षक अभियंत्यांनी स्वतः उत्तर देण्याऐवजी उत्तरीच्या अपक्षेने उपअभियंत्याकडे पाहिले. त्या प्रश्नाच्या अचानक आक्रमणाने उपअभियंता फारच गडबडून गेले. कारण त्यांनी त्या प्रश्नाचा मनाशी सराव केलेला नव्हता त्यांच्यासाठी तो त्या परीक्षेत आलेला अनपेक्षित प्रश्न होता. उत्तरासाठी चाललेली त्यांची धडपड, तशात अधीक्षक अभियंत्यांची रोखलेली करडी व कोरडी नजर त्यामुळे उपअभियंत्याला अक्षरशः घामच फुटला.

“अहो महाशय, सांगा हे कसे काय ते?” अधीक्षक अभियंत्यांचा उपअभियंत्याला खडा सवाल.

उपअभियंता आणखी गोंधळून गेले. वास्तविक अशा कसोटीच्यावेळी वरिष्ठ अधिकऱ्यांनी आवश्यक ते स्पष्टीकरण

देऊन खालच्या अधिकाऱ्याला सांभाळून घ्यायचे असते व आलेला प्रसंग मारून न्यायचा असतो. शासकीय दौऱ्यात हे असे नेहमी चालतच असते. परंतु अधीक्षक अभियंता तशा स्वभावाचे नव्हते. त्यांनी नेमक्या उत्तरासाठी उपभियंत्यांनाच धारेवर धरले. अखेर उपअभियंत्यांनी गोंधळून जाऊन कसेबसे उत्तर दिले, "याठिकाणी गाभ्याची पातळी (Hearting) संपलेली असून त्यावर पूर्ण रूंदीमध्ये मुरूम टाकण्याचे काम चालू आहे."

हे उत्तर ऐकूण अधीक्षक अभियंता गप्प राहिले. परंतु त्या उत्तराने मंत्री महोदयांचे समाधान झालेले दिसले नाही. धरणाची बारकाईने पाहणी करत त्यांनी अधीक्षक अभियंत्यांना सुचविले, "तुम्ही स्वतः धरणाच्या लेवेहल्स घ्या आणि मी येथून निघण्यापूर्वी उपअभियंत्यांनी दिलेले उत्तर बरोबर आहे का, ते मला सांगा."

धरणाची पाहणी पूर्ण झाली. मंत्री महोदय विश्रामगृहावर निघून गेले. परंतु इकडे सगळ्यांचीच अस्वस्थता वाढली होती. मंत्री महोदयांना विश्रामगृहावर सोडून अधीक्षक अभियंता पुन्हा धरणावर आले स्वतः लेव्हल्स घेतल्या आणि मंत्री महोदयांची शंका खरी ठरली; कारण उपअभियंत्यांनी दाखविलेल्या ठिकाणी अजून धरणाच्या गाभ्याची पातळी आलेली नव्हती आणि मध्यभागी काळ्या मातीचा थर अजून दोन मीटर उंचीपर्यंत असणे आवश्यक होते. परंतु काळ्या मातीचा भाग निसरडा होता व गाड्या घसरण्याची भीती असते म्हणून तात्पुरते यंत्रसामुग्री व वाहनांच्या येण्या-जाण्यासाठी तेथे मुरुमाचे आच्छादन

केले होते. ते काही नवीन नव्हते. तसे नेहमीच केले जाते आणि पुन्हा त्या ठिकाणी वरचे मातीकाम करावयाचे असते तेव्हा तो मुरूनीचा थर काढून टाकून आवश्यक तेवढ्या भागात काळ्या मातीचा थर दिला जातो. त्यात वावगे काहीच नव्हते आणि तसे स्पष्टीकरण उपअभियंत्याने दिले असते तर कदाचित मंत्री महोदयांचे समाधानही झाले असते. परंतु गोंधळून जाऊन वेळ मारून नेण्यासाठी उपअभियंत्यांनी चुकीचे उत्तर दिले होते. कुणी ऐरागैरा मंत्री असता तर कदाचित ते खपूनही गेले असते. परंतु आजच्या मंत्री महोदयांच्या चाणाक्ष नजरेतून ती  तांत्रिक चूक सुटू शकली नाही. कारण ते कुणी साधेसुधे मंत्री नाव्हते. तर ते अत्यंत अभ्यासू व भल्या-भल्या इंजिनीअरर्सना लाजवील अशी तांत्रिक माहिती असलेले महाराष्ट्राचे पाटबंधारे मंत्री होते, ना. शंकरराव भाऊराव चव्हाण! त्यांच्या अंगभूत चिकित्सक अभ्यासूपणामुळे आणि परिश्रमपूर्वक प्राप्त केलेल्या चौकस स्वभावामुळे त्यांना असा स्वच्छ दृष्टिकोन लाभला होता. सामान्यतः कुणी मंत्री धरणस्थळाला भेट फक्त दोनच वेळा देतात. एक तर प्रकल्पाच्या भूमिपूजनाला किंवा उद्‌घाटन समारंभाला. धरणाचे भूमिपूजन नसताना किंवा उद्धाटन समारंभही नसताना धरणस्थळाला आवर्जून भेट देणारे, अनुभवी इंजिनीअरची दृष्टी लाभलेले, धरणाच्या बांधकामाची गती आणि गुणवत्ता यांचे साधकबाधक परीक्षण करणारे, अभियंत्यांचे अभियंता शोभणारे ना. शंकरराव चव्हाणांसारखे अभ्यासू मंत्री विरळाच !

नांदेडच्या नगराध्यक्षपदापासून दोन वेळा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदापर्यंत आणि भारताच्या गृहमंत्रिपदापर्यंत विविध पदांवर आपल्या कार्यकर्तृत्वाचा व अभ्यासू शैलीचा अमीट ठसा उमटविणाऱ्या शंकरराव चव्हाणांचे चरित्र समकालीन आणि भावी पिढीला उद्बोधक आणि प्रेरणादायी ठरेल असेच आहे .....

## जन्म, बालपण व शिक्षण

शंकरराव चव्हाण यांचा जन्म प्रत्येक प्राणिमात्रात ईश्वराचा अंश पाहणाऱ्या संत एकनाथांच्या पैठणनगरीत दि. १४ जुलै १९२० रोजी झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई असे होते आणि वडिलांचे नाव भाऊराव चव्हाण. भाऊराव चव्हाण हे पैठणच्या जहागिरीत शिक्षण होते. परंतु संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी एकट्याने सांभाळत असताना होणारे आर्थिक ओढाताण सुसह्य करण्यासाठी त्यांनी शिक्षकी पेशाबरोबरच पैठणमध्ये कापडाचा व्यवसाय सुरू केला होता.

भाऊराव चव्हाण आणि लक्ष्मीबाई या दाम्पत्याला एकूण सात अपत्ये झाली. गोपाळराव हे ज्येष्ट पुत्र . त्यानंतर नारायणराव आणि हरिभाऊ. शंकरराव हे चव्हाण दाम्पत्याचे चौथ्या क्रमांकाचे अपत्य. केशवराव हे शंकररावांचे धाकटे बंधू शंकररावांना सुंदराबाई आणि शांताबाई ह्या दोन बहिणी होत्या .

शंकररावांच्या मातोश्री लक्ष्मीबाई ह्या लौकिक अर्थाने अशिक्षित असल्या तरी त्यांची जीवनाविषयीची जाण अतिशय प्रगल्भ होती. प्रेमळ स्वभावाच्या, संयमी वृत्तीच्या आणि कष्टाळू लक्ष्मीबाईंनी बालपणीच शंकररावांवर सुसंस्कार केले.

गोरठा येथील संत दासगणू महाराज यांचा सहवास भाऊराव चव्हाणांना काही काळ लाभला. दासगणू

महाराजांच्या अध्यात्मिक विचारांचा खोल प्रभाव भाऊराव चव्हाणांच्या व्यक्तिमत्त्वावर उमटला होता. त्यामुळे ते एक सरळमार्गी, प्रयत्नांवर अढळ विश्वास ठेवणारे आणि देवावर नितांत श्रद्धा असणारे असे सत्त्वशील गृहस्थ होते. श्रद्धाळू असले तरी त्यांची श्रद्धा डोळस होती. अंगमेहनतीवर नि कष्टावर त्यांचा विश्वास होता. कर्तव्यकठोर आणि शिस्तप्रिय व्यक्तिमत्त्व असा त्यांचा लौकिक होता. त्यांनी नेहमीच पैशापेक्षा माणसाला आणि माणुसकीला आधिक महत्त्व दिले. निजाम राजवटीत उर्दू भाषेचा प्रभाव असतानासुद्धा आणि घरची आर्थिक स्थिती बेताची असतानासुद्धा भाऊरावांनी सातवीची परीक्षा प्रथमश्रेणीत उत्तीर्ण केली होती.

भाऊराव चव्हाण शिक्षणाचे महत्त्व ओळखून होते. परिस्थितीमुळे आपण जरी फारसे शिक्षण घेऊ शकलो नाही तरी आपली मुले उच्च विद्याविभूषित झाली झाली पाहिजेत, असा त्यांचा कटाक्ष होता. त्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. पैसा येतो तसा जातो, त्याची फारशी काळजी करायची नसते. आपला स्वाभिमान महत्त्वाचा कुणाचेही पाच पैसे घेऊन शरमिंदे होऊ नका, ही भाऊरावांची आपल्या मुलांना शिकवण होती. भाऊरावांनी आणि लक्ष्मीबाईंनी आपल्या मुलांवर बालपणापासूनच साधेपणाचे, सचोटीचे आणि शिस्तीचे संस्कार बिंबविले. भाऊराव चव्हाण यांनी जिद्दीने, मेहनतीने, कठोर परिश्रमाने, प्रामाणिकपणाने आणि शिस्तीने नेटका प्रपंच करून गावात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले होते. त्यांच्याविषयी समाजात आदरयुक्त भीती होती.

'बालपणीचा काळ सुखाचा' या उक्तीप्रमाणे शंकररावसुद्धा बालपणी अतिशय खोडकरवृत्तीचे होते. सवंगड्यांना चिडविणे, मुलांसोबत मारामाऱ्या करणे यात ते आघाडीवर होते. अर्थात अभ्यासातसुद्धा त्यांनी आपला पहिला क्रमांक कधी सोडला नाही. बालपणी एक चांगला गायक अशी त्यांची कीर्ती होती. पैठणमध्ये गणपतीउत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असे. गणपतीउत्सवात शंकररावांचे मित्र भगवंतराव देशमुख हे व्याख्याने देत असत; तर शंकरराव राष्ट्रभक्तीपर स्फूर्तिगीते गाऊन समाजात राष्ट्रीय विचारांचे वातावरण निर्माण करीत. या दोन मित्रांच्या कार्यक्रमांना परिसरात चांगली दाद मिळत असे.

सुखाने जाऊ स्वर्गाला
सांगतो कोण तुम्हाला
बोलणे वाटते छोटे
मग हृदय का थरथरा कापे
सुखाने जाऊ स्वर्गाला
सुखाने जाऊ स्वर्गाला

हे शंकररावांचे बालपणीचे अत्यंत आवडते गाणे होते. त्यांच्या ह्या गाण्याला प्रत्येकवेळी सार्वजनिक कार्यक्रमात उत्स्फूर्त दाद मिळत असे. बालसुलभवृत्तीनुसार आपल्या बालमित्रांसोबत गोट्या खेळणे, पतंग उडविणे, विटीदांडू खेळणे तसेच संध्याकाळी गोदावरीच्या पात्रात पसरलेल्या वाळूत हुतूतू आणि सुरपाट्या असे देशी खेळ खेळण्यात यांचे व्यक्तिमत्त्व आकाराला येत होते.

प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनावर कोरले गेलेले संस्कार त्याच्या व्यक्तिमत्त्वात दीर्घकाळ टिकून असतात. सुदैवाने शंकररावांना पैठणच्या शाळेत शिक्षण घेत असताना फार चांगले शिक्षक लाभले. श्री. तुळजापूरकर नावाचे त्यांचे एक शिक्षक होते. ते राष्ट्रीय वृत्तीचे आणि पुरोगामी विचारांचे होते. त्यांच्या राष्ट्रीय विचारांचा गडद ठसा शंकररावांच्या संस्कारक्षम बालमनावर उमटला. वास्तविक तुळजापूरकर यांना त्यांच्या राष्ट्रीय विचारांमुळे आणि विचारानुरूप चळवळीमुळे निजाम सरकारने संस्थानातून हद्दपार केले होते. पैठणपासून जवळच असलेल्या टाकळी या गावी येऊन ते निजाम संस्थानविरोधी जनजागृती करत आणि मुलामाणसांच्या मनात स्वातंत्र्याची बीजे पेरत होते. तुळजापूरकर गुरुजी टाकळी या गावी आल्याचे समजताच शंकरराव आपल्या बालमित्रांना घेऊन तेथे जात. त्यांचे विचार ऐकत. त्यांच्याशी चर्चा करत. एकदा ही बातमी निजामाच्या पोलिसांना समजली. पोलिसांनी भाऊराव चव्हाणांकडे त्याबाबत चौकशी केली. शंकररावांना पुन्हा तुळजापूरकरांशी संपर्क न ठेवण्याची तंबी दिली. तरीसुद्धा शंकररावांनी पोलिसांच्या धमकीला भीक घातली नाही. उलट तुळजापूरकर गुरुजींच्या सहवासात आपल्या राष्ट्रीय विचारांची बैठक अधिकच पक्की केली.

शालेय स्तरावर शिक्षण घेत असताना शंकररावांनी आपल्या उपजत अभ्यासूपणामुळे पैठण गावातील एक हुशार विद्यार्थी म्हणून आपली ओळख निर्माण केली. त्यांना इंग्रजी

विषयाखाठी श्री ललितदास रॉय नावाचे एक उत्तम शिक्षक लाभले. शंकररावांच्या मनात इंग्रजी विषयाची गोडी निर्माण करण्याचे बरेचसे श्रेय श्री ललितदास रॉय यांच्याकडे जाते. पुढे शंकररावांनी इंग्रजी भाषेवर जे लक्षणीय प्रभुत्व संपादन केले त्याची पायाभरणी श्री ललिलदास रॉय यांनी अशाप्रकारे केली.

शंकररावांचे आणखी एक आवडते शिक्षक होते. कमालुद्दीन अहमद हे त्यांचे नाव. आचाराने आणि विचाराने ते एक आदर्श शिक्षक होते. अशा ध्येयवेड्या आणि निष्णात शिक्षकांच्या सान्निध्यात शंकररावांच्या व्यक्तिमत्त्वाचे कोवळे रोपटे विकसित होत होते.

ग्रामीण विद्यार्थ्यांच्या मनात इंग्रजीप्रमाणेच गणित या विषयाबद्दलसुद्धा एक अनामिक भीती निर्माण झालेली असते. परंतु शंकररावांनी या दोन्ही विषयांचा कधी बाऊ केला नाही. उलट ते पाचवीपासून दहावीपर्यंत गणिताच्या परीक्षेत १०० पैकी ९७/९८ गुण मिळवून आपला त्या विषयातील पहिला क्रमांक हमखास कायम ठेवत असत.

बालपणीचा खोडकरपणा हा त्या वयाचाच एक अविभाज्य भागा असतो. त्यावेळी केलेल्या खोड्यांचे कौतुकही होत असते. इतरांच्या नकला करणे हा शंकररावांचा एक आवडता छंद होता. त्यांच्या शाळेतील एक शिक्षक सदैव तपकीर ओढत असत. त्यांच्या तपकीर ओढण्याच्या शैलीची, त्यांच्या चालण्याबोलण्याच्या शैलीची शंकरराव अगदी हुबेहुब नक्कल करीत असत. शंकररावांच्या अशा नक्कलखोर स्वभावाला त्यांचे बालमित्र भगवंत देशमुख,

अच्युतराव जोशी, बाजीराव दहीहंडे, कचरू गेणुजी पगारे, देवीदास गुरव, विश्वनाथ पोहेकर या समवयस्कर मित्रांकडून उदंड दाद मिळत असे. परंतु शंकररावांनी अशा थट्टेखोरपणाचा कधी अतिरेक होऊ दिला नाही. एखाद्या शिक्षकाची ते नक्कल करीत याचा अर्थ असा नव्हे की त्यांच्या मनात शिक्षकांबद्दल आदराची भावना नव्हती. उलट शिक्षकांविषयी आदराची भावना बाळगूनच त्यांचे विद्याध्ययन निष्ठेने चालले होते. शंकररावांची संगीताची व नाटकाची आवड सर्वश्रुत आहे. या आवडीचे बीजारोपणसुद्धा बालपणीच झाल्याचे दिसते. त्यांनी बालपणीच गायन व तबलावादनाची कला आत्मसात केली. गणपती उत्सवाच्या कार्यक्रमात गायन व तबला वादन करून जनसंघटन व राष्ट्रीय जागृती करण्याचे काम त्यांनी फारसा गाजावाजा न करता केले.

शंकररावांनी १९३५ मध्ये पैठण येथून इयत्ता सातवीची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली. त्याबरोबर त्यांचे गावतील शिक्षणही पूर्ण झाले. कारण पुढील शिक्षणाची सोय गावात नव्हती. सातवीपर्यंतच्या शिक्षणाने त्यांचे समाधान होणार नव्हती. त्यापुढील शिक्षण घेण्याची त्यांची उत्कट इच्छा होती. आपल्या मुलाने भरपुर शिकावे, असे भाऊराव चव्हाण यांनाही वाटत असे. परंतु पुढील शिक्षणासाठी आवश्यक असणारा खर्च करण्याची सोय त्यांच्याकडे नव्हती. पुढील शिक्षण घेण्यासाठी शंकररावांचे मन हैदराबादकडे धाव घेत होते, परंतु आर्थिक प्रश्न 'आ' वासून समोर उभा होता. त्याच्यावर मात करणे जितके आवश्यक होते, तितकेच ते

अवघडही होते. त्यातल्यात्यात जमेची बाजू अशी की, शंकररावांचे थोरले बंधू नारायणराव शिकवण्या घेऊन हैदराबाद येथे आपले शिक्षण पूर्ण करत होते. शंकररावांना आणि भाऊरावांना तेवढा एक आशेचा किरण दिसत होता. त्याच आशेवर शंकररावांनी हैदराबाद गाठले हैदराबादच्या सिटी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. सतत तीन वर्षे शिकवण्या घेऊन प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी आपले माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. या काळात त्यांची प्रचंड आबाळ झाली. तरीसुद्धा शिक्षणावरच्या प्रेमापोटी त्यांनी तो त्रासही गोड मानून घेतला. म्हणतात ना, ध्येयाचा ध्यास लागल्यावर कष्टाचा त्रास वाटत नाही. १९३९ मध्ये हैदराबादच्या सिटी कॉलेजातून ते मॅट्रिकची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. त्यावेळी त्यांना सोसलेल्या कष्टांचे आणि केलेल्या परिश्रमांचे सार्थक झाल्यासारखे वाटले.

एवढ्या शिक्षणावर समाधान मानतील ते शंकरराव कसले ! उच्च विद्याविभूषित होण्याचा त्यांचा मनोदय आणि वडिलांची इच्छा त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. पदवीच्या शिक्षणासाठी हैदराबादच्या निजाम कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याची शंकररावांची उत्कट इच्छा होती. परंतु तिथे त्यांना प्रवेश मिळणे दुरापास्त होते. कारण त्या कॉलेजचे शैक्षणिक शुल्क जास्त होते. ते शुल्क भरण्याची शंकररावांची आर्थिक क्षमता नव्हती. घराकडून काही पैसे मिळण्याची सुतराम शक्यता नव्हती. परंतु म्हणतात ना, जो धडपडतो त्याच्या मदतीला दैव धावून येते. तसाच काहीसा प्रकार शंकररावांच्या बाबतीत घडला.

त्याकाळी निजाम कॉलेजचे प्रिन्सिपॉल होते, टर्नर स्कॉटिश, ज्ञानलालसेपोटी शंकररावांनी जाऊन स्कॉटिश साहेबांची भेट घेतली. टर्नर स्कॉटिश हा मोठा उमदा माणूस ! ते शंकररावांना म्हणाले,"आमच्या कॉलेजची एक चाचणी

परीक्षा असते. त्या परीक्षेत तू चांगल्या मार्कांनी पास झालास तर तुला आमच्या कॉलेजमध्ये प्रवेश तर मिळेलच शिवाय फी माफीची सवलतही मिळेल. आणखी वरून आम्ही तुला स्कॉलरशिपही देऊ."

शंकरराबांनी आव्हाण समजून स्कॉटिश खाहेबांचे आवाहन स्वीकारले सर्व तयारीनिशी प्रवेशासाठीची चाचणी परीक्षा दिली. परीक्षेच्या निकालात शंकररावांना 'अपवादात्मक बुद्धिमान विद्यार्थी' असा शेरा मिळाला. त्याचबरोबर शंकररावांचा निजाम कॉलेजात प्रवेश निश्चत झाला. शिवाय गुणवत्ता शिष्यवृत्तीही! अशा प्रकारे अंगभूत गुणवत्तेने शंकररावांना निजाम कॉलेजात बी.ए.साठी प्रवेश मिळवून दिला. प्रवेशाचा प्रश्न सुटला खरा, पण निर्वाहाचा खरा प्रश्न पुढेच होता. दोनवेळच्या जेवणाची सोय करणे आवश्यक होते.

या काळात शंकररावांना त्यांचे ज्येष्ठ बंधू नारायणराव यांचा खूप आधार झाला. त्याकाळी नारायणराव हैदराबाद येथे वास्तव्याला होते. 'वंदेमातरम्' चळवळीत आणि अन्य विधायक सार्वजनिक कार्यात ते व्यस्त होते. ते ज्या सुंदरबागेत राहत होते, तेथे नवाबांची वसती होती. नारायणरावांनी शंकररावांना नवाबाच्या मुलांच्या खाजागी शिकवण्या घेण्याचे काम मिळवून दिले. खाजगी

शिकवणीच्या तुटपुंज्या कमाईवर शंकरराव आपल्या शिक्षणाचा गाडा नेटाने पुढे रेटत होते. एका शिकवणीसाठी शंकररावांना महिन्याकाठी सुमारे पंधरा रुपये मिळत असत. अशा तीन शिकवण्यांतून महित्याकाठी ४५ ते ५० रुपयांची कमाई होत असे. अतिशय काटकसर करून निगुतीने शंकरराव आपला शिक्षणाचा खर्च भागावीत. अलीकडे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये पालकांकडून दरमहा शेपाचशे पॉकेटमनी मागण्याचे फॅड निघाले आहे. अशा विद्यार्थ्यांना शिकवणीच्या माध्यमातून मिळालेल्या पन्नास रुपयांवर गुजराण करणाऱ्या आणि आपला विद्याव्यासंग निष्ठेने चालविणाऱ्या शंकररावांच्या चरित्रातून खूप काही शिकण्यासारखे आहे. ज्ञानातूनच मानवाच्या विकासाचा महामार्ग जात असतो, या विचारवचनावर त्यांची नितांत श्रद्धा होती, म्हणून घराकडून पाच पैशाचीही आर्थिक मदत न मागता किंवा गरिबीचे भांडवल करून शिक्षणाकडे पाठ न फिरविता शंकररावांनी आपले पदवीचे शिक्षण पूर्ण केले. १९४३ मध्ये शंकररावांनी बी.ए. ची परीक्षा विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण केली.

बी. ए. ची पदवी हातात पडल्यावर आपण पदवीधर झाल्याच्या आनंदात धन्यता न मानता कायद्याचे शिक्षण घेण्याचा ध्यास शंकररावांनी घेतला. पुढील शिक्षण अशाच निष्ठने पूर्ण करण्याचा शंकररावांनी संकल्प सोडला. हैदराबादच्या उस्मानिया विद्यापीठात एल.एल.बी. साठी प्रवेश घेतला. शंकररावांनी बी.ए.ची परीक्षा विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण केली असल्यामुळे निजाम सरकारने

त्यांना विशेष गुणवत्ता शिष्यवृत्ती जाहीर केली. त्यामुळे शंकररावांच्या शैक्षणिक प्रपंचाला थोडासा हातभार लागला.

## शुभमंगल !

दरम्यानच्या काळात ज्येष्ठ बंधू नारायणराव हे आपले हैदराबाद येथील कायद्याचे शिक्षण पूर्ण करून व वकिलीचा अनुभव गाठीशी घेऊन नांदेड येथे सिव्हील जज्ञ म्हणून नोकरीस लागले होते. आखाडा बाळापूरचे माधवराव पाटील यांच्याशी यांचे मैत्रीच्या माध्यमातून घनिष्ठ संबंध प्रस्थापित झाले होते. एकेदिवशी गप्पांच्या ओघात माधवराव पाटलांनी आपली कन्या कुसुमताईच्या विवाहाचा विषय नारायणरावांकडे काढला. आपली कन्या कुसुमताईचा विवाह शंकररावांशी करण्याचा प्रस्ताव त्यांनी नारायणरावांना बोलून दाखवला.

त्यावर नारायणराव म्हणाले,"उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये शंकरराव नांदेडला येतील. त्यावेळी पाहू."

झाले. उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागल्या. भावाच्या भेटीसाठी शंकरराव नांदेडला आले होते. त्यावेळी आखाडा बाळापूरचे माधवराव पाटील यांनी शंकररावांना आणि नारायणरावांना मुलगी पाहायला येण्याचे निमंत्रण दिले. भाऊराव चव्हाण हे नारायणराव आणि शंकरराव या आपल्या मुलांसह आखाडा बाळापूरला गेले. कुसुमताईंना पाहण्याचा कार्यक्रम झाला. नावाप्रमाणेच कुसुमकोमल असणाऱ्या कुसुमताई पाहताक्षणी पाहुण्यांच्या पसंतीस उतरल्या. माधवराव पाटलांनी भाऊराव चव्हाणांकडे हळूच हुंड्याचा विषय काढला.

हुंडाचा विषय उधळून लावत भाऊराव चव्हाण बोलले, "हुंडा देणे आणि घेणे आम्हाला मुळीच पसंत नाही. हुंड्याच्या बदल्यात आम्ही मुलाची किंवा मुलीची किंमत करू इच्छित नाही. तुमची मुलगी कुसुम हीच आमच्यासाठी अनमोल असा हुंडा आहे. लाग्नात येणाऱ्या पाहुण्यांची जेवणाची व राहण्याची उत्तम व्यवस्था व्हावी, एवढीच अपेक्षा आहे."

वरपित्यानेच हुंड्याच्या प्रथेला अशा वाटाण्याच्या अक्षता लावल्यावर वधुपित्याने पुढे बोलण्याचा प्रश्नच नव्हता. लग्नाची तिथी ठरविण्यासाठी पुरोहिताला बोलविण्यात आले.

"लग्नाच्या तिथी संपल्या आहेत." पुरोहिताने निर्विकार चेहऱ्याने सांगितले.

"कसली तिथी आणि कसल काय? तुमच्या आमच्यासाठी जो सोईचा दिवस असेल तीच शुभ तिथी." भाऊराव चव्हाण बोलले.

वधुपिता माधवराव पाटील पुरोगामी विचारांच्या भाऊराव चव्हाणांकडे पाहतच राहिले. ज्येष्ठ शुद्ध नवमीचा सागळ्यांना सोईचा असा विवाह मुहूर्त निश्चत करण्यात आला लग्न आंध्रप्रदेशातील बासर येथे करावयाचे ठरले.

अशाप्रकारे लग्नाची प्राथमिक बोलणी पार पडली. भाऊराव चव्हाणांच्या पुरोगामी विचारसरणीने आणि कृतीने जमलेली पाहुणे मंडळी भलतीच प्रभावित झाली. कुसुमताई आणि शंकरराव यांचा वाङ्‌निश्चय संपन्न झाला. या नवीन

सोयरसबंधाच्या आंनदाप्रीत्यर्थ साखर फुटाणे, बताशे, पेढे वाटण्यात आले.

लग्नसमारंभ बासर येथे करायचे ठरले खरे; परंतु काही अडचणीमुळे हा विवाह नांदेडमध्येच अत्यंत साधेपणाने संपन्न झाला. शंकरराव आणि कुसुमताई विवाहाच्या पवित्र बंधनात बद्ध झाले.

## हैदराबादचे दिवस

१९४३ मध्ये लग्नानंतर लगेच नवविवाहित शंकरराव आणि कुसुमताई यांनी हैदराबाद येथे राहायचे निश्चित केले. कारण शंकररावांना कायद्याचे पुढील शिक्षण चालू ठेवायचे होते. हैदराबादेत सुंदरवन जामबागेतील सुप्रसिद्ध वकील श्री वसंतराव मुखेडकर यांच्या वाड्यात एका खोलीमध्ये चव्हाण दाम्पत्याने आपले बिऱ्हाड थाटले. शंकररावांनी आपला दिनक्रम ठरवून घेतला. दररोज सकाळी सहा वाजता ते घराबाहेर पडत असत. दोन-तीन ठिकाणच्या खाजगी शिकवण्या घेत असत. कारण त्याशिवाय पर्यायही नव्हता. 'कमवा आणि शिका हा मूलमंत्र त्यांनी विद्यार्थिदशेपासूनच आपल्या जीवनात उतरविला होता. शिकवण्या झाल्यानंतर परस्पर कॉलेजला जायचे दिवसभर कॉलेज करायचे. मन लावून अभ्यास करायचा. कॉलेज संपल्यानंतर घरी यायचे. सांयकाळी सहा ते रात्री अकरा वाजेपर्यंत पुन्हा अभ्यास करायचा अशी कठोर दिनचर्या कायद्याची पदवी पदरात पडेपर्यंत शंकररावांनी व्रतस्थपणे चालविली. आर्थिक आवक जेमतेम असल्यामुळे घरची सगळी कामे कुसुमताई स्वतः करत असत. घरकामाला त्यांनी मोलकरीण ठेवण्याचा कधी चुकूनही आग्रह धरला नाही. कुसुमताई सुखवस्तू कुटुंबातून आल्या असल्या तरी त्यांनी कधी श्रमाची लाज बाळगली नाही. सार्वजनिक नळावरून पाणी भरणे, चुलीवर स्वयंपाक करणे, भांडी

घासणे यांसारख्या कामात त्यांना कधी कमीपणा वाटला नाही.

१९४३ पासून १९४७ पर्यंत चव्हाण दाम्पयांचे वास्तव्य हैदराबाद येथे होते. या काळात शंकररावांनी मोठ्या कष्टाने कायद्याची पदवी संपादन केली. हैदराबाद संस्थानातील तो काळ मोठा कठीण होता. हैदराबाद संस्थानात हिंदूंना जीवन जगणे अवघड झाले होते. रजाकारांच्या जाच, जुलूम, छळ, अन्यायअत्याचारांची परमावधी झाली होती. हिंदूंचे जीवित सुरक्षित नव्हते, वित्त सुरक्षित नव्हते, हिंदू स्त्रियांची अब्रू सुरक्षित नव्हती. इतके अराजक माजले होते.

हैदराबाद संस्थानात तेलंगण प्रांतातील आठ जिल्हे, आजच्या मराठवाडा प्रांतातील पाच जिल्हे आणि कर्नाटक राज्यातील तीन जिल्ह्यांचा समावेश होता. या संस्थानात मुस्लिमांचे वर्चस्व होते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाले तरी हैदराबाद संस्थानातील प्रजा पारतंत्र्यात खितपत पडली होती. ही जनता १९२० ते १९३७ या काळात हैदराबाद संस्थानातून स्वतंत्र होण्यासाठी सतत प्रयत्न करत होती. सामाजिक परिषदा, राजकीय परिषदा आणि धार्मिक परिषदांच्या माध्यमातून संस्थानी प्रजेत जनजागृती करण्याचे प्रयत्न हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे नेते आणि कार्यकर्ते करत होते.

निजामाच्या राजवटीत हिंदू जनतेवरील अन्याय आणि अत्याचाराची परिसीमा झाली होती. स्वातंत्र्यपूर्व काळात मराठवाड्याची अवस्था अत्यंत शोचनीय झाली होती. प्रजेला कुणी वाली उरला नव्हता. ‘मुकी बिचारी कुणी हाका’ अशी

रयतेच स्थिती झाली होती. हैदराबाद संस्थानातील जनतेला कोणतेच नागरी हक्क मिळत नव्हते. त्यांना तोंड दाबून सर्व प्रकारचे अन्याय अत्याचार सहन करावे लागत होते. खरे तर सर्वच संस्थानातील प्रजेची परिस्थिती थोड्याबहुत फरकाने अशीच हलाखीची होती. परंतु हैदराबाद संस्थानातील हिंदू जनतेची अवस्था त्या सर्वांपेक्षा आणखी वाईट होती. हैदराबाद संस्थानची सरंजामशाही सत्ता धर्मांध निजामाच्या कराल राजवटीत अधिकच असहिष्णू बनली होती. आधुनिकतेचा प्रकाश या जनतेपासून शेकडो मैल दूर होता. संस्थानातील प्रजेला बाह्मजगतातील विकासाचा प्रकाश दिसू नये आणि अन्यायग्रस्त संस्थानातील प्रजेचे हुंदके आणि उसासे बाह्मजगताला ऐकू जाऊ नयेत, यासाठी संस्थानी राजवट वर्षीनुवर्षे खटाटोप करत होती. वर्तमानपत्रांवर कठोर निर्बंध लादले होते. संघटना स्थापन करण्यावर बंदी होती. स्वच्छ सार्वजनिक जीवनाला सामोरे जाण्याचे सर्व सन्माननीय मार्ग संस्थानी राजवटीने बंद करून टाकले होते. अशा या अन्यायग्रस्त मराठवाड्याची अवस्था एखाद्या बंदिस्त बेटासारखी झाली होती. अशी निर्मम, निर्दय, असहिष्णू राजवट शक्य तेवढ्या लवकर गाडून टाकणे ही काळाची गरज होती. त्यादृष्टीने नेत्यांचे आणि जनतेचे प्रयत्य चालले होते. मण त्या प्रयत्नांना यश येत नव्हते. १९३७-३८ च्या सुमारास स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली तरुण संघटित होत होते. सविनय कायदेभांगाची चळवळ, विद्यार्थी आंदोलन आणि 'वंदेमातरम्' चळवळीने अत्याचारी निजामाच्या

अन्यायाधिष्ठित सिंहासनाला पहिला जबर धक्का दिला. परंतु हैदराबाद संस्थानची ती प्रतिगामी, धर्मवेडी आणि अतिरेकी सत्ता नष्ट होण्यासाठी आणखी किती दिवस वाट पहावी लागणार या प्रश्नाच्या उत्तरासाठी जनता तडफडत होती, तगमगत होती.

हैदराबादच्या निजामाच्या विरोधात सारखे वातावरण तापत होते. १९३८ हे वर्ष खऱ्या अर्थाने प्रतिकाराचे वर्ष ठरले. या चळवळीचे पडसाद विद्यार्थी वर्गात उमटत होते. तरुण विद्यार्थ्यांयानी हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या सत्याग्रहाला आणि स्वातंत्र्य-संग्रामाला जोरदार पाठिंबा दिला. १९३८ साली शंकरराव हैदराबादेत शिक्षण घेत होते. या काळात वंदेमातरम् चळवळ धारदार बनली होती. उस्मानिया विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची जी वेगवेगळी वसतिगृहे होती त्या वसतिगृहांना लागूनच हिंदू आणि मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अशी प्रार्थनागृहे होती. हिंदू विद्यार्थी आपल्या प्रार्थनागृहात सामूहिक व उच्च स्वरात ‘वंदेमातरम्’ हे गीत म्हणत असत. हे गीत धार्मिक नसून राजकीय स्वरूपाचे आहे. हे गीत मुसलमानांच्या विरोधी असल्यामुळे मुसलमानांच्या धार्मिक भावना दुखावल्या जातात, अशी सवब पुढे करून संस्थानी सत्तेने ‘वदेमातरम्’ या गीतावर बंदी घातली. तरीसुद्धा देशभक्त विद्यार्थी आपल्या विचारापासून तसुभरही ढळले नाहीत. तेव्हा चिडलेल्या सरंजामशाही निजामी सत्तेने हिंदू विद्यार्थ्यांचे वसतिगृह बंद करून टाकले. तरीसुद्धा स्वातंत्र्याची ज्योत उरात सतत प्रकाशमान ठेवणेऱ्या स्वातंत्र्यप्रेमी विद्यार्थ्यांनी उघड्या

मैदानावरही हे गीत गायिले. निजाम सरकारने दि. २९ नोव्हेंबर १९३८ रोजी एक फतवा काढून 'वंदेमातरम्' हे गीत गाण्यावर संस्थानात बंदी घातली. या अन्यायकारक फतव्याचा निषेध करण्यासाठी विद्यार्थी संपावर गेले अशा विद्यार्थ्यांची नावे शाळा-कॉलेजातून तात्पुरती काढण्यात आली. त्यात शंकरराव चव्हाणांचाही समावेश होता. 'वंदेमातरम्' चळवळीच्या माध्यमातून शंकररावांनी विद्यार्थीवर्गाचे जे कुशल संघटन केले, त्यातून त्यांच्या भावी नेतृत्वगुणाची प्रसादचिन्हेच दिसतात. प्रत्यक्ष सक्रीय राजकारणात उतरण्यापूर्वी शंकरराव स्वामी रामानंद तीर्थ यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र परिषदेच्या प्रत्येक अधिवेशनाला आवर्जून उपस्थित राहात आणि स्वयंसेवक म्हणून आपली भूमिका बजाबत असत. अशा प्रकारे स्वामीजींच्या तालमीत शंकररावांच्या समाजशील व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत होती.

हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे आद्य प्रणेते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यप्रेमी तरुणांचा ध्येयनिष्ठ वर्ग संघटित होत होता. स्वामीजी हे एक योद्धा संन्याशी होते. त्यांनी हैदराबादच्या जुलमी राजवटीविरुद्ध रान पेटविले

होते. स्वामीजींनी उभ्या केलेल्या आंदोलनाला मराठवाड्यातील लाखो शेतकऱ्यांनी सशस्त्र आणि सक्रीय पाठिंबा दिला. गवताला भाले फुटण्याचा जो प्रकार म्हणतात, त्याचा अनुभव या काळात मराठवाड्यातील जनतेने घेतला.

हैदराबादच्या निजाम संस्थानाविरुद्ध जनमानसात असंतोष धुमसत होता. ठिकठिकाणी निजामविरोधी आंदोलने होत होती. बळाचा वापर करून ती आंदोलने चिरडून टाकण्याचा निजाम प्रयत्न करीत होता. अशा परिस्थितीत शंकररावांना स्वस्थ बसवेना. हैदराबाद संस्थानातील मुलकी व्यवस्था कोलमडून पडावी, या हेतूने स्वामी रामानंद तीर्थ यांनी वकिलांना न्यायालयावर बहिष्कार टाकण्याचा आदेश दिला. शंकररावांचे नुकतेच लग्न झालेले होते. नवीन संसाराची जवाबदारी त्यांच्यावर येऊन पडली होती तरीसुद्धा राष्ट्राच्या संसारापुढे वैयक्तिक संसार तुच्छ समजून शंकररावांनी राष्ट्रकार्यासाठी वकिलीचा व्यवसाय सोडून दिला. काही काळ अज्ञातवास पत्करला आणि अखेर स्वामीजींच्याच आदेशाने त्यांनी हैदराबाद सोडायचे ठरविले. १९४७ साली त्यांनी आपला मुक्काम उमरखेड कॅम्पला हलविला. त्याकाळी उमरखेड कॅम्प हे निजामविरोधी आंदोलनाचे प्रमुख केंद्र बनले होते. हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे नेते स्वामी रामानंद तीर्थ आणि महात्मा गांधी त्याच्या प्रेरणने हैदराबाद संस्थानातील जनतेने निजामाविरुद्ध असहकार आंदोलन पुकारले. उमरखेड कॉम्पवरील शंकरराव चव्हाणांच्या आयुष्यातील दिवस हे अक्षरशः मंतरलेले दिवस होते.

## उमरखेड कॉम्पवर

क्रांतिकारकांना हैदराबाद संस्थानात राहून क्रांतिकार्य करणे अवघड जात होते. म्हणून संस्थानाच्या लगत असलेल्या बिटिशशासित विदर्भातील उमरखेड येथे एक कॅम्प स्थापन करण्यात आला होता. भगवानराव गांजवे, गोपाळशास्त्री देव आणि अन्य ज्येष्ठ कार्यकर्ते या कॅम्पचे सूत्रसंचालन करत होते. या कॅम्पच्या व्यवस्थापनाची जबाबदारी शंकरराव चव्हाण यांच्यावर सोपविण्यात आली. शंकररावांनी तिथेही आपल्या कुशल संघटनकौशल्याचा परिचय दिला. उमरखेड कॅम्पवर राहून प्रसंगी वेषांतर करून शंकरराव चव्हाण रात्रीअपरात्री गुप्तपणे संस्थानातील खेड्यापाड्यात पायी संचार करत असत. निजामविरोधी पत्रके छापणे व ती वाटणे, कार्यकर्यांच्या गुप्त बैठका घेणे, लहान लहान सभा घेणे आणि त्या माध्यमातून स्वातंत्र्यलढ्याचे महत्त्व जनतेला पटवून देणे, ही कामे शंकररावांनी अत्यंत जबाबदारीने व चोखपणा केली. हे करत असताना शंकररावांना अनेकदा जिवावर उदार व्हावे लागले. परंतु त्यांनी त्यांची कधीच तमा बाळगली नाही. शंकररावांच्या ह्या झपाटलेपणामुळे तरुणवर्ग मोठ्या संख्येने संघटित झाला आणि या लोकलढ्यात समर्पित भावनेने सहभागी झाला.

हैदराबाद संस्थानच्या हद्दीत जाऊन रात्रीच्यावेळी जनतेत राजकीय जागृती करणेरे उमरखेड कॉम्पसारखे

इतरही अनेक कॅम्प कार्यरत होते. या सर्व कॉम्पशी पत्रव्यवहार करणे, सातत्याने त्या कार्यकर्त्यांच्या संपर्कात राहणे, प्रत्येक कॅम्पची माहिती घेणे व देणे, कार्यकर्त्यांच्या परस्पर समन्वयासाठी बेमालूम संपर्क प्रस्थापित करणे, रझाकाराच्या हालचालींची गुप्त माहिती मिळविणे व ती माहिती योग्य कार्यकर्यापर्यंत पोचविणे, लोकलढ्याचे स्वरूप व त्याचे नियोजन निश्चित करणे इत्यादी कामे शंकररावांनी अतिशय दक्षपणे व चाणाक्षपणे केली. याशिवाय मुंबईच्या मध्यवर्ती कार्यालयाशी संपर्क राखणे, कॅम्पवरील घटना घडामोडींची माहिती वेळोवेळी मुख्य कार्यालयाला देणे, ज्येष्ठ कार्यकर्त्यांचे आदेश क्षेत्रावर काम करणऱ्या सैनिकांनी समजावून देणे, त्या आदेशांची अंमलबजावणी करणे, भावी लढ्याच्या आखणीत सहभागी होणे अशा प्रकारची सर्वस्पर्शी आणि तितकीच महत्त्वपुर्ण कामगिरी शंकरराव चव्हाणांनी अतिशय जबाबदारीने व बिनचुक पार पाडली.

उमरखेड कॅम्पवर कार्यरत असताना घडलेला एक प्रसंग तर अंगवार शहारे आणणारा आहे. त्याचं असं झालं, एकदा उमरखेड कॉम्पवरून एक हजार कार्यकर्त्यांनी निजामाच्या सत्तेच्या सरहद्दीत शिरून त्याच्या महत्त्वपूर्ण लष्करी ठाण्यांवर हल्ले करायचे अशी ती धाटसी योजना होती अशा प्रकारचे पूर्ण नियोजन आधीच झाले होते. कॅम्पवरून एक हजार कार्यकर्ते निघणार होते आणि एका विशेष ठिकाणावरून आणखी जादा कार्यकर्त्यांची फौज ठराविक वेळी त्यांना घेऊन मिळणार होती. निजामाच्या लष्करी ठाण्यावर हल्ला करण्याची तारीख, वेळ अशी सारी

योजना निश्चित होती. झाले. ठरल्याप्रमाणे नियोजित दिवशी एक हजार कार्यकर्त्यांच्या तुकडीने निजामाच्या हद्दीकडे मार्गक्रमण केले. दरम्यानच्या काळात उमरखेड कॅम्पवर बातमी येऊन धडकली की, 'आधी ठरल्याप्रमाणे अतिरिक्त कार्यकर्त्यांची जादा कुमक मिळणार नाही. तूर्त नियोजित हल्ला स्थागित करावा.'

ही गुप्तवार्ता समजल्यावर कॅम्पवरील सूत्रधार शंकरराव चव्हाण अस्वस्थ झाले. कारण कॅम्पवरून एक हजार क्रांतिकारक तर नियोजित आक्रमणासाठी रवाना झाले होते. धनुष्याला लावलेला बाण निघाल्यासारखीच स्थिती झाली होती. तो बाण परत फिराविणे महाकठीण काम होते. अतिरिक्त क्रांतिकारकांचे नियोजित सहकार्य मिळाल्याशिवाय हल्ला यशस्वी होणा शक्य नव्हते. परिस्थितीचे गांभीर्य शंकररावांच्या लक्षात आले.

एव्हाना क्रांतिकारक निजामाच्या हद्दीपर्यंत पोचले असण्याची शक्यता होती. क्षणाचाही विलंब झाला तरी एक हजार क्रांतिकारकांच्या प्राणावर बेतण्याची वेळ होती. कसलाही मागचा पुढचा विचार न करता शंकररावजी बंदुकीतून सुटलेल्या गोळीसारखे सुसाट वेगाने निजाम सरहद्दीच्या दिशेने निघाले. आपले क्रांतिकारक निजामाच्या हद्दीत शिरण्यापूर्वी आणि नियोजित हल्ल्याला सुरुवात होण्यापूर्वी ही गुप्त बातमी त्यांना देणे आवश्यक होते. अन्यथा एक हजार क्रांतिकारकांचे प्राण संकटात होते . शंकररावजींनी विचार केला, माझ्या एका जिवापेक्षा हजार क्रांतिकारकांचे प्राण लाख मोलाचे आहेत. असा विचार

करून शंकररावजी रातोरात किर्र जंगलातून रस्ता कापत सरहद्दीच्या दिशेने निघाले. वाटेत पैनगंगा नदी आडवी आली. नदीच पाणी वेगाने वाहत होतं. भीतीनं सामान्य माणसाच्या अंगाचं पाणी व्हावं, अशी परिस्थिती, परंतु शंकररावांना आता थांबून चालणार नव्हतं. विचार करायलासुद्धा वेळ नव्हता. कारण आमली हजार क्रांतिकारकांची तुकडी साक्षात मृत्यूच्या दिशेनं वाटचाल करीत होती. त्यांना वेळीच सावध करणं अगत्याचं होतं. 'एकच तारा समोर आणिक पायातळी अंगार' अशी अवस्था!

शंकररावांनी पैनगंगेच्या विस्तीर्ण पात्रात, गतिमान प्रवाहात स्वतःला झोकून दिलं. नदीच्या पात्रात लाकूड समजून आधारासाठी एक वस्तू हातात धरली, तर तो साप निघाला. तो साप हाताने दूर भिरकावून शंकररावांचं पाणी कापणं चालूच होतं. अशा ध्येयधुंद अवस्थेत शंकररावांनी पैनगंगेचं पात्र पोहत जाऊन ओलांडलं. एक हजार क्रांतिकारकांचे पथक निजाम सरहद्दीत शिरून निजामाच्या लष्करी छावणीवर हल्ला करण्याच्या तयारीत होते. अशा प्रसंगी नियोजित मदत आणि जादा क्रांतिकारकांची कुमक मिळणार नसल्याची बातमी सांगून शंकररावांनी क्रांतिकारकांना सावध केले. जर शंकररावांनी रात्रीच्या अंधाराची भीती बाळगली असती, गुप्त बातमीकडे गाफील पणे दुर्लक्ष केले असते आणि पैनगंगेचे पात्र ओलांडल्यास विलंब लावला असता तर कदाचित एक हजार क्रांतिकारकांना हकनाक हौतात्म्य पत्करावे लागले असते.

शंकररावांची ही अद्वितीय कामगिरी इतिहासाला कधीही न विसरता येणारी आहे.

उमरखेडच्या वास्तव्यात कुसुमताई-शंकरराव यांच्या दाम्पत्यजीवनात दि. १३-८-१९४९ रोनी दुसरे कन्यारत्न झाले. मुलगी अतिशय गोड आणि फुलासारखी लाघवी होती, म्हणून तिचं नाव ठेवलं ‘पुष्पा !

निजामाचे सैनिक भूमिगत राहून कार्य करणाऱ्या शंकररावांवर सारखी पाळत ठेवून असायचे. त्यामुळे शंकररावांना कुटुंबासाठी फारसा वेळ देता आला नाही. त्यांना दहा-दहा दिवस घरापासून दूर क्रांतिकार्यात व्यस्त रहावे लागत असे अशा अवघड अवस्थेत उमेरखेड कॅम्प येथील शंकररावांच्या स्नेह्यांनी व सहकारी मित्रांनी त्यांना मौलिक मदत दिली.

क्रांतिकारकांच्या नागपुर कार्यालयाकडून उमेरखेड कॅम्पसाठी हत्यारे पाठविण्यात येत. नागपुर कार्यालयाकडून आलेली शस्त्रास्त्रे आणि क्रांतिकारकांची व्यवस्था लावण्याचे काम शंकररावजी मनःपूर्वक करीत असत. जंगलचा सत्याग्रह,करोडगिरी नाका हल्ला प्रकरण, उमरी बॅंक लूट प्रकरण, इस्लापूर हल्ला प्रकरण इ.चळवळींमध्ये शंकरराव चव्हाणांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध होता.

रयतेशी संपर्क ठेवून रजाकारी व निजामी गोटातील गुप्त बातम्या चातुर्याने मिळविणे, निजामाच्या सैन्याच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवणे, ही सर्व माहिती देवसरी कॅम्प आणि इतर कॅम्पना पुरविणे ही अतिशय महत्वाची आणि तितकीच अवघड कामे शंकररावांनी प्राण तळहातावर घेऊन

केली. सशस्त्र लढ्यासाठी जे कार्यकर्ते संस्थानात जात असत त्यांना आवश्यक तो दारूगोळा पुरविणे, बंदुका देणे, त्यांची अचूक नोंद ठेवणे, लढ्यावरून परत आलेला शस्त्रसाठा कॅम्पवर जमा करून घेणे व त्यांच्या बिनचूक नोंदी ठेवणे, कॅम्पच्या दैनंदिन जमा खर्चाचा चोख हिशोब ठेवणे, यासारखी जबाबदारीची कामे शंकररावांनी एखाद्या सैनिकाला शोभेल अशा लष्करी शिस्तीत पार पाडली. त्यांचे हे कार्य पाहून हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे सरसेनापती स्वामी रामानंद तीर्थ यांनी शंकररावांचा "एक निष्ठावंत सैनिक" अशा नेमक्या शब्दांत गौरव केला. स्वामीजींनी दिलेली ही प्रशस्ती शंकररावांसाठी कोणत्याही विद्यापिठाच्या पदवीपेक्षा लाख मोलाची होती.

## नांदेडनिवासी

उमरखेड कॅम्पच्या माध्यमातून शंकररावांनी जे कार्य केले ते कार्य पाहून या लोकलढ्याचे नेते स्वामी रामानंद तीर्थ अतिशय प्रभावित झाले. त्यांनी शंकरराव चव्हाणांची हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या नांदेड विभागच्या सचिवपदी नियुक्ती केली. आणि नांदेड येथे राहून क्रांतिकार्य करावे असा आदेश दिला. स्वामीजींनी शंकररावांना सांगितले, "तुला जर खरच लोकांसाठी, समाजासाठी काही करायचं असेल तर काँग्रेसमध्ये जा. सत्तेत राहून समाजाची सेवा कर." स्वामी रामानंद तीर्थ यांना शंकरराव चव्हाण यांच्या जीवनात अत्यंत आदराचे स्थान असल्यामुळे स्वामीजींची आज्ञा शिरसावंद्य मानून शंकररावांनी आपला मुक्काम नांदेडला हलविला.

हैदराबाद मुक्तिसंग्रामात नांदेड शहर आणि परिसराला विशेष महत्त्व होते. शामरावजी बोधनकर, भगवानराव गांजवे, गोपाळशास्त्री देव यांच्यासारखे लढवय्ये सेनानी जुलमी रजाकाराशी निकराने झुंज देत होते नागनाथराव परांजपे, साहेबराव बारडकर यांच्यासारखे क्रांतिकारी तरुण आपल्या सेनानींच्या मार्गदर्शनाखाली जुलमी रजाकाराचा नायनाट करण्यासाठी प्राणपणाने लढत होते. अशा क्रांतिकारकांच्या फळीत शंकरराव चव्हाण दाखल झाले.

नांदेडच्या मुक्कामात शंकररावजींनी प्रथम कुंभारटेकडीवर माहूरकरांच्या वाड्यात आपले बिऱ्हाड थाटले. त्यानंतर ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी शामराव बोधनकर यांच्या वाड्यात एक खोली भाड्याने घेऊन राहत होते. नांदेडच्या वास्तव्यात शंकररावांनी वकिलीच्या व्यवसायाला सुरुवात केली. परंतु ते या व्यवसायात नवीनच असल्याने आर्थिक आवक फारशी चांगली नव्हती. संसाराचा खर्च भागविण्यासाठी शंकररावजी या काळातही सायंकाळी सहा ते आठ या वेळात खाजगी शिकवण्या घेत असत. हैदराबाद मुक्तिसंग्रामाच्या आंदोलनाने आता चांगलाच वेग घेतला होता. त्यामुळे शंकररावही या आंदोलनात सक्रीय सहभागी झाले. नांदेडच्या वास्तव्यात शंकरराव चव्हाण यांना आशा आणि शीला ह्या दोन मुली झाल्या. चार मुलींच्या नंतर त्यांना पुत्ररत्न झाले. मुलाचे नाव शिवाजी असे ठेवले.

शंकरराव चव्हाणांची जीवनदृष्टी आपला व्यवसाय भला आणि आपला संसार भला, असे मानणाऱ्यांसारखी संकुचित नव्हती. वकिली व्यवसायाबरोबरच शंकररावांनी आता हळूहळू सार्वजनिक हिताच्या गोष्टींकडे लक्ष द्यायला सुरुवात केली. हैदराबाद मुक्तिसंग्रामातील एक कुशल संघटक कार्यकर्ता अशी त्यांची प्रतिमा आधीच तयार झाली होती. आता समाजहिताची तळमळ बाळगणारा एक तरुण कार्यकर्या अशी त्यांची प्रतिमा तयार होऊ लागली. एखादे काम हाती घेतले की त्यात स्वतःला पूर्णतः झोकून द्यायचे अशी समर्पितवृत्ती असल्यामुळे शंकररावांनी कॉंग्रेस पक्षाचे संघटनकार्य जोमाने सुरू केले. कॉंग्रेसच्या ध्येयधोरणाचा

जनसामान्यात प्रचार व प्रसार करणे, जनतेच्या अडीअडचणी समजावून घेऊन त्या सोडविण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहणे ही तरुण शंकररावांची कार्यपद्धती होती. पक्षकार्यासाठी शंकरराव खेड्यापाड्यातून पायपीट करत असत. शक्य असेल तर सायकलवरून ते वाड्यावस्तीतून फिरत असत. काँग्रेसचा सच्चा कार्यकर्ता अशी शंकररावाची जनमानसात प्रतिमा निर्माण झाली.

हैदराबाद स्टेट काँग्रेस ही केवळ वाण्या-ब्राह्मणांची संघटना आहे, असा अपप्रचार परभणी जिल्ह्यात केला जाऊ लागला. त्यामुळे बाह्मणेतर बहुजन समाज काँग्रेसपासून दुरावण्याची शक्यता निर्माण झाली. स्टेट काँग्रेसमध्ये दुफळी निर्माण होण्याखारखी परिस्थिती उदभवली. अशा संक्रमणावस्थेत शंकररावांनी पंडित जवाहरलाल नेहरूंना पत्र लिहून काँग्रेस संघटना एकसंघ राखण्यासाठी तातडीचे प्रयत्न करण्याची आग्राहाची विनंती केली एका जागरूक पक्ष संघटकाने देशाच्या नेत्याला केलेली ही विनंती खूपच भावली. शंकररावांनी सर्वसामान्य जनतेला स्टेट काँग्रेसची उद्दिष्टे आणि सर्वसमावेशक ध्येयधोरणे पटवून दिली जनतेला स्टेट काँग्रेसच्या बाजूने उभे केले. शंकररावांच्या प्रयत्नांमुळे स्टेट काँग्रेसमधील संभाव्य फूट टळली. स्टेट काँग्रेसचे संघटक म्हणून शंकरराव चव्हाणांनची केलेले कार्य कुणालाही नजरेआड करता येणार नाही. शंकरराव चव्हाणांची राष्ट्रनिष्ठा, त्यांचे संघटनकौशल्य, कुशाग्र बुद्धिमत्ता आणि पक्षासाठी प्रामाणिकपणे काम करण्याची तयारी तत्कालीन ज्येष्ठ नेत्यांच्या अतःकरणात ठसली.

शामरावजी बोधनकर, गोपाळशास्त्री देव इ. ज्येष्ठ नेत्यांनीच शंकरराव आणि कुसुमताई यांना आग्रहाने नांदेडला आणले या नेत्यांनीच शंकररावांना आप्तस्वकीयांसारखी आपुलकीची वागणूक देऊन आपलेसे केले.

मनमिळाऊ स्वभावामुळे नांदेडच्या वास्तव्यात शंकररावांनी अनेक माणसे जोडली सर्वसामान्यांच्या हितासाठी झटण्याची कला उपजतच अवगत असल्यामुळे जसे लोखंडाचे कण लोहचुंबकाकडे आकर्षित होतात, तसे लोक शंकररावांच्या उदयोन्मुख नेतृत्वाकडे आकर्षित होऊ लागले. शंकररावांच्या ह्या डोळस पक्षप्रेमामुळे हे उदयोन्मुख व कर्तबगार नेतृत्व ज्येष्ठ नेत्यांच्या नजरेत भरल्यावाचून राहिले नाही.

## अपशय : यशाची पहिली पायरी

१९५२ साल उजाडले. विधानसभेची पहिली सार्वत्रिक निवडणूक लागली. पक्षश्रेष्ठींनी शंकररावांना हदगाव विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याचे आदेश दिले. सुरुवातीला शंकररावांनी पक्षादेशाला नम्रपणे नकार दिला. परंतु अखेर पक्षश्रेष्ठींचा आदेश आणि ज्येष्ठ नेत्यांचा आग्रह यामुळे शंकररावांची हदगाव विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर झाली. वास्तविक एक स्थानिक गट पक्षाकडे उमेदवारीची मागणी करीत होता. शंकररावांना उमेदवारी दिल्यामुळे तो स्थानिक गट नाराज झाला. शंकररावांच्या विरोधात माधवराव पाटील वायफनेकर हे स्थानिक उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले. निवडणूक अटीतटीची झाली. या निवडणुकीत शंकररावांचा निसटता पराभव झाला. या पराभवाची मीमांसा करताना शंकरराव म्हणाले, की पक्षांतर्गत बंडखोरीमुळे आणि स्वकीयांनीच गुप्तपणे आपल्या विरोधात अपप्रचार केल्यामुळे आपल्याला पराभव पत्करावा लागला. या निवडणुकीत पक्षांतर्गत बंडखोरीही होतीच. शिवाय माधवराव पाटील वायफनेकर हे स्थानिक उमेदवार होते. त्यामुळे त्यांचा स्थानिक मतदारांशी स्नेह होता, दीर्घ परिचय होता. त्यामुळे ते मतदारांना अधिक जवळचे वाटत होते. शिवाय शंकरराव चव्हाण हे बाहेरगावचे. 'पक्षश्रेष्ठींनी लादलेला बाहेरचा उमेदवार' असा त्यांच्याविषयी कटूप्रचार

करण्यात आला. अर्थात निवडणूक म्हटल्यावर असा प्रचार होतच असतो. वास्तविक शंकरराव त्याअर्थाने ‘बाहेरचे नव्हते. त्यांनी जिल्ह्याच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रात समर्पित भावनेने काम केले होते. या निवडणूकीच्या निकालावर प्रभाव टाकणारी आणखी एक घटना घटली होती. माधवराव पाटलांचे धाकटे बंधू जयवंतराव पाटील हे हैदराबाद मुक्तिसंग्रामात हुतात्मा झाले होते. स्वातंत्र्यासाठी रक्त सांडणाऱ्या क्रांतिकारकाचे अग्रज अशी माधवराव पाटलांच्याविषयी जनमानसात आदराची भावना होती. त्यामुळे साहजिकच जनमत त्यांच्या बाजूने झुकणे क्रमप्राप्त होते. कारणे काहीही असोत, परिणाम व्हायचा तोच झाला होता. शंकरराव चव्हाण पराभूत झाले होते. त्यांच्या आयुष्यातील हा पहिलाच पराभव असल्याने ते बरेचसे खचलेही होते. निवडणुकीतील पराभवापेक्षाही जहरी प्रचार आणि सहकाऱ्यांचा  घरभेदीपणा शंकररावांच्या जिव्हारी लागला होता.उमेदीच्या काळात अशा दुर्दैवी पराभवाचे तोंड पहावे लागणे, हे अनेकदा निराशेला

जन्म  देणारे असते. तशी राजकारणाविषयीची निराशा शंकररावांसमोर उभी राहिली असल्यास नवल नाही.

ज्यांच्यासाठी आणि ज्यांच्या सोबत आपण रात्रंदिवस काम करतो, त्यांनीच आपले- परके असा भेद करायला सुरुवात केली; अशा माणसासोबत काम करण्यात काय अर्थ आहे ? असा प्रश्न शंकररावांना सतावू लागला. नांदेड सोडून हैदराबादेस वास्तव्यास जायचे विचार त्यांच्या मनात घर करू लागले. परंतु ज्येष्ठ काँग्रेस नेत्यांनी आणि

समवयस्क कार्यकर्त्यांनी शंकररावांची समजूत घातली. त्यांना धीर दिला.

अपयश ही यशाची पहिली पायरी असते. जो ती पायरी धीराने ओलांडतो तोच खऱ्या अर्थाने भावी यशाचा मानकरी ठरतो. हे ज्येष्ठांचे अनुभवाचे बोल शंकररावांना पटले. शामरावजी बोधनकर, रंगनाथराव जालनेकर इत्यादिंच्या

सांगण्यावरून शंकररावांनी नांडेड सोडण्याचा आपला विचार मनातून काढुन टाकला.पराजयाने खचून न जाता पुन्हा नव्या जोमाने त्यांनी स्वतःला सार्वजनिक कार्यात झोकून दिले.

# नांदेडचे पहिले नगराध्यक्ष

१९५ २ मध्ये नांदेड नगरपालिकेची पहिली निवडणुक लागली. सर्व पक्ष आणि कार्यकर्ते आपापल्या परीने कामाला लागले. काही हितचिंतकांनी शंकररावांना नगरपालिकेची निवडणुक लढविण्याचा आग्रह धरला ; तर काही संकुचित वृत्तीच्या लोकांनी शंकररावांच्या उमेदवारीला विरोधही केला. जो विरोध होता तो शंकरराव नावाच्या व्यक्तीला होता. त्या व्यक्तीचे उज्वल कार्य विरोधकांनासुद्धा नाकारता येण्यासारखे नव्हते. पक्षासाठी त्यांनी केलेले प्रामाणिक कार्य, काँग्रेस पक्षाच्या विचारसरणीवर असलेली त्यांची अव्यभिचारी निष्ठा, पक्षबांधणीत दिलेले अजोड योगदान आणि पक्षकार्यासाठी त्यांनी उपसलेले ढोरकष्ट कोणीच नाकारू शकत नव्हते. म्हणून शंकररावांना नारसेवक पदासाठी काँग्रेस पक्षातर्फे उमेदवारी देण्यात आली. यांचे प्रतिस्पधी म्हणून वार्ड क्र. नऊ मधून शेषप्पा राखेवार हे उमेदवार होते. निवडणूक खूप अटीतटीची झाली. यावेळीसुद्धा 'स्थानिक' आणि 'बाहेरचा' असा अपप्रचार करण्यात आला. त्यावेळी गुणनिकषावर प्रबळ उमेदवाराविषयी काहीच वाईट बोलणे शक्य नसते. त्यावेळी प्रचारात असा मुद्दा मुद्दाम उकरून काढला जातो. परंतु यावेळी मतदारांनी अशा हिणकस प्रचाराला मुळीच दाद दिली नाही. उलट ३, १८६ मते मिळवून शंकरराव चव्हाण चौफाळा वॉर्डातून विजयी झाले. या निवडणुकीत

एकोणीसपैकी काँग्रेसचे नऊ नगरसेवक निवडून आले. अन्य पक्षांचे सहा तर अपक्ष चार उमेदवार निवडून आले कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमल न मिळाल्यामुळे नगराध्यक्षपदासाठी पुन्हा चुरस निर्माण झाली. काँग्रेस पक्षातर्फे नगराध्यक्षपदासाठी शंकरराव चव्हाणांची उमेदवारी जाहीर करण्यात आली; तर विरोधकांतर्फे नागनाथराव परांजपे यांचे नाव अध्यक्षपदासाठी निश्चित करण्यात आले. अपक्ष नगरसेवकांचा पाठिंबा मिळवून शंकरराव चव्हाण हे नगराध्यक्ष पदासाठी विजयी झाले. नांदेड नगरपालिकेचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष बनण्याचा मान अशा प्रकारे त्यांच्याकडे चालून आला.

स्वातंत्र्याच्या सकाळी झालेली नांदेड नगरपालिकेची ही पहिलीच निवडणूक होती. स्वातंत्र्याकडून आणि लोकनियुक्त पदाधिकाऱ्यांकडून जनतेच्या अनेक अपेक्षा होत्या. नगराध्यक्षपद स्वीकारल्यानंतर शंकररावांनी पहिल्याच भाषणात जाहीर केले, "सत्ता हा शोभेचा अलंकार नसून ते जनसेवेचे प्रभावी साधन आहे. जनसेवेसाठीच जनतेने मला ही अध्यक्षपदाची खुर्ची दिली आहे. या सत्तेमागे जशा जनतेच्या शुभेच्छा आहेत तशाच यापाठीमागे काही अपेक्षाही आहेत, याची मला रास्त जाणीव आहे. मिळालेल्या सत्तेचा उपयोग जनकल्याणासाठीच करीन असा मी आपल्याला विश्वास देतो. मी जो नगराध्यक्ष बनलो तो पहिल्यांदा आणि शेवटचाच. यानंतर दुसऱ्यांदा नगरपालिकेचा अध्यक्ष होण्याची अपेक्षा मी बाळगत नाही. नगराध्यक्ष पदाची ही खुर्ची मी शहराच्या सर्वांगीण

विकासासाठी राबवीन. जोपर्यंत या खुर्चीत आहे तोपर्यंत शहरातील सामान्यातील सामान्य माणसाच्या सुख दुःखाशी मी बांधलेला आहे."

शंकररावांचे हे भाषण केवळ टाळ्या मिळविण्यासाठी नव्हते, तर त्यात अंतःकरणापासूनची तळमळ होती आणि तितकाच प्रामाणिकपणा होता, याचा प्रत्यय नांदेडच्या जनतेला लवकरच आला. शंकररावांनी उच्चारलेला आपला प्रत्येक  शब्द खरा करून दाखविला त्यांची नगराध्यक्षपदाची ती कारकीर्द पहिली आणि शेवटची ठरली. दुसऱ्यादा नगराध्यक्ष होण्याचा मोह त्यांनी बाळगला नाही. नगराध्यक्ष हा नगराच्या विकासासाठी किती झपाटलेपणाने काम करू शकतो, याचा आदर्श शंकररावांनीं आपल्या कृतीतून घालून दिला.

नगराध्यक्ष या नात्याने शंकररावांना शासकीय कामकाजासाठी अनेकवेळा हैदराबादला जावे लागत असे परंतु त्यासाठी त्यांनी कधी जनतेच्या पैशाचा गैरवापर केला नाही. नांदेड ते हैदराबाद हा रेल्वचा प्रवास ते अन्य सर्वसामान्य प्रवाशांच्यासोबत तिसऱ्या वर्गाच्या डब्यातून करत असत. हैदराबादला उतरल्यावर तेथे आपल्या मित्राच्या घरी जात. तेथून भाड्याची सायकल घेऊन ते ऑफिसला जात. अशी ही अध्यक्षपदाची कारकीर्द शंकररावांनी अतिशय साधेपणाने तीन वर्षे चालविली. अलीकडे सामान्यतः सार्वजनिक सत्तेचे एखादे पद हाती आले की जिवाचे चोचले पुरविण्याकडेच आधुनिक जनसेवकांचा कल असतो. मतदार जनतेसाठी आपण

आहोत, याचे या तथाकथित जनसेवकांना मुळी भानही उरत नाही. उलट शंकररावांना ज्या जनतेने ज्या कामासाठी निवडून दिले आणि नगराध्यक्ष पदावर बसविले त्या जनतेचे क्षणभरही विस्मरण झाले नाही. लोकप्रतिनिधी हा कुणी आगळा-वेगळा माणूस नसून तो जनतेच्या हक्कांचा व त्यांच्या पैशाचा विश्वस्त असतो ही कृतज्ञतेची व बांधिलकीची भावना त्यांनी सार्वजनिक जीवनात वावरत असताना भीष्मप्रतिज्ञेसारखी आजन्म मनीमानसी बाळगली आणि या भावनेला अनुसरूनच कृती केली. त्यामुळेच ते जनतेच्या अढळ विश्वासाला आणि आदराला आजन्म पात्र ठरले.

नगराध्यक्ष असताना शंकरराव चव्हाण पहाटे लवकर उठून पाच वाजता सायकलवरून नांदेड शहराचा फेरफटका मारून येत. शहराच्या स्थितीची पाहणी करत आणि मग बरोबर दहा वाजता कार्यालयात हजर होत असत. जिथे पगारी शासकीय कर्मचारीसुद्धा नेमानं दहा वाजता कार्यलयात हजर होत नाहीत, त्या आजच्या विचित्र काळात शंकररावांची ही तत्परता आश्चर्य वाटण्यासारखी असली तरी ती खरी आहे. केवळ कार्यलयात बसून शहरातील समस्यांची जाणीव होणार नाही, त्यासाठी शहरातून स्वतः फेरफटका मारला पाहिजे, अशी जाणीव बाळगणारा शंकररावांसारखा लोकाभिमुख नगराध्यक्ष सापडणे विरळा !

आपल्या नगराध्यक्षपदाच्या कारकीर्दीत, म्हणजे १९५२ ते ५६ या काळात शंकररावांनी नांदेड शहराच्या स्वच्छतेसाठी आणि सार्वजनिक आरोग्याच्यादृष्टीने भूमिगत गटारांची योजना पहिल्यांदा आखली व राबविली. नांदेड

शहर स्वच्छ आणि सुंदर करण्याच्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न केले.

सासरे माधवराव पाटील यांनी भेट दिलेली एक सायकल हीच शंकररावांची एकमेव जंगम मालमत्ता होती. याच सायकलवरून नगरपालिका कार्यालयात जात असत. याच सायकल वरून ते शहराची पाहणी करत असत. एकदा ते असेच सायंकाळच्यावेळी सायकलवरून घरी परत येत असताना त्यांना एका पोलीस हवालदाराने अडवले, कारण काय तर त्यांच्या या सायकलला दिवा नव्हता. वास्तविक शंकरराव आपल्या अध्यक्षपदाचा दबाव टाकून त्या पोलीसापासून स्वतःची सुटका करून घेऊ शकले असते. परंतु त्यांनी तसे न करता आपली चूक कबूल केली. अलीकडच्या काळात अनेक छोटे-मोठे पदाधिकारी आपल्या पदाचा गैरवापर करून शासकीय यंत्रणेला नियम मोडण्यासाठी वेठीस धरतात. अशा या काळात शंकररावांच्या आयुष्यातील हा लहानस प्रसंगदेखील लक्षात घेण्यासारखा आहे. त्या हवालदाराने शंकररावांवर नियमानुसार गुन्हा दाखल केला. न्यायालयाने ठोठावलेला दंड भरून शंकररावांनी ती सायकल सोडवून घेतली. असा हा प्रमाणिकपणा अलीकडच्या काळात दूर्मिळ झाला आहे. आपण जो गुन्हा केला आहे, किंवा जी चूक आपल्या हातून घडली आहे त्याबद्दल प्रांजळ कबुली द्यायची आणि त्यासाठी मिळेल ती शिक्षा भोगायची हा गांधीवादी विचार शंकररावांनी आत्मसात केला होता, नव्हे जीवनात उतरविला होता, हेच या घटनेवरून आपल्या प्रत्ययास येते.

## भ्रष्टाचारावर हल्लाबोल !

भ्रष्टाचाराबद्दल शंकररावांना भयंकर तिटकारा होता. एकेदिवशी सकाळी शंकरराव चव्हाण घरात जेवण करत असताना एक ठेकेदार त्यांच्या घरी आला. शंकरराव घरात असल्याची संधी साधून त्या ठेकेदाराने बाहेरच्या शिपायाला शंकररावांकडे देण्यासाठी एक हजार रूपयांचे एक पाकिट देऊ केले आणि तो ठेकेदार काहीही न बोलता निघून गेला. त्या ठेकेदाराचे काही चुकीचे काम शंकररावांकडे अडकले होते. चुकीच्या कामाला साथ देण्याची किंवा त्याला पाठिशी घालण्याची शंकररावांची प्रकृती नाही हे तो ठेकेदार ओळखून होता. म्हणून त्याने आपले चुकीचे काम करून घेण्यासाठी शंकररावांना एक प्रकारे एक हजार रूपयांची लाच देण्याचा प्रयत्न केला होता.

जेवण आटोपले. शंकरराव बाहेर आले. शिपायाने ते पाकीट शंकररावांच्या हाती दिले. शंकररावांनी त्याबद्दल शिपायाकडे चौकशी केली असता सगळा प्रकार त्यांच्या लक्षात आला. क्षणाचाही विलंब न लावता ते तसेच घराबाहेर पडले. आपल्या अंगावर केवळ पायजामा आणि बनियन आहे हे संतापामुळे त्याच्या लक्षातही आले नाही. अंगात कमीजही न घालता ते तसेच घराबाहेर पडले होते.सायकलवरून त्यांनी कलेक्टर ऑफिस गाठले. त्यावेळी भुजंगराव कुलकर्णी हे नांदेडला कलेक्टर होते. त्यांच्याकडे त्या ठेकेदाराविरुद्ध तक्रार केली. लगेच डी. एस.पी. त्र्यंबकराव

पातुरकर यांच्याकडे जाऊन त्या ठेकेदाराविरुद्ध रीतसर गुन्हा नोंदविला. प्रश्न पैशाचा नव्हता तर तत्वाचा होता. एकदा का तत्व म्हणून स्वीकारले की शंकररावांनी ते जन्मभर व्रत म्हणुन चालविले. भ्रष्टाचाराविरोधात लढणारी अशी व्रतस्थ माणसे आज दुर्मिळ होत चालली आहेत, याची खंत वाटते. भ्रष्टाचाराबद्दल आणि भ्रष्टाचारी व्यक्तींबद्दल शंकररावांच्या मनात किती तीव्र तिटकारा होता, हेच या प्रसंग्रावरून आपल्या लक्षात येते.

आपल्या देशात आजवर भ्रष्टाचाराच्या आरोपावरून आणि बेहिशोबी मालमत्ता जमविल्यावरून अनेक सत्ताधारी माणसे वादाच्या भोवऱ्यात सापडली आहेत. बदनाम झाली आहेत. प्रसंगी पदभ्रष्टही झाली आहेत. परंतु शंकररावांकडे या बाबतीत कधी कोणी विरोधकही बोट दाखवू शकले नाहीत. पन्नास वर्षे सत्तेत राहूनही शंकररावजी निष्कलंक राहिले. या बाबतीत शंकररावांना कमलपत्राचीच उपमा देता येईल.

“भ्रष्टाचाराशी मुकाबला करण्याचे बळ मला परमेश्वरानेच दिले. त्यानेच माझी लाज राखली,” अशा शब्दात शंकररावजी ईश्वराविषयी कृतज्ञता व्यक्त करत.

नांदेड नगरीचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष म्हणूनन शंकररावांनी शहराच्या शैक्षणिक विकासाला प्राधान्य दिले. शहराचे आरोग्य, शिक्षण, सार्वजनिक स्वच्छता इत्यादी उपक्रम राबवायचे तर नगरपालिकेच्या तिजोरीत पुरेसा पैसा असावा लागतो. तो नसेल तर सगळ्याच कल्याणकारी योजना बासनात गुंडाळून ठेवाव्या लागतात. आजच्याप्रमाणे

त्या काळी नगरपालिकांना कोणतेही शासकीय अनुदान मिळत नसे. जो खर्च करावयाचा तो जनतेकडून कराच्या रूपात मिळालेल्या उत्पनातूनच करावा लागत असे. नांदेड नगरपालिकेचे असे उत्पनही तुटपुंजे होते. त्यातून विकासकामांना

गती देणे अवघड होते. म्हणून शंकररावांनी नगरपालिकेतर्फे घरांना घरपट्टी लावावी असा प्रस्ताव मांडला. या कल्पनेला प्रचंड विरोध झाला. तरीपण कर बसवण्याशिवाय पर्याय नव्हता. कराशिवाय नगरपालिकेला उत्पनाचे दुसरे साधनही नव्हते. सगळ्यांचा विरोध पत्करून शहराच्या विकासासाठी शंकररावांनी कर आकारणीचा कटू निर्णय घेतला. त्याचा परिणाम असा झाला की शंकररावांवर अविश्वास ठराव दाखल करण्यापर्यंत विरोधकांची मजल गेली. अर्थात तो ठराव पुढे बारगळला हा भाग वेगळा! लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक असणारा निर्णय कटू वाटला, तरी आणि विरोधांची तमा न बाळगता करण्याची त्यांची हीच वृत्ती अखेरपर्यंत कायम रहिली.

शंकरराव चव्हाण हे त्यावेळी उस्मानशाही मीलमध्ये काम करणाऱ्या कामगारांचे एक प्रभावी नेते होते. शंकररावांनी काँग्रेसप्रणीत इंटक ही कामगार संघटना स्थापन केली एवढेच नव्हे तर कामगारांचे नेते म्हणून त्यांच्या विकासाची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली. त्या कामगारांसमोर निवासंस्थानांची समस्या होती. ही समस्या सोडविण्यासाठी त्यांनी लेबर कॉलनी ही कामगारांची वसाहत उभी केली. ग्रामीण भागात अशी कामगार वसाहत

उभी करणारे शंकरराव हे पहिलेच लोकनेते आणि त्यांनी वसविलेली ही वसाहतही पहिलीच. केवळ वसाहत उभी करून प्रश्न मिटत नाही, तर त्या कामगारांचे जीवनमान उंचवावे लागते . त्या वसाहतीत आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतात. अशा सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शंकररावांनी आटोकाट प्रयत्न केले' आज हि लेबर कॉलनी नांदेड शहराच्या हृदयस्थानी आली असून शंकररावांच्या कामागाभिमुख कर्तबगारीची साक्ष देत उभी आहे. शंकरराव हे कामगारांचे केवळ पुढारी नव्हते तर त्यांच्या हिताची काळजी वाहणारे नेते होते, याची यावरून साक्ष पटते. शंकरराव कामगारांच्या सुखदुःखात आत्मियतेने सहभागी होत असत, म्हणूनच त्या कामगारांना शंकरराव हे आपला त्राता वाटत असत.

शंकररावांच्या प्रयत्नांमुळे नांदेडला शाखकीय तंत्रनिकेतनची मान्यता मिळाली आज या जागेत विकसित झालेले शासकीय तंत्रनिकेतन हे शंकररावांच्या दूरदृष्टीचे उत्तम उदाहरण होय.

केवळ भौतिक विकास म्हणजे सर्वस्व नव्हे तर शहराचा शैक्षणिक, बौद्धिक व सांस्कृतिक विकास व्हावा असा ध्यास शंकररावांनी घेतला होता. शहराचा औद्योगिक विकास होत असतानाच शहरातील नागरिक सुसंस्कृत व्हावेत, त्यांचा बौद्धिक स्तर उंचवावा, सुशिक्षितांना वाचनाची आवड लागावी यासाठी शंकररावांनी हैदराबादच्या लोकल गव्हर्नमेंटकडे वारंवार अर्ज विनंत्या करून आणि अथक प्रयत्न करून नांदेड नगरपालिकेतर्फे एक अभ्यासिका

सुरू केली. शंकररावांनी नांदेड नगरपालिकेच्या माध्यमातून सुरू केलेले वाचनालयाचे हे मराठवाड्यातील अशाप्रकारचे पहिले वाचनालय समजले जाते. या वाचनालयाचे उद्घाटन १५ ऑगस्ट १९५३ रोजी तत्कालीन जिल्हाधिकारी श्री विद्यालंकार यांच्याहस्ते झाले. शंकररावांचे आणखी एक स्वप्न साकार झाले.

शंकररावांनी पूढाकार घेऊन दि . २ जुलै १९५३ रोजी नांदेड येथे मराठवाड्यातील सर्व नागराध्यक्षांचे अधिवेशन भरविले. या अधिवेशनाला औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, परभणी, हिंगोली येथील नगराध्यक्ष उपस्थित होते. या अधिवेशनात नगरपालिकांना जाणवणाऱ्या समस्या, नगरपालिकेने हाती घ्यावयाची विकासकामे, मिळणारा अपुरा निधी यावर सांगोपांग चर्चा घडवून आणली आपल्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत शंकररावांनी भूमिगत गटार व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सार्वजनिक बाग, सार्वजनिक वाचनालय, दवाखाने, कचराकुंड्या इत्यादी सुविधा उपलब्ध करून दिल्या. हे करत असताना एका पैशाचा अपहार केला नाही किंवा कुणाला अपहार करू दिला नाही. किंबहुना ‘मी भ्रष्टाचार करणार नाही आणि कुणालाही करू देणार नाही’ हे असिधाराव्रत शंकररावांनी आजन्म सांभाळले. म्हणूनच या चारित्र्यसंपन्न जनसेवकाच्या कर्तृत्वाची  कमान निरंतर चढतीवाढती राहिली.

## महसूल खात्याचे उपमंत्री

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या रत्नपारखी नजरेतून शंकरराव चव्हाणांचे लक्षणीय कार्य सुटले नाही. १९५६ साली यशवंतरावांनी शंकररावांना मुंबईला बोलविले आणि आपल्या मंत्रिमंडळात महसूल खात्याचे उपमंत्री म्हणून शंकररावांची नियुक्ती केली. ज्यावेळी शंकरराव महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात महसूल खात्याचे उपमंत्री झाले त्यावेळी ते महाराष्ट्र विधिमंडळाच्या कोणत्याही सभागृहाचे सभासद नव्हते. १९५६ ते १९६० या काळात शंकरराव चव्हाण महाराट्र मंत्रिमंडळात महसूल खात्याचे उपमंत्री म्हणून कार्यरत होते. या काळात त्यांनी महसूल खात्याच्या कार्यपद्धतीचा मुळातून अभ्यास केला. आपल्या अंगभूत अभ्यासू वृत्तीमुळे, अथक काम करण्याच्या जिद्दीमुळे, जनताभिमुख पुरोगामी विचारसरणीमुळे आणि खंबीर प्रशासकीय कार्यशैलीमुळे त्यांनी महसूल खात्यामध्ये आपला दबदबा निर्माण केला. महसूल खात्यामध्ये शिस्त आणली.

शंकररावांच्या कार्यपद्धतीबद्दलचा एक किस्सा इथे सांगण्यासारखा आहे:

मुंबईचे प्रसिद्ध उद्योगपती श्री रावसाहेव गोगटे यांनी नुकताच उद्योग व्यवसाय सुरू केला होता. अनवधानाने म्हणा, त्यांच्या त्या व्यवसायात काही बारीकशी चूक झाली

होती. उद्योगक्षेत्रातील गुंतागुंतीच्या कायद्याकडे व नियमांकडे

दुर्लक्ष झाल्यामुळे एका शासकीय अधिकाऱ्याने रावसाहेब गोगटे यांना एक लाख रुपये दंडाची शिक्षा ठोठावली होती. आपण आपला नव्यानेच उभारलेला उद्योग व्यवसाय संपूर्ण विकला तरी ही दंडाची रक्कम भरू शकणार नाही, अशी विनंती रावसाहेव गोगटे यांनी त्या अधिकाऱ्याला केली. परंतु नियमावर बोट ठेवणाऱ्या त्या छिद्रान्वेषी अधिकाऱ्याने श्री गोगटे यांची ती विनंती धूडकावून लावली. अखेर नव्यानेच महसूल खात्याचे उपमंत्री झालेल्या शंकरराव चव्हाणासमोर हे प्रकरण आले. शंकररावांनी आपल्या मूळ प्रकृतीनुसार त्या सबंध प्रकरणाचा बारकाईने अभ्यास केला. त्यांच्या असे लक्षात आले, की तो अधिकारी सांगतो इतके ते प्रकरण गंभीर नाही. रावसाहेव गोगटे यांना एक लाख रुपये दंड लावावा अशी काही परिस्थिती नाही. हे शंकररावांच्या चाणाक्ष नजरेने हेरले. दुसऱ्या दिवशी शंकररावांनी त्या नियमावर बोट ठेवणाऱ्या अधिकाऱ्याला बोलावून घेतले.

शंकररावांनी विचारले, “आपल्या खात्याकडे सरकारने कोणते काम सोपविले आहे? महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला विधायकदृष्टीने मदत करायची की तांत्रिक कारणे दाखवून नव्यानेच उद्योगाच्या क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या लोकांना उद्योग उभारण्यापासून परावृत्त करायचे ?”

शंकररावजींच्या या थेट प्रश्नाने तो अधिकारी अंतर्मुख बनला. त्याची चूक त्याच्या लक्षात आली. शंकररावजींचा नवीन उद्योगधंद्याविषयीचा स्वागतशील व पुरोगामी दृष्टिकोन त्या अधिकाऱ्याच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. रावसाहेब गोगटे यांना ठोठावलेली एक लाख रुपये दंडाची शिक्षा रद्द करण्यात आली.

प्रसंग तसा साधाच आहे, परंतु एखाद्या बारीकशा गोष्टीचा बाऊ करून अधिकारी मंडळी लोकांची कशी पदोपदी अडवणूक करते हे शंकररावांनी हेरले होते. अशा साध्या प्रसंगातूनही शंकरराव चव्हाणांची महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाच्या संदर्भातली तळमळ आणि आस्था लक्षात येते.

## थेट पंतप्रधानांची भेट

महसूल उपमंत्री असताना शंकरराव चव्हाणांनी महाराष्ट्रातील तथाकथित बड्या मंडळींनी घेतलेले पक्षपाती निर्णय आणि जनहितविरोधी धोरणे याला उघड आव्हान दिले होते. याच काळात महाराष्ट्रात कूळ कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली होती. या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी व्हावी, अपवाद म्हणून या कायद्यातून कुणालाही सूट मिळता कामा नये असा शंकरराव चव्हाणांचा आग्रह होता. मुंबईतील जॅक कंपनीकडे मोठी जमीन होती. या कंपनीला कूळ कायद्यात सूट देऊन महाराष्ट्र सरकारने त्यांच्याकडची जमीन काढून न घेता ती त्यांच्याकडेच ठेवली होती. ही घटना तशी पक्षपाती आणि सामान्य शेतकऱ्याच्या दृष्टीने ती अन्यायकारक होती. या कायद्यानुसार साठ एकरपेक्षा जादा जमीन असलेल्या शेतकऱ्यांकडून ती जमीन काढून घेतली जात होती आणि त्याचवेळी पाच हजार एकरापेक्षा अधिक जमीन असलेल्या जॅक कंपनीला कायद्यातून सूट दिली होती.

एकीकडे सामान्य शेतकऱ्यासाठी कमाल जमीन धारणेचा आग्रह धरायचा आणि दुसरीकडे पाच हजार एकरपेक्षा अधिक जमीन असणाऱ्या कंपनीला कायद्यातून सूट द्यायची, हा सरळसरळ पक्षपात होता. महाराष्ट्र शासनाची भेदाभेद करणारी ही भूमिका समानतावादी विचारसरणीच्या शंकरराव चव्हाणांना पटणे शक्यच नव्हते.

मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आणि शासनाच्या पक्षपाती धोरणाला कडाडून विरोध केला. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण आणि वसंतराव नाईक यांना भेटून त्यांनी आपला या पक्षपाताला असलेला विरोध नोंदवला. परंतु उभयतांनी शंकररावांचा हा विरोध फारसा गंभीरपणा घेतला नाही.

शंकरराव चव्हाण मुख्यमंत्र्यांना म्हणाले, "आपली परवानगी असेल तर मी या संदर्भात पक्षश्रेष्ठींशी बोलेन."

यशवंतराव चव्हाण आणि वसंतराव नाईक यांना वाटले की, शंकरराव चव्हाण हे मंत्रिमंडळात अगदीच नवखे आहेत. ते काय हाय कमांडला भेटणार आणि त्यांच्याशी बोलणार ?

त्यांनी सांगितले, "तुमची इच्छा असेल तर तुम्ही पक्षश्रेष्ठींशी या विषयावर बोलू शकता. तुम्हाला आमची पूर्ण परवानागी आहे."

या उभयनेत्यांना शंकररावजींच्या जिद्दीची त्यावेळी कल्पना नसावी कदाचित. शंकररावजींनी दिल्लीला जाऊन भारतीय नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष श्री गुलजारीलाल नंदा यांची भेट घेतली. कमाल जमीनधारणा कायद्यावर त्यांच्याशी चर्चा केली. महाराष्ट्र शासनाने जॅक या कंपनीला कायद्यात सूट देऊन पाच हजार एकर जमीन बाळगण्याचा अधिकार दिला आहे. सरकारचे हे धोरण पक्षपाती असून या गोष्टीला आपला विरोध आहे, असे ठासून सांगीतले.

"जॅक कंपनीला तिची सर्व जमीन कायम ठेवण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. त्यात काहीही बदल होणार नाही." नंदा यांनी स्पष्टपणे सांगीतले.

वास्तविक पक्षश्रेष्ठी असा काही निर्णय देतील असे शंकररावजींना वाटले नव्हते त्यांना श्रेष्ठींकडून अनुकूल अभिप्रायाची अपेक्षा होती. आपली बाजू समतेची व न्यायाची असून ती उचलून धरली जाईल, आपली पाठराखण केली जाईल,आपल्या जिद्दीचे व अभ्यासूपणाचे कौतुक होईल अशी आशा होती. परंतु घडले ते नेमके उलटे आणि अपेक्षाभंग करणारे परंतु शंकररावजी नाराज झाले नाहीत. त्यांचे मनोधैर्य जरासुद्धा खचले नाही. उलट त्यांनी या विषयावर पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याशी चर्चा करण्याची इच्छा व्यक्त केली.

ठरल्याप्रमाणे नेहरूजींची भेट घेतली. महाराष्टातील परिस्थिती नेहरूजींना कथन केली. शंकररावांच्या अभ्यासू, जिद्दी आणि चिकाटीच्या स्यभावामुळे तसेच विषयाच्या पद्धतशीर मांडणीमुळे पंडित नेहरू अतिशय प्रभावित झाले. शंकररावांची भूमिका न्याय्य असल्याचे नेहरूजींच्या लक्षाल आले. त्यामुळे पुढच्या सर्व गोष्टी शंकरराव चव्हाणांच्या बाजूने घडल्या. जॅक कंपनीच्या बाबतीत महाराष्ट्र सरकारने घेतलेला निर्णय अखेर सरकारला बदलावा लागला. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण आणि मंत्रिमंडळतील अन्य सहकारी मंत्री शंकारावजींच्या जिद्दीने कमालीचे प्रभावित झाले. सहकाऱ्यांना शंकररावांच्या व्यक्तिमत्त्वातील या पैलूचा प्रथमच परिचय झाला होता. आपल्या मुख्यमंत्र्यांचा, ज्येष्ठ

मंत्र्यांचा आणि नियोजन आयोगाच्या उपाध्यक्षांचा विरोध पत्करून एका उपमंत्र्याने थेट पंतप्रधानांशी संवाद साधून आपली

भूमिका त्यांच्या गळी उतरविणे ही साधी सोपी गोष्ट नव्हती.

## एका डोळ्यात हासू . . . . .

१९५७ मध्ये महाराष्ट्रात विधिमंडळाची दुसरी सार्वत्रिक निवडणूक झाली. या निवडणूकीत नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद मतदारसंघातून शंकरराव चव्हाण यांनी निवडणूक लढविली आणि निवडणुकीत सुमारे २५० रूपये खर्च करून ते प्रचंड मतांनी विजयी झाले. ऐन निवडणुकीच्या धामधुमीच्या काळात शंकररावजींचा मुलगा शिवाजी हा आजारी पडला. त्यावेळी तो जेमतेम दीड वर्षाचा असावा. एकीकडे निवडणुकीतील ताण वाढत होता आणि दुसरीकडे शिवाजीची प्रकृती वरचेवर खालावू लागल्यामुळे शंकररावजींच्या घरातील वातावरण आणखी गंभीर बनत चालले होते. एके दिवशी रात्री शिवाजीवर काळाने झडप घातली. एकीकडे निवडणुकीतील लखलखीत यश तर दुसरीकडे पहिल्या पुत्राच्या वियोगाचे काळीज करपून टाकणारे दुःख अशा सुख-दुःखाच्या हिंदाळ्यावर शंकररावजींचे आयुष्य झोके घेत होते.

दरम्यान संयुक्त महाराष्ट्राची चळवळ झाली. १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली यशवंतराव चव्हाण यांच्या नेवृत्वाखाली स्थापन झालेल्या संयुक्त महाराष्ट्राच्या पहिल्या मंत्रिमंडळात शंकरराव चव्हाण दुसऱ्यांदा दाखल झाले. आता त्यांच्याकडे पाटबंधारे व ऊर्जा या खात्यांचा कार्यभार सोपविण्यात आला. शंकररावजींनी आपले कुटुंब मुंबईला हलविले. मुंबईतील

वास्तव्यात सौ. कुसुमताईंनी दि. २८-१०-१९५८ रोजी अशोक ह्या पुत्ररत्नाला जन्म दिला. अशाप्रकारे सौ. कुसुमताई आणि शंकरराव यांचा सुखाचा संसार फुलत गेला.

## पाटबंधारेमंत्री म्हणून कार्य

शंकरराव चव्हाणांचे चरित्र म्हणजे महाराष्ट्राच्या पाटबंधारे क्षेत्राचा विकास आणि महाराष्ट्राच्या सिंचन योजनांचा इतिहास म्हणजे शंकरराव चव्हाणांचे चरित्र होय, असे म्हटले तर ते फारसे वावगे किंवा अतिशयोक्तीचे होणार नाही. कारण शंकरराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचे पाटबंधारेमंत्री म्हणून बारा वर्षे काम पाहिले. दुसऱ्यांदा जेव्हा शंकररावजी मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांनी पाटबंधारे खात्याचा कारभार स्वतःकडेच ठेवला होता. पाटबंधारे खात्याच्या मंत्रिपदाचा कारभार स्वीकारल्यानंतर शंकरराव चव्हाणांनी महाराष्ट्रातील सर्व नद्यांच्या खोऱ्यांचा जलसिंचनाच्या अंगाने एखाद्या संशोधक-अभ्यासकाला शोभेल असा सखोल अभ्यास केला. कारण महाराष्ट्राला बागायतीच्या माध्यमातून सुजलाम् सुफलाम करणे हे त्यांचे स्वप्न होते.

महाराष्ट्राच्या पाटबंधारे विभागचे दोन विभाग काल्पिले जातात. पहिला कृष्णा खोऱ्याचा आणि दुसरा गोदावरीचे खोऱ्याचा. कृष्णा नदीवर झालेल्या धरणामुळे पश्चिम महाराष्ट्राच्या कृषी व औद्योगिक क्षेत्राचा कायापालट झाला. त्याच धर्तीवर गोदावरी नदीवर धरण बांधले तर शतकानुशतके भाळी मागासलेपणाचा कलंक सांभाळणाऱ्या मराठवाड्याचाही कायापालट होईल, असा विश्वास शंकररावजींना वाटत होता. म्हणून शंकररावजींनी भूमी

आणि जलव्यवस्थापन संस्था (वाल्मी) स्थापन करून जलव्यवस्थापनाच्या कार्याला चालना दिली. जल हेच जीवन आहे आणि हेच पश्चिम महाराष्ट्राच्या प्रगतीचे गुपित आहे, हे शंकररावजींच्या चाणाक्ष नजरेने वेळीच हेरले होते.

गोदावरी नदीच्या खोऱ्याचा एखाद्या अभियंत्याच्या नजरेने अभ्यास करून पैठणजवळ धरण बांधण्याचा संकल्प त्यांनी सोडला. हे धरण 'नाथसागर' या नावाने ओळखले जाते. शंकररावांनी भागिरथ प्रयत्नाने पैठणला कृत्रिम-मानवनिर्मित-सागर निर्माण केला आणि त्या धरणाचे 'नाथसागर' हे नाव सार्थ झाले.

शंकरराव चव्हाणांनी केवळ नवीन धरणेच बांधली असे नव्हे तर जे प्रकल्प अस्तित्वात होते त्यांच्या डागडुजीचे कामही हाती घेतले. ज्या तलावांमध्ये गाळ साचला आहे आणि त्या तलावांची पाणी साठवणक्षमता कमी झाली आहे अशा तलावांच्या दुरूस्तीची कामे प्राधान्यक्रमाने हाती घेऊन ती पूर्ण केली. त्यासाठी शंकररावजींनी महाराष्ट्राच्या विधिमंडळात एक ठरावच पास करून घेतला होता. त्या ठरावानुसार तलावातील गाळ काढण्यासाठी राज्यसरकार ग्रामपंचायतींना ५०

टक्के अनुदान देईल आणि उर्वरित ५० टक्के खर्च लोकवार्गणीतून करावयाचा होता. ज्या तलावांची सिंचनक्षमता २५० एकरपेक्षा जास्त असेल त्या तलावांच्या दुरुस्तीचा खर्च पूर्णतः महाराष्ट्र सरकार करील. शंकररावांनी हा ठराव पास करून घेतल्यामुळे राज्यातील शेकडो जुने तलाव साठवणक्षम बनले. याचा फायदा लाखो

शेतकऱ्यांना झाला. परिणामी महाराष्ट्राच्या सिंचनक्षेत्रात लक्षणीय वाढ झाली.

या ठरावानुसार विदर्भीतील ३०० तलावांची दुरूस्ती करण्यात आली. १९७५ पर्यंत शंकरराव चव्हाणांनी भंडारा आणि चंदपूर जिल्ह्यांतील जवळजवळ १००० मालगुजारी तलावांची दुरूस्ती करून घेतली. अशा तलावांच्या डागडुजीमुळे

विदर्भातील लाखो एकर जमिनीला पाणी मिळू शकले. विदर्भीतील शेतकऱ्यांचे दैन्य दूर होण्यास फार मोठा हातभार लागला. शंकररावांनी केवळ मराठवाड्याच्या विकासावर लक्ष केंद्रित केले होते, असा आरोप काही लोक हेतुतः करीत असत. परंतु या आरोपात काही तथ्य नाही हे वेळोवेळी पुराव्यानिशी सिद्ध झाले आहे. शंकररावांनी विकासकामांच्या बाबतीत कधीही तालुका किंवा जिल्हा हा घटक गृहीत धरला नाही. हा आपला भाग आहे आणि तो परका भाग आहे, असा विचार चुकूनही त्यांच्या अंतःकरणाला कधी शिवला नाही. एखादा पाटबंधारे प्रकल्प कोणत्या तालुक्यात किंवा जिल्ह्यात होतो ही बाब शंकररावांच्या दृष्टीने कमी महत्त्वाची होती. महाराष्ट्राच्या कोणत्या भागात तो प्रकल्प होतो हेही महत्त्वाचे नव्हते, तर त्या प्रकल्पाच्या माध्यमातून राज्याचा आणि एकूणच राष्ट्राचा विकास होणार आहे, हे त्यांच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे होते मराठवाड्याचा विकास करणे हे त्यांचे जीवितध्येय असणे स्वाभाविक होते. कारण मराठवाडा ही त्यांची जन्मभूमी होती. परंतु म्हणून काही त्यांनी उर्वरित महाराप्ट्रच्या विकासाकडे अजाणतेपणीही

कधी दुर्लक्ष होऊ दिले नाही. किंबहुना विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण ह्या महाराष्ट्राच्या चारही अंगाचा समतोल विकास व्हावा असाच व्यापक दृष्टिकोन शंकररावांनी बाळगला आणि त्यासाठी त्यांनी अथक प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

शंकरराव चव्हाणांनी महाराष्ट्राचे पाटबंधारे मंत्री आणि मुख्यमंत्री म्हणून राज्यातील लघु व मध्यम प्रकल्प आपल्या अधिकारात मार्गी लावले. परंतु मोठ्या प्रकल्पांची कामे राज्याच्या निधीतून पूर्ण होणे शक्य नव्हते. त्यासाठी अशा अनेक प्रकल्पांची पाहणी करून व त्यांचे आराखडे तयार करून ते केंद्र सरकारच्या मंजुरीसाठी पाठवून दिले. गोदावरी खोऱ्यातील मोठ्या प्रकल्यांच्या विकासासाठी ८० कोटी रुपयांची आवश्यकता होती. भीमा प्रकल्यासाठी ४५ कोटी रुपयांची गरज होती तर दूधगंगा प्रकल्पाचे अंदाजपत्रक ३५ कोटी रुपयांचे होते. एवढे सगळे प्रकल्प महाराष्ट्र सरकारला स्वबळावर पूर्ण करणे केवळ अशक्य होते. कारण भांडवलाचा तुटवडा होता. असे बृहत् प्रकल्प केवळ केंद्र सरकारकडे पाठवून शंकररावजी स्वस्थ राहिले नाहीत, तर त्यांनी केंद्र सरकारकडे या प्रकल्पांच्या मंजुरीसाठी सातत्याने पाठपुरावा केला.

महाराष्ट्रमध्ये सिंचन प्रकल्प तातडीने हाती घेणे किती आवश्यक आहे हे त्यांनी वित्त आयोनाला पटबवून दिले. आपल्या खास शैलीने या प्रकल्पांचे महत्त्व केंद्र सरकारच्या गळी उतरविण्यात शंकररावजी यशस्वी ठरले. शंकररावजींनी या प्रकल्पांना केंद्र सरकारची मान्यता तर

मिळवून घेतलीच, शिवाय प्रकल्पांसाठी आवश्यक असलेला निधीही उपलब्ध करून घेतला. कोणत्याही प्रदेशाचा विकास हा त्या प्रदेशात विकसित झालेल्या जागत व जबाबदार नेवृत्त्वाच्या क्षमतेवर अवलंबून असतो. नेतृत्व जर दिशाहीन व दुर्बल असेल, त्याला विकासकार्याची जाण नसेल तर त्या भागाच्या विकासाच्या वाटा खुंटतात. याउलट नेवृत्व जर द्रष्टे आणि बुद्धिमान असेल तर त्या विभागाचे भाग्य उदयास येते. याचे आदर्श उदाहरण म्हणजे शंकरराव चव्हाण होत. त्यांनी महाराष्ट्राच्या पाटबंधारे विकासासाठी केंद्र सरकारकडून जशा योजना वेचून आणल्या तशा सर्व शक्ती पणाला लावून त्या खेचूनही आणल्या.

प्रत्येक माणसाला आपल्या आयुष्यात स्वतःच्या आणि इतरांच्या विकासाची संधी कधी ना कधी चालून येत असते. परंतु प्रत्येकच माणूस त्या संधीचा यथातथ्य लाभ उठवतो असे नाही. शंकररावजींनी मात्र समोर चालून आलेल्या प्रत्येक संधीचे अक्षरशः सोने केले. पाटबंधारे क्षेत्रात शंकररावांनी केलेल्या अफाट कार्यकर्वृत्वाचा आणि राजकीय इच्छाशक्तीचा अनुभव या महाराष्ट्राने घेलला आहे. पाण्याचे शास्त्रशुद्ध नियोजन आणि जलसिंचनाच्या क्षेत्राचा समतोल विकास हा शंकरराव चव्हाणांच्या कार्यशैलीचा व द्रष्टेपणाचा महत्त्वपूर्ण विशेष होय. हाती घेतलेले प्रकल्प किंवा पाटबंधारे योजना उत्कृष्ट, दर्जेदार आणि दीर्घजीवी व्हाव्यात, त्यात कोणतेही तांत्रिक दोष राहू नयेत, यासाठी शंकरराव चव्हाण पाटबंधारे खात्यातील अधिकाऱ्यांच्या नियमित बैठका आयोजित करत असत. या बैठकांना लोकप्रतिनिधी आणि

सुजाण नागरिकांना मुद्दाम निमंत्रित केले जात असे. या बैठकीमध्ये प्रकल्पांच्या पूर्ततेसाठी अधिकाऱ्यांना जाणवणाऱ्या अडचणी, त्यांनी केलेले नियोजन, त्यांच्या कामाची पद्धत, भविष्यात त्या प्रकल्पामुळे होणारा फायदा आदी बाबींवर सखोल चर्चा होत असे. लोकप्रतिनिधींकडून आलेल्या सूचनांचेही स्वागत केले जात असे. अशा प्रकारच्या नियमित बैठका घेणारे शंकरराव चव्हाण हे महराष्ट्रातील एकमेव पाटबंधारे मंत्री होते, असे म्हटले तर ते फारसे अतिशयोक्तीचे होणार नाही. सुसंवादावर शंकररावजींचा विशेष भर होता. चर्चेतून प्रश्न सुटू शकताल, अडचणी दूर करता येतात, यावर त्यांचा दृढ विश्वास होता.

शंकरराव चव्हाण महाराष्ट्राचे पाटबंधारेमंत्री असताना दि. ८ मार्च १९६४ रोजी महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या दोन राज्यांमध्ये जलसिंचन आणि विद्युतनिर्मिती या विषयावर एक करार झाला. हा करार वाघ, पेंच, करबंदा, तापी प्रकल्प करार या नावाने ओळखला जातो. या करारातून उभ्या राहिलेल्या प्रकल्पामुळे या दोन्ही राज्यांमध्ये हरितक्रांती घडून आली.

महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री वसंतराव नाईक यांनी विधिमंडळात या कराराची माहिती देताना पाटबंधारे मंत्री शंकरराव चव्हाण यांच्या भूमिकेचा गौरव केला. ते म्हणाले की, हा करार घडवून आणण्यात आमचे पाटबंधारे मंत्री श्री शंकरराव चव्हाण यांनी केलेली कामगिरी ही अतिशय महत्त्वाची असून या कामागिरीबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन करणे अत्यंत आवश्यक आहे असे मला

वाटते. या करारातील महाराष्ट्राची बाजू व त्यातील तांत्रिक आणि प्रशासकीय बारकाव्यांसह केंद्र सरकारला पटवून देण्याचे काम जे आमच्या इंजिनीअर्सना आणि पाटबंधारे खात्याच्या सचिवांनाही जमले नाही; ते अवघड काम शंकरराव चव्हाणांनी करून दाखविले. अशा शब्दात मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी शंकररावजींच्या कार्यकर्वृत्वाचा यथोचित शब्दांत गौरव केला. अशाप्रकारे महाराष्ट्र विधिमंडळाचे नेते आणि मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्याकडून पाटबंधारेमंत्री शंकरराव चव्हाण यांना प्रशस्ती मिळाली.

शंकरराव चव्हाणांच्या पुढाकाराने हा करार आणि त्या करारानुसार तापी, पेंच, वाघ हा प्रकल्प पूर्णत्वास जाऊ शकला या प्रकल्पामुळे हजारो एकर जमीन ओलिताखाली येऊ शकली. या प्रकल्पातून होणाऱ्या विद्युत निर्मितीमुळे परिसरात अनेक लहान-मोठे उद्योग उभे राहू शकले. राज्याच्या कृषी व औद्योगिक उत्पादनात बऱ्यापैकी वाढ झाली. कोरडवाहू शेतीत रात्रदिवस राबणाऱ्या आणि तरीही लहरी निसर्गावर अवलंबून असलेल्या पराधीन शेतकऱ्यांना या प्रकल्पामुळे दिलासा मिळाला शंकररावांच्या या दूरदृष्टीचे कौतुक केवळ पक्षातील नेत्यांनीच नव्हे तर विरोधीपक्षातील नेत्यांनीसुद्धा वेळोवेळी केले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात विदर्भ आणि मराठवाडा संयुक्त महाराष्ट्रात बिनशर्त सामील झाले. परंतु या भागांचा व्हावा तसा विकास झाला नव्हता. या असमतोल विकासाचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दांडेकर समिती

नियुक्त केली होती. या सत्यशोधन समितीने जो अहवाल शासनाला सादर केला त्या अहवालाचा अभ्यास शंकररावांनी स्वतः केला. मागासलेल्या भागाचा अविकसितपणा दूर करण्यासाठी त्या भागात जलसिंचन प्रकल्प मोठ्या प्रमाणात उभे राहिले पाहिजेत, असा शंकररावजींचा आग्रह होता. त्यासाठी त्यांनी पाटबंधारे मंत्री आणि मुख्यमंत्री म्हणून मागास भागांसाठी अनेक पाटबंधारे प्रकल्प हाती घेतले. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत करबंद योजना, गंगापूर स्टेज योजना, कर्णूर योजना, काळ योजना, मालेगाव, भोणी, गावगंगा, सामखेडा, भनागर, धिरणी, वांझरे, तुळशी इत्यादी योजना कार्यान्वित केल्या. आपल्या कारकीर्दीत बारा मध्यम प्रकल्प पूर्ण करून त्यांनी ते राष्ट्रास अर्पण केले.

शंकरराव चव्हाणांनी अभ्यासपूर्वक जे पाटबंधारे प्रकल्पांचे आराखडे तयार केले आणि मंजुरीसाठी केंद्र सरकारकडे पाठविले, त्यात कोणतेही तांत्रिक किंवा शास्त्रीय दोष राहू नयेत यासाठी त्यांनी कटाक्षाने खबरदारी घेतली. निर्दोष, व्यवहार्य व फलदायी नियोजन हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे ठळक वैशिष्ट्य होते. पाटबंधारे खात्यातील विषयांचा शंकररावजींचा अभ्यास इतका सखोल आणि सूक्ष्म होता की, त्यांचा तो अभ्यास पाहून तांत्रिक बाबतीतील कार्यकारी अभियंतेसुद्धा अनेकवेळा स्तिमित होत असत. प्रशासकीय क्षेत्रावर त्यांची पकड इतकी मजबूत होती की, त्यांच्यासमोर जाताना कोणत्याही अधिकाऱ्याला आधी गृहपाठ करून आणि पुरेशी तयारी करूनच शंकररावांसमोर

जावे लागत असे. त्यांना कामचलावूपणा मुळीच खपत नसे. शंकररावजी अशा एखाद्या प्रश्नात उपप्रश्न विचारून त्या अधिकाऱ्याची केव्हा फिरकी घेतील आणि त्याचे पाणी जोखतील याचा भरवसा नसे.

शंकरराव चव्हाण पाटबंधारे मंत्री होण्यापूर्वी दरवर्षी महाराष्ट्राच्या पाटबंधारे क्षेत्रावर सामान्यतः २५ कोटी रुपये एवढा खर्च होत असे. तो पुरेसा नाही हे शंकररावांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यासाठी वर्षीकाठी किमान ७५ ते १०० कोटी रुपयांची तरतूद करावी असा आग्रह त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे धरला. अशा प्रकारे १९६५ पासून १९८० पर्यंत ह्या १४ वर्षींच्या कालावधीत महाराष्ट्राचे पाटबंधारे मंत्री या नात्याने शंकररावजींना या क्षेत्रावर १४०० कोटी रूपये खर्च करून जलसंचय, जलनियोजन आणि जलसिंचनाच्या कामाला दिशा आणि गती दिली. परिणामी नांदेड जिल्ह्यातील मानार व परभणी जिल्ह्यातील पुर्णा हे प्रकल्प पुर्ण झाले तर भीमा, पैनगंगा व जायकवाडी या प्रकल्पांच्या कामांना गती मिळाली. प्रत्येक प्रकल्पातील किती टक्के पाणी शेतीसाठी वापरायचे, उद्योगक्षेत्रासाठी किती वापरायचे, वीज निर्मितीसाठी किती पाणी राखून ठेवायचे आणि जनतेला पिण्यासाठी किती पाणी उपलब्ध करून द्यायचे याबाबतीतील शंकररावजींचे नियोजन अतिशय शास्त्रशुद्ध आणि अचूक होते.

पंडित जवाहरलाल नेहरू हे भारताचे पंतप्रधान असताना त्यांनी देशातील सर्व राज्यांच्या पाटबंधारे मंत्र्यांची एक बैठक बोलावली होती. त्यावेळी यशवंतराव चव्हाण हे

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते आणि शंकरराव चव्हाण हे त्यांच्या मंत्रिमंडळात पाटबंधारे मंत्री होते. महाराट्राचे पाटबंधारे मंत्री या नात्याने शंकररावांनी दिल्लीत त्या बैठकीला उपस्थिती लावली. केवळ उपस्थितीच लावली असे नव्हे तर महाराष्ट्रातील प्रत्येक नदीच्या खोऱ्यात उपलब्ध असणारे पाणी, त्यावर संभाव्य पाटबंधारे प्रकल्पांची शक्यता, संभाव्य जलसिंचनाच्या क्षेत्राची शक्यता, यातून होऊ शकणारी वीजनिर्मिती आणि कृषी व उद्योगाच्या क्षेत्रात होणारी उत्पादनवाढ यावर शंकररावजींनी जे अभ्यासपूर्ण विचार मांडले, ते पाहून पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हे इतके प्रभाविल झाले की त्यांनी लगेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना दूरध्वनी करून शंकरराव चव्हाण यांच्या अभ्यासूपणाची मुक्तकंठाने प्रशंसा केली.

नियोजित पाटबंधारे प्रकल्याचे सर्वेक्षण करण्यासाठी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीपूर्वी सबंध महाराष्ट्रासाठी पुणे येथे एकच सर्वेक्षण कार्यालय होते. त्यामुळे पाटबंधारे प्रकल्पाचा आराखडा तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे, आराखडा आणि अंदाजपत्रक मंजुरीसाठी केंद्र सरकारकडे पाठविणे ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी त्या कार्यालयावर फारच ताण पडत असे. पर्ययाने योजना कार्यन्वित होण्यास विलंब होत असे. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात प्रकल्पांचे सर्वेक्षण करून अहवाल तयार करण्यासाठी आणखी काही सर्वेक्षण कार्यालयांची आवश्यकता होती. पाटबंधारेमंत्री शंकरराव चव्हाण यांनी सुचविल्याप्रमाणे पश्चिम महाराष्ट्र,

मराठवाडा, विदर्भ आणि कोकण या भागात स्वतंत्र सिंचन विभाग स्थापन करण्यात आले. केवळ कार्यालये आणि सिंचन विभाग स्थापन करून प्रश्न सुटणार नव्हता. त्यासाठी पुरेसा कर्मचारीवर्ग नेमण्याची आवश्यकता होती. ही गरज लक्षात घेऊन शंकरराव चव्हाण यांनी पाटबंधारे खात्याला पुरेसा कर्मचारीवर्ग उपलब्ध करून दिला. याच कर्मचाऱ्यांनी केवळ एका वर्षीच्या कालावधीत जवळजवळ २५० कोटी रुपयांचे प्रकल्प अहवाल तयार करून मंजुरीसाठी ते केंद्र सरकारकडे पाठविले. शंकरराव चव्हाणांनी काळाची पावले ओळखून अशा सिंचन विभागंची स्थापना केली नसती, सर्वेक्षण कार्यालये स्थापन केली नसती तर कदाचित आज महाराष्ट्राची पाटबंधारे क्षेत्रात जी प्रागती झालेली दिसते आहे ती तशी झाली नसती परंतु शंकरराव चव्हाणाच्या द्रष्टेपणामुळे महाराष्ट्राच्या पाटबंधारे विभागला विलक्षण गती आली.

पूर्वी एक कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या पाटबंधारे प्रकल्पांना मंजुरी मिळविण्यासाठी ते प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवावे लागत असत. परिणामी सबंध देशातून केंद्र सरकारकडे मोठ्या प्रमाणावर नियोजित प्रकल्पांचे प्रस्ताव येऊन पडत असत. त्या सर्व प्रकल्पांचे नियोजन आराखडे व अंदाजपत्रके पाहून मंजुरी द्यायला केंद्र सरकारचा बराच वेळ जात असे. ही दप्तरदिरांगाई टाळण्यासाठी महाराष्ट्राचे पाटबंधारेमंत्री शंकरराव चव्हाण यांनी केंद्र सरकारला एक विनंतीपत्र लिहिले. त्यात अशी विनंती करण्यात आली होती की, केंद्र सरकारने

राज्यसरकारच्या अखत्यारीतील प्रकल्पांना मंजुरी देण्याची एक कोटी रुपयांची मर्यादा वाढविण्यात यावी. या बाबतीत राज्यसरकारांनाच निर्णय घेण्याचे अधिकार द्यावेत. शंकरराव चव्हाणांच्या या शिफारसवजा विनंतीतील तथ्य आणि गांभीर्य लक्षात घेऊन केंद्र सरकारने त्यांच्या प्रस्तावाला लगेच मान्यता दिली. त्याचा परिणाम असा झाला की केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर देशातील इतर राज्यांनासुद्धा एक कोटीपेक्षा अधिक रकमेच्या प्रकल्पांना मंजुरी देण्याचे अधिकार प्राप्त झाले. त्यामुळे एकूणच देशातील पाटबंधारे विकासातील गतिरोध दूर झाला.

संबंध महाराष्ट्रातील पाटबंधारे क्षेत्राचे सर्वेक्षण केले असता पाटबंधारे मंत्री शंकरराव चव्हाण यांच्या असे लक्षात आले की, सोलापूर परिसरात जलसिंचनाच्या सुविधा फारच कमी आहेत. ही अडचण दूर करण्यासाठी त्यांनी भीमा प्रकल्पाच्या उभारणीमध्ये लक्ष घातले. हा प्रकल्प होऊ नये यासाठी काही राजकीय मंडळींनी खूप खटाटोप केले. तसेच अधिकाऱ्यांना हाताशी धरून या मंडळींनी 'भीमा प्रकल्प तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्य नाही' अशा आशयाची टिपणी शंकरराव चव्हाण यांच्याकडे पाठवून दिली. मुख्य अभियंत्यांनीसुद्धा भीमा प्रकल्प उभारण्यात अनेक तांत्रिक अडचणी आहेत हे शंकरराव चव्हाणांना जाणीवपूर्वक सांगितले. या प्रकल्कपाला पुरेसे पाणी उपलब्ध होणार नाही म्हणून हा प्रकल्प हाती घेणे योग्य होणार नाही असा तांत्रिक सल्लादेखील दिला. तांत्रिक सल्ला देणाऱ्या अभियंत्यानेच

असा सल्ला दिल्यामुळे शंकरराव हतबल झाले. परंतु एखाद्या अडचणीसमोर हात टेकतील ते शंकरराव चव्हाण कसले !

कोणत्याही बिषयाच्या खोलात जाऊन त्याचा मुळातून अभ्यास करण्याची उपजत प्रवृत्ती असल्यामुळे शंकररावांनी मुद्दामच भीमा प्रकल्पाच्या आराखड्याचा सूक्ष्म अभ्यास केला. तेव्हा त्यांच्या असे लक्षाल आले, की भीमा प्रकल्पाच्या उभारणीत तांत्रिक अडचणीपेक्षा राजकीय अडचणी अधिक आहेत. त्या अडचणींवर, विरोधावर मात करून शंकररावांनी सोलापूर जिल्ह्यातील भीमा प्रकल्पाच्या उभारणीचे काम हाती घेतले आणि नेटाने पूर्णत्त्वास नेले. या प्रकल्पामुळे सोलापुर जिल्ह्यातील हजारो एकर जमीन ओलिताखाली आली असून शेतीच्या उत्पादनात नेत्रदीपक वाढ झालेली आहे.

१९५१ पूर्वी महाराष्ट्रात ओलिताखाली एकूण क्षेत्र फारच कमी होते. पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून (१९५१ ते ५६) या कालावधीत झालेल्या प्रगतीमुळे हे क्षेत्र १ लाख १७ हजार एकर इतके झाले. १९६१ ते ६६ या काळात महाराष्ट्रातील ३ लाख १७ हजार एकर जमीन बागायती झाली. हा जो महाराष्ट्राच्या पाटबंधारे विकासाचा ऊर्ध्वगामी आलेख आहे, याचे बरेचसे श्रेय पाटबंधारे मंत्री या नात्याने शंकरराव चव्हाण यांच्याकडे जाते.

सिंचन आयोगाच्या स्थापनेशिवाय महाराष्ट्रातील पाटबंधारे प्रकल्पांना गती येणार नाही, हे मर्म ओळखून महाराष्ट्राचे पाटबंधारे व कृषिमंत्री म्हणून शंकरराव चव्हाण यांनी महाराष्ट्रात सिंचन आयोगाची स्थापना व्हावी यासाठी

आग्रही प्रयत्न केले. त्यांच्या सातत्यशील प्रयत्नांना अखेर यश आले आणि १९६० साली पाटबंधारे खात्याचे सचिव श्री स.गो. बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली सिंचन आयोगाची स्थापना करण्यात आली. इंग्रजांच्या राजवटीत अशा प्रकारचा आयोग भीषण दुष्काळानंतर स्थापन करण्यात आला होता. महाराष्ट्राचा सिंचन आयोग हा स्वातंत्र्योत्तर भारतातील पहिलाच आयोग होता आणि तो शंकररावांच्या चिंतनाचे फलित होय.

सिंचन आयोगाच्या स्थापनेमुळे आयोगाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सिंचनाच्या क्षमतेचा सर्वंकष आढावा घेण्यात आला. सिंचन आयोगाने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांचे दौरे करून स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि या क्षेत्रातील तांत्रिक तज्ज्ञांच्या व्यापक बैठका घेतल्या. त्यांच्याशी विचारविनिमय करून भविष्यात कोणकोणत्या नद्यांवर कोठेकोठे पाटबंधारे प्रकल्प उभारणे शक्य आहे, याचा एक आराखडा तयार करण्यात आला. सिंचन आयोगाने १९६२ साली संभाव्य प्रकल्प-विषयक शिफारशी शासनाला सादर केल्या. सिंचन आयोगाच्या स्थापनेमुळे महाराष्ट्राच्या पाटबंधारे क्षेत्राचा एक बृहद आराखडाच तयार झाला. या आराखड्यावरहुकूम कार्यवाही केल्यामुळे सिंचनाच्या बाबतीत राज्याचा समतोल व सर्वांगीण विकास होऊ शकला. एक द्रष्टा नेता म्हणून या यशाचे श्रेय निःसशय पाटबंधारेमंत्री व कृषिमंत्री शंकरराव चव्हाण यांच्याकडे जाते.

अहमदनगर व पुणे जिल्ह्याचा काही भागा कायम अवर्षणाच्या छायेत असतो. पारनेर, श्रीगोंदा, जुन्नर, आंबेगाव, शिरूर या तालुक्यातील शोतकऱ्यांना अधूनमधून दुष्काळाचे दाहक चटके बसत असतात. या भागातील जमीन पाण्याचा निचरा होणारी असल्यामुळे या भागात धरण होणे आवश्यक आहे. ही गरज लक्षात घेऊन शंकरराव चव्हाण यानी कुकडी प्रकल्प उभारणीचा संकल्प सोडला. शंकरराव चव्हाण यांनी १९६४ पासून केंद्रीय नियोजन आयोगाकडे या प्रकल्पाचा प्रस्ताव पाठतून मंजुरीसाठी सातत्याने प्रयत्न चालूच ठेवले होते . द्रष्ट्या पुरुषाला दिक्कालाच्या पलीकडचे दिसत असते असे म्हणतात. शंकरराव चव्हाणांची दृष्टीसुद्धा अशीच होती. त्यांनी चौथ्या पंचवार्षिक योजनेत कुकडी प्रकल्प पूर्ण करण्याचा निर्धार केला. दि. ६ ऑक्टोबर तै १९७० रोजी भारताचे तत्कालीन अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले.

अलीकडे पर्जन्यमान दरवर्षी घटत चालल्यामुळे पाटबंधोर प्रकल्पांचे महत्त्व सर्वसामान्यांनाही पटत असले तरी १९६०-७० च्या दशकात अशा धरणांना स्थानिक शेतकऱ्यांचा होणारा विरोध फार तीव्र होता. ज्या शेतकत्यांच्या जमिनी या धरणाखाली जाणार होत्या, त्या शेतकऱ्यांना हाताशी धरून स्थानिक विरोधकांनी भुमिपूजन समारंभाच्या वेळीच निदर्शने केली. प्रकप्लाला असलेला आपला विरोध दर्शविण्यासाठी मंत्र्यांच्या गाड्यांवर दगडफेक केली. प्रकल्पग्रस्त विरोधकांचा समुदाय इतका

प्रक्षुब्ध बनला की, पोलीसांना नाइलाजाने सौम्य लाठीमार करावा लागला. अश्रुधुराचा वापर करावा लागला. तशाही परिस्थिती शंकरराव चव्हाण भाषणासाठी उभे राहिले. त्यांनी आपल्या भाषणात आश्वासन दिले, की ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी या प्रकल्पाच्या पाण्याखाली जातील त्यांचे व्यवस्थित पुनर्वसन केले जाईल. शेतकऱ्यांना पर्यायी जमिनी उपलब्ध करून दिल्या जातील. शंकररावांच्या या आश्वासनाने प्रकल्पग्रस्तांना थोडासा धीर आला. शंकररावांच्या अशा भगिरथ प्रयत्नांतून कुकडी प्रकल्प साकार झाला. या प्रकल्पामुळे दुष्काळाच्या छायेत असणाऱ्या पुणे व नगर जिल्हयातील १ लाख एकर जमीन ओलिताखाली आली. शेतकऱ्यांच्या डोळ्यात आता हिरवे स्वप्न फुलू लागले.

शंकरराव चव्हाणांनी विदर्भातील पाटबंधारे प्रकल्पांनासुद्धा तितक्याच तळमळीने चालना दिली. यवतमाळ जिल्ह्याच्या पुसद तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी पूस प्रकल्प हा एक वरदान ठरला आहे हा प्रकल्प व्हावा अशी या भागातील शेतकऱ्यांची अनेक दिवसांपासून मागणी होती. वसंतराव नाईक मध्यप्रदेश शासनाच्या मंत्रिमंडळात उपमंत्री असताना त्यांनी ही योजना सरकारला सुचविली होती. राज्य पुनर्रचनेनंतर ही योजना अर्थातच महाराष्ट्र सरकारकडे आली. महाराष्ट्र सरकारने १९६४ मध्ये पुसद जवळील मसूद येथे या प्रकल्पासाठी जागा निश्चित केली. २६ डिसेंबर १९६४ रोजी यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमिपूजन झाले.

१९६६ मध्ये या धरणाचे काम सुरू झाले. १९७१ मध्ये धरण पूर्णत्वास गेले आणि हा प्रकल्प राष्ट्राला अर्पण करण्यात आला. या प्रकल्पामुळे पुसद तालुक्यातील चाळीस गावांच्या ८१२० हेक्टर शेतीला जलसिंचनाची सुविधा उपलब्ध झाली आहे. ज्यांच्या जमिनी या धरणात गेल्या अशांच्या पुनर्वसनासाठी पाटबंधारे खात्याने ४०५ लक्ष रुपये खर्च करून पर्यायी जमिनी उपलब्ध करून दिल्या पूस प्रकल्पामुळे बागायती शोतीला तर मदत झालीच, त्याशिवाय धरणाच्या पायथ्याशी मत्स्यपालन व्यवसाय सुरू झाला. या धरणामुळे विदर्भीतील कृषी औद्योगिक विकासाला आणि एकूणच सर्वांगीण विकासाला चालना मिळाली.

पाटबधारे मंत्री म्हणून काम करत असताना शंकरराव चव्हाणांच्या मनात कोणत्याही विशिष्ट विभागबद्दल विशेष प्रेम किंवा कोणत्याही विशेष प्रदेशाबद्दल आकसाची भावना नव्हती. पाटबंधारे प्रकल्पांच्या बाबतीत सबंध महाराष्ट्राचा समतोल विकास व्हावा, अशीच त्यांची समत्वदृष्टी आणि त्या दृष्टीला साजेशी कृतिशील भूमिका होती. ज्या प्रदेशात पाटबंधारे प्रकल्प घेणे शक्य आहे ते हाती घेऊन पूर्ण करणे हा शंकररावांचा स्वच्छ दृष्टिकोन होता. विदर्भ असो की मराठवाडा, कोकण असो की पश्चिम महाराष्ट्र, राज्याचे पाटबंधारे मंत्री म्हणून महाराष्ट्राचा समतोल व सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शंकरराव चव्हाणांनी सर्वंकष प्रयत्न केले.

विदर्भीचा जलसिंचनाच्या क्षेत्रातील अनुशेष भरून निघावा यासाठी शंकररावांनी अप्पर वर्धा धरण निर्मितीचा

ध्यास घेतला होता. जेव्हा या प्रकल्पांची योजना जाहीर करण्यात आली; तेव्हा काही लोकांनी हा प्रकल्प होऊ नये यासाठी

प्रयत्न चालविले. एक तर धरणात आपली जमीन गेली तर नुकसानभरपाई मिळणार नाही किंवा पर्यायी शेतजमीन मिळणार नाही असा लोकांचा अपसमज होता. काही ठिकाणी विघ्नसंतोषी राजकारणी मंडळी अशा प्रकल्पग्रस्तांना हाताशी धरून नियोजित प्रकल्पाला मुद्दामच विरोध करत असे. अशा परिस्थितीत शंकरराव प्रकल्पग्रस्तांच्या मनातील चुकीच्या धारणा दूर करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत. अप्पर वर्धा धरणाच्या निर्मितीला असलेला विरोध लोकांनी सोडून द्यावा यासाठी शंकररावांनी वेगवेगळ्या योजना जाहीर केल्या. या प्रकल्पाच्या पूर्णतेसाठी जवळजवळ दहा वर्षांचा कालावधी लगणार होता. धरणाचे काम पूर्ण होईपर्यंत आणि लोकांच्या जमिनी पाण्याखाली जाईपर्यंत शेतकऱ्यांना देण्यात आलेली पर्यायी जमीन आणि धरणात गेलेली त्यांची स्वतःची जमीन कसण्याचा अधिकार शेतकऱ्यांना देण्यात येईल, अशी घोषणा शंकररावांनी केली. धरणामुळे पंधरा-वीस गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न उद्भवणार असला तरी या धरणामुळे जवळजवळ एक लाख ५० हजार एकर जमीन ओलिताखाली येणार आहे. त्यामुळे विरोधकांनी धरणाला सहकार्य करावे असे आवाहन शंकररावांनी मोठ्या कळकळीने केले. तेव्हा कुठे धरणाच्या कामाला सुरुवात झाली.

आपल्या बाळाला ताप आल्यावर एखादी आई जशी बळजबरीने कडू औषध त्याच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न करते, त्यावेळी आपल्या बाळाचे कल्याण व्हावे अशीच त्या आईची भूमिका असते, काहीशी अशीच भूमिका शंकरराव चव्हाणांनी पाटबंधारे प्रकल्पांच्या बाबतीत घेतली होती. अप्पर वर्धा प्रकल्पाच्या पूर्णतेमुळे जवळजवळ २ लाख एकर क्षेत्र ओलतिताखाली आले असून पाण्याच्या उपलब्धतेमुळे कृषिविकासाबरोबरच परिसराचा औद्योगिक विकासही झाल आहे. ग्रामीण बेकारांची बेकारी दूर होण्यास त्यामुळे हातभार लागला आहे. शेतकऱ्यांच्या जीवनात सुखाचे दिवस आले आहेत.

अनेक वर्षे हैदराबादच्या निजामाच्या जोखडात जखडलेला मराठवाडा स्वातंत्र्यानंतरही मागासलेपणाचा भोगवटा भाळी गोंदवून दारिद्र्यात खितपत पडला होता. या भागाचे मागासलेपण दूर करावयाचे असेल तर मराठवाड्यातील नद्यांवर धरणे बांधल्याशिवाय पर्याय नाही, हे शंकररावांनी डोळसपणे हेरले. त्यासाठी मनार, सिद्धेश्वर, येलदरी, निम्नतेरणा, दुधना अशा मोठ्या प्रकल्पांचे सर्वेक्षण करून ते प्रकल्प अहवाल मंजुरीसाठी केंद्र सरकारकडे पाठवले. केंद्र सरकारच्या मंजुरीसाठी सातत्याने पाठपुरावा केला. शंकररावांच्या अथक व दीर्घकालीन प्रयत्नांमुळे महाराष्ट्रात लघू, मध्यम, मोठे पाटबंधारे प्रकल्प, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, पाझर तलाव, गावतळी हे तर विकसित झालेच, त्यामुळे भूपृष्ठावर जलाशये विकसित झाली. हा झाला दृष्य परिणाम. याशिवाय त्यांच्या भगिरथ प्रयत्नांमुळे

भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यासाठीसुद्धा मदत झाली. शंकरराव चव्हाणांची अभ्यासूवृत्ती, त्यांची चिकाटी, कठोर परिश्रम, ध्येयनिष्ठा, सातत्यशील प्रयत्न यामुळे हे अशक्य कोटीतील काम शक्य झाले.

## जायकवाडी प्रकल्प

पैठणचा जायकवाडी प्रकल्प म्हणजे शंकरराव चव्हाणांना पडलेले एक गोमटे स्वप्न होय.जायकवाडी हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा सिंचनप्रकल्प आहे. शंकररावांच्या प्रयत्नांमुळे पैठणला 'नाथसागर' साकार झाला. त्यामुळे शंकरराव चव्हाणांना 'आधुनिक भगिरथ' अशी जी उपाधी दिली जाते ती किती अन्वर्थक आहे, याची प्रचिती येते. जायकवाडी हा एक बहुद्देशीय प्रकल्प असून या प्रकल्पामुळे शेतीला तर पाणीपुरवठा होतोच, परंतु सिंचनाबरोबरच विद्युतनिर्मितीही केली जाते. या प्रकल्पामुळे मत्स्य संवर्धनाच्या व्यवसायाला चालना मिळालीं आहे. औरंगाबाद शहराला पिण्याचे पाणी आणि वाढत्या औद्योगिक क्षेत्राला पाण्याचा पुरवठा याच प्रकल्पातून होत असतो. म्हणून जायकवाडी प्रकल्प हे शंकरराव चव्हाणांनी पाहिलेले एक सुंदर व सुखद स्वप्न होय, असे म्हटल्यास ते अतिशयोक्तीचे होणार नाही.

पाण्याशिवाय शेती म्हणजे कधीच न संपणारा व न जिंकणारा जुगार असतो. मराठवाड्यातील शेतकरी लहरी निसर्गाच्या भरवशावर हा जुगार वर्षानुवर्षे खेळत आला होता आणि स्वाभाविकच तो जुगार हमखास हारत आला होता. शतकानुशतकांच्या आसमानी व सुलतानी संकटांचा मुकाबला करत हा शेतकरी कमालीचा पराधीन बनला होता. मराठवाड्यातील पाण्याचा थेंबन्‌थेंब वापरात आला पाहिजे

असा शंकररावांचा आग्रह होता. निष्प्राण जीवन जगणाऱ्या कोरडवाहू शेतकऱ्यांच्या जीवनात पाटबंधारे प्रकल्पांच्या माध्यमातून प्राण फुंकण्याचे अभूतपूर्व असे संजीवक कार्य शंकरराव चव्हाणांनी केले. जायकवाडी प्रकल्पाच्या उंचीकडे पाहिल्यावर शंकरराव चव्हाणांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि कर्तृत्वांची उंची आपल्या लक्षात येते. तथापि हा प्रकल्प इतक्या साध्यासुध्या पद्धतीने आणि सहजतेने साकार झालेला नाही. जायकवाडी प्रकल्पाच्या निर्मितीचा काळ हा शंकरराव चव्हाणांच्या आयुष्यातील एक कसोटीचा काळ होता. हा प्रकल्प पूर्णत्वास नेत असताना शंकररावांना तीव्र राजकीय विरोधासह अनेक संकटांना सामोरे जावे लागले. तरीसुद्धा शंकररावांनी पाण्यावरची आपली जीवननिष्ठा सोडली नाही. कष्टकरी शेतकऱ्यांशी असलेली आपली नाळ कधीही तोडली नाही. अतिशय करारी वृत्तीने, तितक्याच संयमाने व सबुरीने शंकररावांनी आपला हा संकल्प सिद्धीस नेला. शंकररावांच्या असीम त्यागातून आणि अलौकिक समर्पणातून जायकवाडी नावाचे 'मराठवाड्याचे भाग्यतीर्थ' उदयास आले.

नारायणराव चेरेकर नावाचे एक अतिशय अभ्यासू आणि निष्णात अधीक्षक अभियंता होते. पैठण येथे गोदावरी नदीवर धरण उभारावे अशी त्यांची कल्पना होती. एक तज्ज्ञ अधीक्षक अभियंता आणि शंकरराव चव्हाण यांचे समाजाभिमुख नेतृत्व यांच्या सहयोगातून जायकवाडी प्रकल्प साकार झाला. या प्रकल्पामुळे अहमदनगर जिल्ह्यातील पन्नास गावे आणि औरंगाबाद जिल्ह्यातील

पन्नास गावे पाण्याखाली बुडणार होती. त्यामुळे या धरणाला दोन्ही जिल्ह्यांतून तीव्र विरोध होत होता. अशा संतप्त वातावरणात महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री वसंतराव नाईक आणि पाटबंधारे मंत्री शंकरराव चव्हाण हे धरणाची जागा पाहण्यासाठी गेले असता पंधरा गावच्या लोकांनी मोर्चा काढला. मुख्यमंत्र्यांसमोर धरणे धरली. उग्र निदर्शने केली. दत्ता देशमुख हे या विरोधकांचे नेतृत्व करत होते. लोकांचा हा विरोध पाहता जायकवाडी प्रकल्प पूर्ण होईल असे कोणालाही वाटत नव्हते. लोकांची मागणी लक्षात घेता मुख्यमंत्री वसंतराव नाईक हे सुद्धा प्रकल्पाची योजना रद्द करण्याच्या निर्णयाप्रत आले होते. मुख्यमंत्र्याची ही भूमिका लक्षात येताच, विरोधाला बळी पडून तसे घडलेच तर पाटबंधारे मंत्रिपदाचा राजीनामा द्यायची शंकरराव चव्हाणांनी मानसिक तयारी करून ठेवली होती. राजीनामापत्र लिहून खिशात तयारच ठेवले होते. मुख्यमंत्र्यांनी प्रकल्प रद्द केलाच तर त्याच जागी क्षणाचाही विलंब न लावता रानीनामा सादर करायचा आणि मुक्त व्हायचे, अशी शंकररावांची निग्रही भूमिका होती.

जायकवाडी धरण पूर्णत्वास जाऊ नये यासाठी काही नतद्रष्ट मंडळी प्रयत्नशील होती. मराठवाडा विभागात काळी माती जास्त असल्यामुळे या विभागात धरणासारखे मोठे बांधकाम होऊच शकत नाही असा अज्ञानावर आधारित अपप्रचार प्रारंभी या मंडळींनी सुरू केला. याला या क्षेत्रातील तज्ज्ञांनी सडेतोड उत्तर दिल्यावर विरोधक अस्वस्थ झाले. कारण मुळातच धरणाची तांत्रिक बाजू भक्कम व वादातीत

होती. मग काही अवसानघातकी विरोधकांनी अहमदनगर जिल्ह्यातील जनतेचा बुद्धिभेद करण्याचा सपाटा चालविला. आता त्यांच्या हाती विस्थापितांचे पुनर्वसन हा एकच विषय उरला होता. विरोधकांचा पवित्रा बघून शंकररावजींनी आधी कळकळीची विनंती केली की गोदावरी धरणाचा प्रश्न हा मराठवाड्यातील जनतेचा रोजीरोटीचा व जीवनमरणाचा प्रश्न आहे. त्यात राजकारण आणून त्यांच्या संसारात माती कालवू नका. शेवटी शंकररावांनी आत्मघातकी विरोधकांना खणखणीत इशारा दिला की असे वागणे हे महाराष्ट्राच्या हिताला व एकात्मतेला बाधा आणणारे आहे. अशा उद्गारांमागे शंकररावांची तळमळ तर होतीच शिवाय दुष्काळी भागाला पाणी मिळून तेथील शेतकऱ्यांचे संसार सुखी व्हावेत हाउद्देशही होता. राजकीय स्वार्थाच्या पलीकडे जाऊन जनहिताचा दूरगामी विचार करण्याची वृत्ती, दृष्टी आणि क्षमता होती, म्हणून त्यांनी दुष्काळी भागातले पाटबंधारे प्रकल्प आधी मार्गी लावण्याला प्राधान्यक्रम दिला.

प्रकल्प विरोधकांचे नेते कॉ. दत्ता देशमुख यांनी व्यासपीठावरून धरणाच्या विरोधात जहाल भाषण केलें त्यांच्या भाषणाला उत्तर देण्यासाठी शंकरराव चव्हाण उभे राहिले. प्रकल्पाचा आराखडा जनतेसमोर सादर केला. प्रकल्प पूर्ण झाल्यावर भूमिपुत्रांच्या जीवनात किती आमूलाग्र क्रांती होणार आहे, याचे जिवंत चित्र उपस्थितांसमोर आपल्या ओघवत्या शैलीत उभे केले. शंकरराव म्हणाले,“हे केवळ धरण नसून ही खरोखरच कामधेनू आहे. या प्रकल्पाला विरोध करणे म्हणजे

सूर्यावर रागावून अंधारात बसण्यासारखे आहे. उरला प्रश्न प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा. अशा लोकांसाठी पर्यायी जमिनी उपलब्ध करून देण्यात येतील." अशा शब्दात शंकररावांनी अत्यंत तळमळीने आंदोलकांना शांत करण्यासाठी संयमित शब्दात विनम्र आवाहन केले.

प्रकल्पाच्या विरोधकांनी शेगाव येथे शंकरराव चव्हाण यांचा सत्कार आयोजित केला होता. तो सत्कार स्वीकारण्यासाठी शंकरराव शेगावकडे निघाले होते. त्यावेळी शंकररावांचे थोरले बंधू श्री नारायणराव आणि श्री गोपाळराव हे त्यांच्या गाडीसमोर आडवे आले. त्यांनी शंकररावांना शेगावकडे जाण्यास विरोध केला. कारण शेगावमध्ये प्रकल्पाचे विरोधक शंकररावांचा खून करणार, अशी गुप्त बातमी खालच्या आवाजात चर्चिली जात होती. परंतु जनकल्याणाचे काकण हाती बांधलेल्या शंकररावांना मरणाची भीती थोडीच होती ! हाती घेतलेला प्रकल्प पूर्ण करत असताना हौतात्म्य पत्करावे लागले तरी बेहत्तर, पण जायकवाडीची योजना सोडणार नाही, असा निर्धार शंकररावांची व्यक्त केला आणि शंकररावांर्ची गाडी शेगावच्या दिशेने निघाली.

## जिवावर बेतले होते . . . .

शंकरराव चव्हाण यांची गाडी एका डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या रस्त्यावरून शेगावच्या दिशेने धावत होती. तो रस्ताही असाच खाचखळग्यांनी भरलेला होता, शंकररावांच्या राजकीय जीवनपथासारखा! शंकररावांची गाडी जात असताना डोंगरावरून एका पाठोपाठ एक असे अजस्त्र दगड गडगडत खाली आले. प्रकल्पाच्या विरोधकांनी शंकररावांच्या गाडीवर ते दागड टाकून त्यांचा खून करण्याचा कट रचला होता. परंतु म्हणतात ना, जाको राखै साईयाँ । मार सकै ना कोय ! अगदी तसेच घडले. शंकररावांची गाडी थोडी पुढे सरकली आणि ते मोठमोठे दगड घरंगळत येऊन रस्त्यावर आदळले. डोळ्याचे पाते लवते न लवते तोच सारा प्रकार घडला होता. सुदैवाने शंकररावांची गाडी दगडांपासून काही फूट अंतरावर पुढे गेली होती. क्षणाचेही अंतर असते तर ते दगड साक्षात मृत्यूदूत बनून शंकररावांच्या गाडीवर आदळले असते. परंतु नियतीलाच ते मान्य नसावे. नियतीनेच कदाचित शंकररावांभोवती सुरक्षेचे अभेद्य कवच निर्माण केले असावे आणि त्यामुळे शंकरराव सुखरूप पुढे निघाले असावेत. सोबतच्या लोकांनी प्रसंगाचे गांभीर्य लक्षात घेऊन सुटकेचा निःश्वास सोडला, परंतु शंकरराव मात्र निश्चल होते. त्यांना कदाचित अशा प्रसंगाची कल्पनाही असेल. तथापि शंकरराव

डगमगले नाहीत किंवा आपल्या निर्णयापासून जराही विचलित झाले नाहीत.

शेगाव येथे आयोजित सत्कार समारंभाला शंकररावजी धैर्याने उपस्थित राहिले. हा सत्कार समारंभ नसून धुत्कार समारंभ आहे, याचा अनुभव इथे शंकररावांना आला. कारण विरोधकांनी शंकररावांना अर्पण केलेले मानपत्र हे 'मानपत्र' नसून 'अपमानपत्र' आहे याचा त्यांना अनुभव आला. त्या मानपत्रात जायकवाडी प्रकल्पाच्या विरोधकांनी शंकररावांना शिव्यांची लाखोली वाहिली होती. तरीसुद्धा जनकल्याणाची कास धरलेल्या शंकररावांनी ते टीकेचे हलाहल पचविले. तेथील कस्तुरे नावाच्या एका लेखकाने जायकवाडी प्रकल्पाच्या विरोधात १०५ लेख लिहून प्रकाशित केले होते. विरोधाचे हलाहल पचवून शंकररावांनी सत्काराला तितक्याच संयमाने उत्तर दिले. जायकवाडी प्रकल्प होणे किती आवश्यक आहे, हा प्रकल्प कोरडवाहू शेतकऱ्यांना किती लाभदायी ठरणार आहे, यावर तळमळीने विचार मांडले प्रकल्प विरोधी कृतीसमितीचे नेते कॉ. दत्ता देशमुख हे शंकररावांचा संयम पाहून अतिशय प्रभावित झाले. अंगावर १०७ वेळा थुंकणाऱ्या दुष्टाचे आभार मानणाऱ्या संत एकनाथांचे चरित्र शंकररावांना माहीत होते. कठोर विरोधकांनाही शंकररावांनी सुसंस्कृतपणे व सबुरीनेच उत्तरे दिली प्रकल्पाच्या उभारणीसाठी जनमत तयार केले.

समाजवादी विचारसरणीचे लेखक व पत्रकार अनंत भालेराव यांच्या नेतृत्वाखाली औरंगाबाद येथून प्रकाशित होणाऱ्या 'मराठवाडा' या अर्धसाप्ताहिकाने दि.१३ जून १९६३

च्या आपल्या संपादकीय लेखात जायकवाडीच्या यशाबद्दल पाटबंधारेमंत्री ना. शंकरराव चव्हाण यांचा पुढील शब्दात गौरव केला आहे, "श्री शंकरराव चव्हाण यांनी नेटाने प्रयत्न केला नसता, तर ही योजना बारगळली असती. त्यांनी आग्रह धरून, अभ्यास करून, अनेकांची मने वळवून ही योजना मंजूर करवून घेऊन मराठवाड्याची फार मोठी सेवा बजावली आहे."

'मराठवाडा' अर्धसाप्ताहिकाने शंकररावांच्या भूमिकेबद्दल कृतज्ञता तर व्यक्त केली आहेच, शिवाय दि. २ फेब्रुवारी १ ९ ६४ च्या आपल्या अंकात ' ना. शंकरराव चव्हाणांना धन्यवाद' या शीर्षकाखाली अग्रलेखात खालील शब्दांत ना. शंकरराव चव्हाण यांच्या बांधिलकी, धडाडी व कार्यकर्तृत्वाचा गौरवच केला आहे.

'मराठवाडा' चे संपादक लिहितात, "महाराष्ट्रराज्याच्या वीज व पाटबंधारे खात्यांचे मंत्री ना. शंकरराव चव्हाण यांना आज हार्दिक धन्यवाद द्यायचे आहेत. प्रशंसा करण्याची आमची पद्धती नाही व खुशामतीची परंपरा आम्ही उभ्या जन्मात अनुसरलेली नाही. परंतु आज या प्रथेला थोडेसे बाजूला सारून शंकररावांची पाठ थोपटण्याचे विशेष प्रयोजन आहे..... कृष्णा-गोदा पाणीतंटा उपस्थित झाल्यानंतर, गोदावरीचे उदक आंध्राच्या हातावर सोडून विद्यमान राजकारणातील पश्चिम महाराष्ट्राचा प्रभावी दबाव कृष्णेबाबत तडजोड करवतो की काय, अशी भीती वाटत होती...... अर्थात तसे काही झाले नाही. कृष्णा-गोदावरीचा वाद अद्याप मिटला नसला, तरी गोदेवर पैठण-माजलगाव

धरण योजना, जी ‘जायकवाडी’ म्हणून ओळखली जाते, ती पुढे रेटली जात असल्यामुळे मराठवाड्याला फार मोठे समाधान लाभत आहे, हे मान्यच केले पाहिजे. गोदावरीचे पाणी तडजोडीत गमावले गेले असते, तर मराठवाड्याच्या दैवातील कोरडवाहू कालत्रयी पुसली गेली नसती. अशा प्रकारे एक फार मोठा दिलासा ना. शंकरराव चव्हाणांमुळे व त्यांच्या खाल्यातील अन्य सहकाऱ्यांमुळे मिळाला, म्हणून त्यांचे आज खास अभिनंदन करावयाचे आहे.”

दि. १८ ऑक्टोबर १९६५ रोजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमिपूजन झाले. या काळात शंकररावांच्या घरी निनावी फोन येत. शंकररावांना जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात. तथापि अशा निंद्य प्रकारांना शंकररावजी बधले नाहीत. शंकररावांना मानणाऱ्या अभियंत्यांनी आणि पाटबंधारे विभागाने अहोरात्र खपून भगिरथ प्रयत्नाने बारा वर्षात हा प्रकल्प साकार केला.

या धरणाची साठवणूक क्षमता २,९०९ दशलक्ष घनमीटर असून जायकवाडी प्रकल्पामुळे मराठवाड्यातील औरंगाबाद, परभणी, जालना, बीड, नांदेड व अहमदनगर जिल्ह्यातील २ लाख ७८ हजार हेक्टर कोरडवाहू जमिनीची तहान तृप्त झाली. प्रकल्पाच्या तिसऱ्या टप्प्यात नाथसागराच्या पायथ्याशी १२ मोगावॅट विद्धुतनिर्मिती क्षमता असलेले जलविद्युत केंद्र उभारण्यात आले.'नाथसागर’ या मानवनिर्मित जलाशयामुळे ३५ हजार एकर जमीन व ११८ गावे प्रभावित झाली. परिणामी ७७ हजार लोकांचे स्थलांतर व पुनर्वसन करावे लागले. या प्रकल्पामुळे उदास आणि

विराण परिसर सुजलाम सुफलाम झाला. शेतीच्या उत्पादनात प्रचंड वाढ झाली. शोतकऱ्यांच्या जीवनात सुबत्ता आली. विरोधकांच्या विरोधापुढे मान तुकवून शंकररावांनी या प्रकल्पाचा आग्रह सोडून दिला असता, तर मराठवाड्याचा मागासलेपणा आणखी पिढ्यान्पिढ्या तसाच कायम राहिला असता. आज औरंगाबाद परिसराचा जो औद्योगिक विकास झाला आहे, त्याला नाथसागरातील पाण्याने साथ दिली आहे. जर नाथसागर नसता तर कदाचित औरंगाबाद शहराला आज प्यायलासुद्धा पाणी मिळाले नसते.

एकदा पुण्यात एका समारंभात शंकरराव चव्हाण आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते काकासाहेब गाडगीळ हे एका व्यासपीठावर उपस्थित होते. काकासाहेबांनी शंकररावांकडे तिरपा कटाक्ष टाकत कोपरखळी मारली, "जायकवाडी पदरात पाडून घेताना काहीतरी तडजोड केलेली दिसते."

काकासाहेबांच्या बोलण्यातील खोच शंकररावांच्या लक्षात आल्यावाचून राहिली नाही. तितक्याच बाणेदारपणे शंकररावांनी उत्तर दिले, "जायकवाडी मंजूर करून घेताना महाराष्ट्राचे हित गहाण ठेवलेले नाही."

**...आणि काकासाहेब निरुत्तर झाले.**

इतका द्वेष-मत्सर एकीकडे आणि दुसरीकडे महाराष्ट्राच्या पाटबंधारे क्षेत्रातील शंकरराव चव्हाणांचे तेजस्वी कार्य पाहून एकदा वयोवृद्ध नेते रत्नाप्पाअण्णा कुंभार विधिमंडळात म्हणाले होते की, दुष्काळी भागामध्ये जास्तीत जास्त पाणी उपलब्ध व्हावे म्हणून शंकरराव चव्हाण पाटबंधारे प्रकल्पांच्या निर्मितीमध्ये जातीने लक्ष देत आहेत. या त्यांच्या कार्याबद्दल त्यांचे करावे तितके कौतुक कमीच आहे. त्यांच्या कार्याला विधिमंडळाने आर्थिक व नैतिक पाठिंबा देणे अत्यंत गरजेचे आहें. पाटबंधारे खात्याची निकड लक्षात घेऊन मी अर्थमंत्री ना. वानखेडे यांना अशी विनंती करतो, की पाटबंधारे खात्याला जास्तीत जास्त आर्थिक तरतूद उपलब्ध करून द्यावी.

## येलदरी धरण

हिंगोली जिल्ह्यातील जिंतूर या तालुक्याच्या ठिकाणापासून साधारण मैलभर अंतरावर उत्तरेस येलदरी या गावाजवळ येलदरी धरण बांधण्यात आले. या धरणाची एकूण लांबी १४,५०० फूट असून नदीच्या पात्रापर्यंतचा ११४९ फुटाचा भाग मातीचा आहे. नदीच्या पात्रात धरणाची कमाल उंची १६८ फूट इतकी आहे. या धरणाच्या पायथ्याशी एक विद्युतनिर्मिती केंद्र उभारण्यात आले असून त्यात तीन विद्युत जनित्र बसविण्यात आली आहेत. या केंद्रात ७.५०० किलोवॅट वीजनिर्मिती होऊन त्यातून नांदेड, परभणी, सेलू, जिंतूर, हिंगोली, कळमनुरी, पाथरी या गावांना वीज पुरविली जाते.

शंकरराव चव्हाण यांच्या प्रयत्नांमुळे सिद्धेश्वर धरणाचे काम १९६२ साली पुर्ण झाले. या धरणामुळे परिसरातील १ लाख २० हजार एकर कोरडवाहू जमीन बागायती बनली.

## गोदावरी पाणी वाटप तंटा सोडविला

'दक्षिण गंगा' म्हणून ओळखली जाणारी गोदावरी नदी महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि मध्यप्रदेश अशा चार राज्यांतून वाहते. गोदावरी नदीच्या पाणी वाटपावरून या राज्यांमध्ये वाद निर्माण झाला होता. हा वाद मिटविण्यासाठी १९५६ च्या आंतरराज्य पाणी तंटा कायद्यानुसार तीन सदस्यीय लवाद नेमण्याची सूचना ना. शंकरराव चव्हाण यांनी केंद्र सरकारला केली होती. त्यानुसार केंद्र सरकारने नेमलेल्या त्रिसदस्यीय लवादाला दि. २२ ऑगस्ट १९६८ रोजी राष्ट्रपतींनी मान्यता दिली.

दि. ६ ऑक्टोबर १९७५ रोजी दिल्ली येथे पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेशाच्या मुख्यमंत्र्यांची बैठक झाली. या वैठकीत दोन्ही राज्यात पाणी वाटपाच्या प्रश्नावर समझोता करार झाला. दि. १९ डिसेंबर १९७५ रोजी पाच राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक केंद्रिय पाटबंधारे मंत्री बाबु जगजीवनराम यांच्या उपस्थितीत होऊन तीत गोदावरी पाणी वाटप करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. अशा प्रकारे वर्षानुवर्षे भिजत पडलेला गोदावरी पाणी वाटप तंटा ना. शंकरराव चव्हाण यांनी आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीत सामोपचाराने व अत्यंत खुबीने सोडविला. त्यामुळे महाराष्ट्राच्या हरितक्रांतीस हातभार लागा.

ना. शंकरराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात ना. शरद पवार हे मंत्री होते. पुढे शरद पवारांच्या पुरोगामी लोकशाही दल या आघाडी सरकारात ना. शंकरराव चव्हाण हे मंत्री झाले. तरीसुद्धा महाराष्ट्राच्या या दोन शिल्पकरांचे स्वर परस्परांशी फारसे जुळले नाहीत. असे असूनही ना. शरद पवार यांनी शंकरराव चव्हाण यांच्या प्रशासन कौशल्याचा व सांसदीय कार्यपद्धतीचा वेळोवेळी गौरव केला. ना. शरद पवार यांचे या संदर्भीतील उद्गार लक्षात घेण्यासारखे आहेत. ते म्हणतात, "राज्यातील पाटबंधाऱ्यांच्या मोठ्या प्रकल्पात शंकरराव चव्हाणांचे योगदान महत्त्वाचे आहे. शेतकरी ते कधीही विसरणार नाहीत यांचे चारित्र्य आदर्श आहे. त्यांचे प्रशासन कौशल्य संपूर्ण भारताला प्रेरणादायी आहे. त्यांची सांसदीय कार्यपद्धती अनुकरणीय आहे."

# बिष्णुपुरी प्रकल्प

विष्णुपुरी प्रकल्प ही आशिया खंडातील सर्वात मोठी आणि पहिली उपसा जलसिंचन योजना असून हा अद्वितीय प्रकल्प म्हणजे शंकरराव चव्हाण यांच्या कल्पकतेचा आणि कार्यकर्तृत्वाचा आरसा आहे. नांदेड शहरालगत आठ किलोमीटर अंतरावरील असर्जन या गावाजवळ हा आगळावेगळा प्रकल्प साकार झाला आहे. एखादा मोठा प्रकल्प म्हटला की खूप मोठ्या प्रमाणावर शेतजमीन पाण्याखाली जाणार, गावेच्यागावे पाण्याखाली बुडणार आणि अशा गावांचे पुनर्वसन ही शासनासाठी कायमची डोकेदुखी असते. परंतु विष्णुपुरी प्रकल्पामुळे असा कोणताच प्रश्न उभा राहिला नाही किंबहुना विष्णुपुरी प्रकल्पामुळे एकही गाव प्रभावित होणार नाही आणि बुडितक्षेत्रातील एक एकरही जमीन पाण्याखाली बुडणार नाही अशी नांदेड शहरालगत विष्णुपुरी गावाजवळची जागा शंकरराव चव्हाणांनी या प्रकल्यासाठी निश्चित केली. शंकररावांच्या दूरदृष्टीतून साकार झालेला विष्णुपुरी प्रकल्प हा केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे तर संबंध देशासाठी एक आदर्श म्हणून भूषणावह ठरला आहे.

तत्कालीन पाटबंधारे मंत्री शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या कार्यकालात म्हणजे एप्रिल १९८३ मध्ये विष्णुपुरी प्रकल्पाचे भूमिपूजन झाले. परंतु काही काळ हा प्रकल्प केवळ कागदावरच राहिला. या प्रकल्यासाठी मंजूर

झालेला निधी अन्यत्रच वापरला गेला. तो निधी पुन्हा विष्णुपुरी प्रकल्पाकडे वर्ग करण्यासाठी शंकररावांना प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागली. या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला १९८४ मध्ये चालना मिळाली. गोदावरी खोऱ्यातील पाण्याचा प्रत्येक थेंब सत्कारणी लागला पाहिजे, हा शंकररावांचा ध्यास होता. त्या ध्यासातूनच पैठणचा जायकवाडी प्रकल्प आणि नांदेडचा विष्णुपुरी प्रकल्प ह्या दोन कामधेनू उभ्या राहिल्या.

विष्णुपुरी प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाल्यानंतर शंकरराव चव्हाण यांनी केंद्रात अर्थमंत्री, गृहमंत्री, शिक्षणमंत्री इत्यादी खात्यांचा कारभार सांभाळला, परंतु ते करत असताना महाराष्ट्रातील प्रगतिपथावर असलेल्या पाटबंधारे प्रकल्पांकडे मुळीच दुर्लक्ष होऊ दिले नाही. जायकवाडी प्रकल्प आणि विष्णुपुरी प्रकल्प ह्या दोन योजना म्हणजे शंकरराव चव्हाणांच्या जणू मानसकन्याच होत्या. विष्णुपुरी प्रकल्पाची संकल्पचित्रे शंकररावांनी स्वतःलक्ष घालून तज्ज्ञांकडून तयार करून घेतली. प्रत्येक स्तरावर येणाऱ्या अडचणी त्यांनी जातीने सोडविल्या. आवश्यक तिथे मार्गदर्शन केले. प्रकल्पांच्या पूर्णतेसाठी निधी कमी पडला असता, तो केंद्र सरकारकडून वेळोवेळी खेचून आणला.

१९८८ अखेरपर्यंत या प्रकल्पावर ४२४६.७१ लक्ष रुपये खर्च झाला आहे. वास्तविक जून १९९४ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित होते परंतु निधीअभावी अजूनही हा प्रकल्प अपूर्ण अवस्थेत आहे. सध्या विष्णुपुरी प्रकल्पाचे दगडी बांधकाम शंभर टक्के पूर्ण झाले असून पंपहाऊसचे कामसुद्धा

पूर्ण झाले आहे. पहिल्या टप्प्यातील उद्धरण नलिकेच्या तीन वाहिन्या कार्यरत झाल्या आहेत. उद्धरण वाहिनीच्या शेवटी डोंगरावर जलवितरण कुंभ उभारण्यात आला असून मोठमोठ्या तीन पाईपद्वारे प्रकल्पातील पाणी पंपहाऊसच्या सहाय्याने जलवितरण कुंभात नेऊन सोडले जाते. जलवितरण कुंभातील पाणी कालव्यांद्वारे शेतीला पुरविले जाते. निधीअभावी आणखी पंपहाऊस व उद्धरण वाहिन्या कार्यान्वित व्हायच्या आहेत. हा प्रकल्प शंभर टक्के पूर्ण झाल्यानंतर २८ हजार ३४० हेक्टर जमिनीला पाणीपुरवठा होणार आहे.

ज्याप्रमाणे औरंगाबाद शहर आणि परिसराला नाथसागरातून पाणीपुरवठा होतो. त्याप्रमाणे नांदेड शहराला पिण्यासाठी आणि औद्योगिक क्षेत्रासाठी विष्णुपुरी प्रकल्पातून पाणीपुरवठा होतो. जर शंकररावांनी जिद्दीने आणि दूरदृष्टीने विष्णुपुरी प्रकल्प उभारला नसता तर पाण्याविना नांदेड शहराची आज काय स्थिती झाली असती, याची नुसती कल्पना जरी केली तरी अंगावर शहारे येतात.

कविवर्य प्रा.फ.मुं. शिंदे यांनी आपल्या 'गंगाधर' या कवितेत ना. शंकरराव चव्हाण यांना 'गंगाधर' संबोधून पाटबंधारे क्षेत्रातील त्यांचे कर्तृत्व नेमक्या शब्दांत बांधले आहे फ. मुं. म्हणतात-

वाहणारे पाट इथले तुझ्याच आनंदाची गाणी
नाथसागरात पाहते रूप अजिंठ्याची लेणी
युगायुगांचे भोगत आली
इथली अनंत शाप माती

मायावी प्रकाश विझवी
वर्धमान होणाऱ्या  वाती
गंधित सुगंधित तुझी ती अंगणातली रातराणी
वाहणारे पाट इथले तुझ्याच आनंदाची गाणी

काही दिले काही घेतले
स्वप्नांचे इतिहास नवे
तुझ्या दिठीला कळत आले
पथीच्या काय शिळेस हवे
प्रतिमांचे साकार ते स्पर्श पावलांचे ऋणी
नाथसागारात पाहते रूप अजिंठ्याची लेणी

गोदावरीस कुठले बंधन
तिची खळाळत धार वाहते
टाकीत मागे सर्व किनारे
सुख दुःखाचे खडक साहते
थोपविले कुणी कितीही तरी वाहणार हे पाणी
वाहणारे पाट इथले तुझ्याच आनंदाची गाणी

कुसुमाच्या परिमलात तुझे
मन ध्यानस्थ प्रसन्न फुलते
सविता तू असा की पुन्हा
सावली उन्हाकडेच कलते
ध्येयाच्या ध्यासामागे पाय धावती अनवाणी
नाथसागरात पाहते रूप अजिंठ्याची लेणी

फ.मुं.नी म्हटल्याप्रमाणे शंकररावांनी इथल्या युगानुयुगांच्या शापित तृषार्त भूमीची तहान शमविली. अजिंठ्याच्या लेण्यांना नाथसागरात आपले रूप न्याहाळण्याचा मोह व्हावा, असे अजोड ऐतिहासिक कार्य शंकररावांच्या नावावर जमा आहे. म्हणूनच महाराष्ट्राचे विद्यमान मुख्यमंत्री ना. विलासराव देशमुख यांनी शंकररावांना आपले राजकीय गुरू मानले आहे.

## कृषिउद्योग विकास महामंडळाची स्थापना

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी शेतकरी हा केंद्रबिंदू मानून राज्याच्या विकासकार्याचे नियोजन केले. वसंतराव नाईक यांनी हरितक्रांतीचा ध्यास घेतला होता. शंकरराव चव्हाण यांच्या प्रयत्नांयमुठे राज्यात प्रत्येक विभागासाठी कृषी विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. या विद्यापीठांतून दरवर्षी मोठ्या प्रमाणावर पदवीधर बाहेर पडू लागले. त्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध नसल्यामुळे कृषी पदवीधरांच्या बेकारीत भर पडत गेली. ही कोंडी फोडण्यासाठी म्हणून कृषिमंत्री या नात्याने शंकररावांनी १९७२ मध्ये कृषी उद्योग विकास महामंडळाची स्थापना केली. या महामंडळाचे अध्यक्ष या नात्याने शंकररावांनी राज्यभर शेतीव्यवसायाशी निगडित असलेल्या अनेक लहान-मोठ्या प्रकल्पांची उभारणी केली. १९६८ ते ७० या दोन वर्षांच्या काळात मध्यम स्वरूपाचे ५६ प्रकल्प आकाराला आले. या प्रकल्पांमुळे कोकणच्या ३४ हजार ९१७ एकर जमिनीला पाणी उपलब्ध होऊ शकले.

महाराष्ट्र हे केळी उत्पादनातील एक महत्त्वाचे राज्य आहे. असे असले तरी केळी उत्पादक शेतकऱ्यांना केळी पिकासंबंधी शास्त्रशुद्ध मार्गदर्शन मिळण्याची कोणतीच सोय उपलब्ध नव्हती. म्हणून १९६९-७० यावर्षी शंकरराव चव्हाणांनी जळगाव जिल्ह्यातील सावदा येथे केळी संशोधन केंद्राची स्थापना केली. या केंद्राच्या माध्यमातून झालेल्या

संशोधनामुळे केळी उत्पादक शेतकऱ्यांना खूप लाभ झाला. केळीच्या उत्पादनात लक्षणीय वाढ झाली.

शंकरराव चव्हाणांनी शेतीच्या विकासासाठी महाराष्ट्रात जिथे शक्य असेल तिथे विरोधकांचा विरोध पत्करून धरणे बांधली. धरणांमुळे शेतीला पुरेसा पाणी पुरवठा होऊ लागला. कोरडवाहू शेतीचे रुपांतर बागायती शेतीमध्ये झाले. आता आवश्यकता होती, कृषी क्षेत्रातील नवनवीन संशोधनांची. ही गरज भागविण्यासाठी कृषी विद्यापीठांची स्थापना होणे आवश्यक वाटू लागले. शंकररावांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठवाड्यासाठी कृषी विद्यापीठाची स्थापना होणे किती गरजेचे आहे हे तळमळीने पटवून दिले. १९६८ सालापर्यंत महाराष्ट्रात केवळ एकच कृषी विद्यापीठ होते. १९६९ साली अकोला येथे दुसरे कृषी विद्यापीठ स्थापन झाले. या विद्यापीठाच्या स्थापनेच्यावेळी अकोला येथे विद्यापीठाचे मुख्य केंद्र ठेवून परभणी आणि दापोली येथे उपकेंद्र स्थापन करावीत असे ठरले. जेथे कृषी विद्यापीठाचे उपकेंद्र आहे तेथे पुढील १० वर्षात त्या उपकेंद्राला संपूर्ण कृषी विद्यापीठाचा दर्जा देण्यात यावा असे धोरण होते. त्या धोरणाला अनुसरून शंकररावांनी विधिमंडळात ही मागणी लावून धरली. कृषी विद्यापीठाच्या स्थापनेशिवाय शेतकऱ्यांना कृषीक्षेत्राचे अद्ययावत ज्ञान मिळणार नाही याची शंकररावांना जाणीव होती. शिक्षणाबरोबरच विद्यापीठात विस्तारसेवा आणि संशोधन या गोष्टी होणार असल्यामुळे त्याचा लाभ मराठवाड्यातील शेतकऱ्यांना मिळेल, असा विश्वास शंकररावांना होता. म्हणून शंकररावांनी परभणी येथे

कृषी विद्यापीठ स्थापन करण्याच्या मागणीचा विधिमंडळात पाठपुरावा केला आणि अखेर हे विद्यापीठ स्थापन झाले. या विद्यापीठातील शिक्षणाचा व संशोधनाचा मराठवाड्यातील शेतकरी लाभ घेत आहेत.

## कृषी विद्यापीठांची स्थापना

परभणी येथे कृषी विद्यापीठ स्थापन झाले तरी शंकरराव त्यावर समाधानी नव्हते. कारण केवळ मराठवाड्याचा विकास म्हणजे सबंध महाराष्ट्राचा विकास नव्हे, याची त्यांना यथार्थ जाण होती. म्हणून शंकररावांनी कोकणातील दापोलीच्या उपकेंद्राचेसुद्धा कोकण कृषी विद्यापीठात रूपांतर व्हावे असा प्रस्ताव विधिमंडळात मांडला. कोकणचे हवामान फळबागायतीसाठी अतिशय अनुकूल आहे. कोकणचा कॅलिफोर्निया करावयाचा असेल तर कोकणात स्वतंत्र कृषी विद्यापीठ स्थापन करण्याशिवाय पर्याय नाही अशी शंकररावांची भूमिका होती. अखेर शंकररावांच्या प्रयत्नांना यश आले आणि दापोली येथे स्वतंत्र अशा कोकण कृषी विद्यापीठाची स्थापना झाली. या विद्यापीठातील विस्तारसेवा, शिक्षण आणि संशोधनामुळे कोकणातील फळबागायतीच्या विकासाला दिशा आणि गती मिळाली आहे.

कृषी विद्यापीठातून पदवीधर होऊन बाहेर पडलेला विद्यार्थी सामान्यतः नोकरीच्या मागे लागतो. परंतु आपण आपल्या ज्ञानाच्या बळावर स्वतंत्रपणे काही उद्योग व्यवसाय करू शकतो, असा विश्वास या विद्यार्थ्यांच्या ठिकाणी निर्माण होत नाही. यावर मात करण्यासाठी शंकररावांनी असा एक उपाय सुचविला की कृषी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना रोख रकमेची शिष्यवृत्ती न देता त्या विद्यार्थ्याला चार एकर

जमिनीचा तुकडा द्यावा. शेतीत जो अधिकाधिक उत्पादन काढील त्याला शिष्यवृत्ती द्यावी. अशा प्रकारची सूचना शंकररावांनी कृषी विद्यापीठांना केली होती. त्यासाठी त्यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील जंगलखात्याची पाचशे एकर जमीन कृषी विद्यापीठाला मिळवून दिली होती. कृषी पदवीधर हा केवळ ज्ञानकेंद्री न होता तो श्रमकेंद्री व स्वावलंबी झाला पाहिजे, ही या धोरणामागे शंकररावांची स्वच्छ भूमिका होती.

शंकरराव चव्हाणांच्या एकूण चरित्राचा आणि त्यांच्या कार्यपद्धतीचा विचार केला असता आपल्या असे लक्षात येते की त्यांनी कृषी क्षेत्राच्या विकासाचा साकल्याने विचार केला होता. शेतीला पाणी, आधुनिक ज्ञान, त्याबरोबरच रासायनिक खते पुरेशा प्रमाणात उपलब्ध झाली पाहिजेत यासाठी ते सदैव प्रयत्नशील होते. केवळ पारंपरिक शेणखतावर विसंबून राहून उत्पादनात वाढ होणार नाही. त्यासाठी गरजेनुसार शेतकऱ्यांनाच विभागवार व योग्य दरात रासायनिक खते मिळाली पाहिजेत, याचीही त्यांनी दक्षता घेतली होती.

# आठमाही पाणीवाटप धोरण

शंकरराव चव्हाणांची काही धोरणे वादग्रस्त ठरली, तर काही धोरणे त्यांच्या विरोधकांनी मुद्दाम वादग्रस्त बनवली. महाराष्ट्रात केवळ १३ टक्के क्षेत्रावर उसाचे पीक घेतले जाते. त्या उसासाठी उपलब्ध पाण्यापैकी ७० टक्के पाणी वापरले जाते. उर्वरित ३० टक्के पाण्यावर बाकीची ८० टक्के जमीन कशीबशी ओलिताखाली आणावी लागते. हे पाण्याचे विषम वाटप आहे, हे शंकररावांना सारखे खटकत होते. शिवाय उसाच्या लागवडीखालील जमीन कालांतराने क्षारयुक्त बनते. ही जमीन पुन्हा पूर्वीसारखी उपजाऊ बनवायची असेल तर त्यासाठी किमान २० वर्षांचा कालावधी जावा लागतो. हे दुष्टचक्र थांबविण्यासाठी शंकरराव चव्हाणांनी बारमाही पाणी वाटपाच्या धोरणाऐवजी आठमाही पाणीवाटपाचे धोरण जाहीर केले. पाण्याचे न्याय्य वाटप आणि त्या माध्यमातून छोट्या व अधिक शेतकऱ्यां चे हित ही त्यामागील दृष्टी होती.

आठमाही पाणीवाटपाच्या शंकररावांच्या या धोरणावर जाणीवपूर्वक राजकीय गुंतागुत निर्माण करण्यात आली. हा गुंता सोडविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दांडेकर समिती आणि सुब्रह्मण्यम समिती अशा दोन समित्या स्थापन करून त्यांच्यावर या संदर्भात निर्णय घेण्याची जबाबदारी टाकली. या दोन्ही समित्यांनी सखोल अभ्यास करून शंकररावांच्या आठमाही पाणीवाटप धोरणावर शिक्कामोर्तब केले. दांडेकर

आणि सुब्रह्मण्यम ह्या शेती व पाणी या क्षेत्रातील जाणकारांनी शास्त्रीय दृष्टिकोनातून तसा निष्कर्ष काढल्यामुळे शंकररावांच्या धोरणाला अधिकच बळ मिळाले. किंबहुना शंकररावांचे पाणीवाटप धोरण मुळातच किती न्याय्य व शास्त्रशुद्ध होते, याची प्रचिती महाराष्ट्राला आली.

## दळणवळण मंत्री

शंकरराव चव्हाण दळणवळण मंत्री असताना मराठवाडा आणि एकूणच उर्वरित महाराष्ट्रात दळणवळणाच्या मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रयत्न केले. मराठवाड्यातील रेल्वेमार्ग ब्रॉडगेजमध्ये रुपांतरित व्हावा, यासाठी ते जसे प्रयत्नयशील होते, तसेच कोकणासारख्या अविकसित भागासाठीसुद्धा रेल्वे धावली पाहिजे अशी त्यांची सर्वस्पर्शी न्यायोचित भूमिका होती. परिवहन खात्याचे मंत्री असताना शंकररावांनी एस.टी.तील कर्मचाऱ्यांसाठी गृहनिर्माण वसाहती, वैद्यकीय सोयी सुविधा, एस.टी. कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी शिष्यवृत्ती, भविष्य निर्वाहनिधी, बोनस इत्यादी योजना लागू केल्या. दळणवळण मंत्री म्हणनू शंकररावांनी मागास भागात नवीन रस्ते बांधायला प्राधान्यक्रम दिला. अशा अविकसित भागांचा इतर प्रदेशांच्या तुलनेत समतोल विकास व्हावा यासाठी चौथ्या पंचवार्षिक योजनेत त्यांनी ९० कोटी रुपयांची तरतूद केली.

राज्य परिवहन महामंडळ अधिक लोकाभिमुख करण्यासाठी परिवहनमंत्री या नात्याने शंकररावांनी बसेसची संख्या वाढवली. सबंध महाराष्ट्रासाठी फक्त दापोडी येथे एस.टी.ची एकच कार्यशाळा होती. त्यामुळे त्या कार्यशाळेवर अतिरिक्त ताण पडत असे. शिवाय बसेसचे सांगडे तयार करणे, त्यांच्या इंजिनची दुरुस्ती करणे, जोडणी करणे या

कामांसाठी खूप वेळ वाट पहावी लागत असे. ही अडचण दूर करण्यासाठी शंकररावांनी औरंगाबाद आणि नागपूर येथे नवीन मध्यवर्ती कार्यशाळांची स्थापना केली. शंकरराव परिवहनमंत्री असताना प्रत्येक जिल्ह्यातील बसस्थानकांना अद्ययावत स्वरूप आले. याच काळात एस.टी. महामंडाळाने 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हे आपले ब्रीद खरे करून दाखवले.

## पहिल्यांदा मुख्यमंत्री

१९५६ मध्ये शंकरराव चव्हाण महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात महसूल खात्याचे उपमंत्री म्हणून दाखल झाले आणि पुढे त्यांना अशा पदांसाठी कुणाच्या मागे धावण्याची गरजच भासली नाही. किंबहुना वेगवेगळी पदे शंकररावांच्या पाठीमागे धावत आली. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात दळणवळण, परिवहन, कृषी, पाटबंधारे इत्यादी खात्यांचा कार्यभार सांभाळत असताना महाराष्ट्राचा चौफेर आणि सर्वांगीण विकास हे शंकररावांचे जीवितध्येय होते. त्याला अनुसरून ते अहोरात्र प्रयत्नशील राहिले. त्यांनी केलेल्या कार्याची पावती म्हणून १९७५ ते ७७ या काळात त्यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून काम करण्याची दुर्मिळ संधी लाभली.

मुख्यमंत्रिपदाच्या दोन वर्षांच्या काळात ना. शंकरराव चव्हाण यांनी विकासकामांचा अक्षरशः डोंगर उभा केला. महाराष्ट्राला नवा चेहरा मिळवून देण्याचा प्रयत्न केला. प्रशासनात अनुशासनपर्व आणले, परंतु सत्तास्पर्धेच्या आणि गटबाजीच्या राजकारणामुळे अखेर दि. २७-२-१९७७ रोजी त्यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला.

मुख्यमंत्रिपदावर असताना राहायला प्रशस्त बंगला होता. हाताखाली नोकरचाकर होते. पदावरून पायउतार झाल्यानंतर त्या सर्व सोयीसुविधा गेल्या. आता शंकररावजी केवळ आमदार होते. त्यामुळे निवासस्थानाचा प्रश्न

त्यांच्यासमोर उभा राहिला. शंकररावांच्या जागी अन्य कोणी असते, तर त्यांनी आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीतच मुंबईत स्वतःच्या मालकीच्या स्वतंत्र घराची सोय करून घेतली असती, परंतु इतरांच्या डोक्यावर मायेची सावली आणि हक्काचे छत निर्माण करून देणाऱ्या व 'हे विश्वचि माझे घर' असे मानणाऱ्या शंकररावांना स्वतःसाठी त्याची गरज वाटली नसावी.

निवाऱ्यासाठी शोधाशोध सुरू झाली तर मुंबईसारख्या महानगरात माजी मुख्यमंत्री शंकररावांना राहायला दोन खोल्या मिळेनात. अशा परिस्थितीत कुटुंबाची आबाळ होऊ नये म्हणून शंकररावजींनी सौ. कुसुमताईंसमोर एक प्रस्ताव ठेवला, "तुम्ही आता नांदेडला आपल्या घरी निघा. आमच्यामुळे तुमचे उगीच हाल व्हायला नकोत."

चि. मंगलताई आणि चि. अशोकराव यांचं महाविद्यालयीन शिक्षण चाललं होतं. मुलांचं शिक्षण अर्धवट सोडून गावी परत जाण्याचा प्रस्ताव सौ. कुसुमताईंना पटण्यासारखा नव्हता. महाराष्ट्राच्या माजी मुख्यमंत्र्याला पदावरून पायउतार झाल्यानंतर मुंबईत रहायला घर मिळू नये, ही जशी आश्चर्याची तशी खेदाची बाब म्हणावी लागेल. परंतु या सर्व कसोटीच्या काळतही स्थितप्रज्ञ वृत्तीचे शंकररावजी स्थिरचित्त होते. मुख्यमंत्रिपदासोबत जे आले होते ते त्या पदासोबत गेले, यात दुःख ते काय करायचे, ही शंकररावांची अलिप्त वृत्ती.

अखेर मुख्यमंत्र्यांच्या आदेशावरून शंकररावांना 'जयमहाल' या इमारतीत पाचव्या मजल्यावरील एक फ्लॅट

मिळाला. परंतु त्या आदेशातही एक गोम होती. कारण तो फ्लॅट केंद्र सरकारच्या अधिकाऱ्यांसाठी राखीव होता. दहा महिन्यांपेक्षा अधिक काळ त्यांना तेथे राहता येणे शक्य नव्हते. दहा महिन्यानंतर त्यांना तोही फ्लॅट सोडावा लागला आणि पुन्हा घराच्या शोधासाठी धावपळ सुरू झाली.

एका अधिकाऱ्याने शंकररावांना आमदार निवासातील सहाव्या मजल्यावरील एक खोली देऊ केली. परंतु दररोजचा सहा मजल्यांचा चढउतार झेपण्यासारखा नसल्यामुळे विनंतीवरून त्यांना तळमजल्यावरील एक खोली मिळाली. प्रशस्त बंगल्यात राहायची सवय असूनसुद्धा आडोशासाठी दोन-तीन कपाटे आडवी लावून सौ. कुसुमताईंनी आमदार निवासाच्या एकाच खोलीत आपला संसार थाटला. जवळजवळ सहा महिने त्यांना एकाच खोलीत काढावे लागले. त्याबद्दल शंकररावांना ना खेद होता ना खंत ! त्यांनी स्वाभिमानाने स्वीकारलेला तो राजमार्ग होता. महाराष्ट्राच्या माजी मुख्यमंत्र्याला पदावरून उतरल्यावर लगेच मुंबईत राहायला घर मिळू नये, ही नव्या पिढीला कदाचित दंतकथा वाटेल, परंतु ही वस्तुस्थिती होय.

## गोदातीरावरून यमुनातीराकडे. . . . .

मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीत शंकररावांनी महाराष्ट्राची विविध क्षेत्रात जी मजबूत बांधणी केली त्यामुळे राष्ट्रीय नेत्यांचे लक्ष शंकररावांकडे वेधले गेले. १९८० मध्ये लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक झाली. या निवडणुकीत शंकररावांना पक्षश्रेष्ठींनी नांदेड लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढविण्याचा आदेश दिला. पक्षादेश शिरोधार्य मानून शंकररावांनी ती निवडणूक लढविली आणि बहुमताने जिंकलीसुद्धा! काँग्रेसला देशात बहुमत मिळाले. इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या. शंकरराव चव्हाणांनासुद्धा या निमित्ताने राष्ट्रीय स्तरावर काम करण्याची संधी मिळाली. इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळात दि. १९ ऑक्टोबर १९८० रोजी शंकररावांनी केंद्रीय शिक्षणमंत्री म्हणून शपथ घेतली. १९८१ ते ८४ या काळात केंद्रीय नियोजन मंत्री आणि संरक्षण मंत्री म्हणूनही त्यांना काम करावे लागले. वास्तविक ही मंत्रिपदे शंकररावांकडे फार कमी काळ राहिली. तरीसुद्धा त्यांनी या खात्यांवर आपली खास अशी ‘शंकरमुद्रा’ उमटवली. केंद्रीय शिक्षणमंत्री म्हणून काम करताना इतर देशांतील शिक्षणाच्या तुलनेत भारतातील शिक्षणाचा दर्जा उच्च असला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. ज्याप्रमाणे शिक्षणमंत्री मौलाना अबूल कलाम आझाद यांनी राष्ट्राच्या नियोजनात शिक्षणाला महत्त्व मिळवून दिले होते, तद्वतच शंकररावांनीसुद्धा शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. उच्च

शिक्षणाला दर्जा प्राप्त करून देत असतानाच शिक्षणाची गंगा खेड्यापाड्यातील, वाडी तांड्यावरील कष्टकरी माणासांच्या दारात पोचली पाहिजे, हा त्यांचा ध्यास होता.

शंकरराव चव्हाण जेव्हा केंद्रीय शिक्षणमंत्री झाले तेव्हा शिक्षण संस्थांमध्ये अनधिकृत फी घेण्याची दुष्ट प्रथा रूढ झाली होती. अशी चुकीची पद्धत प्रतिष्ठा पावत असल्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या मुलांना फी भरून शाळा-महाविद्यालयात प्रवेश मिळणे अवघड होऊन बसले होते. याला आळा घालण्यासाठी शिक्षणमंत्री म्हणून शंकरराव चव्हाण यांनी कॅपिटेशन फीवर कायदेशीर बंदी घातली. कष्टकऱ्यांच्या मुलांसाठी शिक्षण स्वस्त केले. हे करत असताना शंकररावांना अनेकांचा रोष पत्करावा लागला. परंतु शंकरराव हे गोरगरिबांचे प्रतिनिधी असल्यामुळे त्यांनी तो रोष सहज पत्करला. ज्याप्रमाणे भगवान शंकर समुद्रमंथनातून बाहेर आलेले जहाल हलाहल पचवून 'नीळकंठ' बनले, तद्वतच शंकररावांनी जनहितास्तव प्रस्थापितांच्या टीकेचे हलाहल पचविले. यातून त्यांची सामान्य माणसाविषयीची आस्था, फुले-शाहू-आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांवरील अव्यभिचारी निष्ठा आणि भारतीय राज्यघटनेवरील अढळ श्रद्धा दिसून येते.

दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील कुलगुरू आणि विद्यार्थी संघटना यांच्यामध्ये संघर्ष निर्माण झाला होता. शिक्षण क्षेत्रातील अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी शंकररावांनी एक समिती स्थापन केली. त्या समितीच्या माध्यमातून विद्यापीठातील प्राध्यापक, शिक्षक संघटनेचे

प्रतिनिधी, विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी यांच्यात समन्वय घडवून आणून दि. ३ जानेवारी १९८१ रोजी दिल्ली विद्यापीठातील गढूळ झालेले वातावरण पूर्वपदावर आणले.

## केंद्रात मंत्री

१९८२-८३ या काळात शंकरराव चव्हाण देशाचे नियोजनमंत्री राहिले. समाजाच्या तळातील शेवटचा घटक आपल्या मूलभूत गरजा भागवून सुखी-समाधानी जीवन जगला पाहिजे असे त्यांच्या नियोजनाचे सूत्र होते. देशातील सर्व भागांचा संतुलित विकास तर झाला पाहिजेच, शिवाय सामान्यातिसामान्य लोकांचे जीवनमान सुधारले पाहिजे, या गोष्टीला त्यांनी आपल्या नियोजनात अधिक महत्त्व दिले होते. अल्पकाळ का होईना देशाचे अर्थखातेसुद्धा शंकरराव चव्हाणांनी सांभाळले. आपल्या स्वच्छ प्रशासनामुळे आणि जनहितकारी धोरणांमुळे याही खात्यावर त्यांनी आपल्या कार्यशैलीची छाप पाडली.

शंकरराव चव्हाण यांनी केंद्र सरकारात शिक्षण, नियोजन, अर्थ इत्यादी खात्यांचे मंत्री म्हणून काम पाहिले असले तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेशी आणि आव्हानात्मक भूमिका बजावण्याची संधी त्यांना केंद्रीय गृहमंत्री म्हणून काम करताना मिळाली. शंकरराव चव्हाण जेव्हा देशाचे गृहमंत्री झाले तेव्हा देशासमोर अनेक राष्ट्रीय समस्यांनी उग्र स्वरूप धारण केले होते. त्यातली मुख्य समस्या होती ती जम्मू आणि काश्मीरची. १९९१ च्या सुमारास जम्मू-काश्मीरमधील परिस्थिती अक्षरशः हाताबाहेर गेली होती. कडव्या अतिरेक्यांनी तिथे हैदोस घातला होता. जनसामान्यांचे जीवन सुरक्षित नव्हते. दररोज निरपराध

माणसांचे रक्त सांडले जात होते. वास्तविक काश्मीरला 'भारताचे नंदनवन' म्हटले जाते. परंतु अतिरेक्यांच्या हिंस्त्र कारवायांमुळे हे नंदनवन शापित बनले होते. केंद्रीय गृहमंत्री या नात्याने शंकरराव चव्हाण यांनी जम्मू-काश्मीरमधील बिकट परिस्थिती हाताळण्यासाठी लष्कराची मदत घेतली. सैन्याने काश्मीरमधील दहशतवाद रोखण्यासाठी लक्षणीय कार्य केले.

जम्मू-काश्मीरच्या संदर्भात अमेरिकेने पाकिस्तानच्या बाजूने अनुकूल तर भारताच्या बाबतीत बोटचेपेपणाचे धोरण स्वीकारले होते. ही परिस्थिती लक्षात घेऊन अमेरिकेला शह देण्यासाठी रशियाशी मैत्री करणे ही काळाची गरज होती. ती गरज ओळखून तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी नोव्हेंबर १९८६ मध्ये रशियाचे अध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह यांच्याशी मैत्रीचा करार केला. हा करार घडवून आणण्यात शंकररावांची भूमिका अतिशय महत्त्वाची होती. भारताबरोबरच जगातही शांतता नांदावी यासाठी भारत आणि रशिया या दोन्ही देशांनी खूप प्रयत्न केले. भारत रशिया यांचा मैत्री करार आणखी २० वर्षे पुढे चालविण्यासाठी शंकरराव चव्हाणांनी जे योगदान दिले त्याला तोड नाही.

१९९१ मध्ये काश्मीरमध्ये लागू असलेल्या राष्ट्रपती राजवटीची मुदत वाढविण्यात यावी अशी शिफारस करण्यात आली होती. त्या शिफारशीनुसार काश्मीरात राष्ट्रपती राजवट आणखी वाढविण्यात आली. राष्ट्रपती राजवट हा काश्मीरच्या शांततेवरचा अंतिम आणि एकमेव

तोडगा नव्हे, हे लोकशाहीवादी शंकररावांनी हेरले होते. काश्मीर खोऱ्यात शांतता नांदावी यासाठी आधी तेथील लोकांच्या मनातील भीती दूर करणे गरजेचे होते. त्यासाठी शंकरराव स्वतः काश्मीरात गेले. तेथील सर्व पक्षांच्या नेत्यांची वैठक बोलावली. शंकररावांनी काश्मीरमधील शांततामय सहजीवनासाठी मार्गदर्शन केले. केवळ बंदुकीच्या जोरावर काश्मीरचा प्रश्नस सुटणार नाही, त्यासाठी काश्मीरात काही विकासात्मक कार्य हाती घेणे अगत्याचे आहे, याची जाणीव शंकररावांना त्या दौऱ्यात झाली. काश्मीरमधील अतिरेक्यांना पाकिस्तान सरकार वेगवेगळ्या प्रकारे मदत करत आहे, हे जगासमोर येणे आवश्यक होते. केंद्र सरकार काश्मीरात विकास योजना राबवील, परंतु स्थानिक जनतेला विश्वास देण्याचे काम तर स्थानिक राजकीय नेत्यांनीच केले पाहिजे, असा शंकररावांचा आग्रह होता. काश्मिरी नागरिकांच्या स्थलांतराला आळा घालणे हे सुद्धा आवश्यक होते. काश्मीरचा प्रश्न बुलेटने (बळाने) न सोडवता तो बॅलेटने (लोकशाही मार्गाने) सोडवता आला पाहिजे, असा शंकररावांचा लोकशाहीनिष्ठ दृष्टिकोन होता. त्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले.

## काश्मीरचा प्रश्ना सोडविला

काश्मीरचा प्रश्नप हा भारत-पाक फाळणीनंतर भारतीय स्वातंत्र्याला आलेले एक कडू फळ होय, असे म्हटल्यास ते वावगे होणार नाही. काश्मीर ही स्वातंत्र्याच्या पहाटेपासूनच भारताची डोकेदुखी होऊन बसली आहे. ही डोकेदुखी थांबविण्यासाठी गृहमंत्री या नात्याने शंकरराव चव्हाण यांनी हरप्रकारची उपाययोजना केली. स्थानिक जनतेच्या मनातील आर्थिक मागासलेपणाची भावना दूर व्हावी यासाठी, काश्मीरचा विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी मुबलक निधी उपलब्ध करून दिला तरी तेथील दहशतवादी कारवाया थांबेनात. सैनिकांच्या काही तुकड्या काश्मीरमध्ये तैनात करून जनजीवन सुरळीत करण्याचाही ना. चव्हाण यांनी प्रयत्नन केला. पण त्यातही त्यांना यश येत नव्हते. कारण काश्मीरमध्ये लहान-मोठ्या ४४ दहशतवादी संघटना कार्यरत होत्या. या संघटनांनी पाकिस्तानातून प्रशिक्षण, पैसा व शस्त्रे पुरविली जात होती. या संघटनांनी काश्मीरखोऱ्यातील जनजीवन विस्कळीत करून टाकले होते. बॉम्बस्फोट, जाळपोळ, अपहरण, रॉकेट हल्ले, रक्तपात, निरपराध लोकांच्या कत्तली यामुळे १९९० ते १९९३ या काळात काश्मीरात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. अशा परिस्थितीमध्ये गृहमंत्रालयाने अतिरेक्यांच्या ठाण्यावर हल्ले करून मोठ्या प्रमाणावर शस्त्रसाठा जप्त केला. हळूहळू स्थानिक जनतेचा विश्वास

संपादन करण्याचा प्रयत्न केला. १९९० पासून दर सहा महिन्यांनी राज्यपालांची राजवट वाढविण्यात येत होती. त्यामुळे काश्मीरी जनतेचा लोकशाहीवरचा विश्वास उडत चालला होता. तो धोका टाळण्यासाठी गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांनी काश्मीरमध्ये टप्प्याटप्प्याने निवडणुका घेऊन लोकनियुक्त सरकार स्थापन करण्याची घोषणा केली. काश्मीरात शांतता प्रस्थापित करण्यासाठी गृहमंत्री या नात्याने शंकरराव चव्हाण यांनी काश्मीरचे दौरे केले. काश्मीरी जनतेला अभय आणि विश्वास दिला. चोख प्रशासनव्यवस्था उभी केली.

एकदा ना. शंकरराव चव्हाण काश्मीरच्या दौऱ्यावर असताना अतिरेक्यांनी त्यांच्या हेलिकॉप्टरवर सतत पंधरा मिनिटे गोळीबार केला. सुरक्षा रक्षकांनी त्यास चोख प्रत्युत्तर देऊन शंकररावजींचे प्राण वाचविले. अशाप्रकारे शंकररावांनी काश्मीरचा प्रश्नन सोडविण्यासाठी आपला जीव धोक्यात घातला. प्राणांवरचे संकट ओढवून घेतले, परंतु अतिरेकी संघटनांना भीक घातली नाही. एकीकडे शंकरराव चव्हाण काश्मीरमध्ये निवडणुका शांततामय वातावरणात व्हाव्यात यासाठी प्रयत्नणशील होते तर दुसरीकडे काश्मीरात निवडणुका होऊच द्यायच्या नाहीत यासाठी अतिरेकी संघटनांनी कंबर कसली होती. दहशत पसरविण्यासाठी त्यांनी काश्मीरखोऱ्यात अनेक ठिकाणी बॉम्बस्फोट घडवून आणले. त्याला प्रत्युत्तर म्हणून शंकररावांनी काश्मीरात लष्कराचे संचलन घडवून आणले. काश्मीरच्या प्रश्नी अमेरिकेने भारताच्या विरोधात अपप्रचार

चालविला होता. ना. शंकरराव चव्हाण यांनी अमेरिकेच्या या धोरणाचा तीव्र शब्दात जाहीर निषेध केला. अमोरिकेची काश्मीरप्रश्नीर भूमिका लबाड लांडग्यासारखी आहे या प्रश्नात अमेरिकेने चोंबडेपणा करू नये, असा इशाराही ना. शंकरराव चव्हाण यांनी दिला.

## फुटिरतावांद्याना फटकारले

उतर हिंदुस्थानात काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी जसा धुडगूस घातला होता तसा दक्षिण भारतात विशोषतः तामिळनाडू राज्यात लिबरेशन टायगर्स ऑफ तमील इलम (एल.टी.टी.ई.) या अतिरेकी संघटनने दहशतवादी आणि अशांततावादी कारवाया सुरू केल्या होत्या. काश्मीरप्रमाणेच तामिळनाडूतसुद्धा हत्याकांडांचे सत्र सुरू झाले होते. एल.टी.टी.ई. ही राजकीय संघटना असल्याच्या नावाखाली त्या संघटनेवर बंदी घालणे राज्य सरकारसमोर एक आव्हान होते. या संघटनेच्या हिंस्त्र कारवायांमुळे राज्यातील शांतता आणि सुव्यवस्था धोक्यात आली होती.

एल.टी.टी.ई. च्या दशहतवादी कृत्यांना पायबंद घालण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांनी कठोर पावले उचलली. या संघटनेच्या कार्यकर्त्यांना श्रीलंकेतून शस्त्रे पुरविली जातात. या कार्यकर्त्यांना गुन्हेगारी कृत्यांचे प्रशिक्षण देऊन भारतात पाठवले जाते. तामिळनाडू हा प्रदेश भारतापासून तोडण्याचे हे शेजारी देशाचे (श्रीलंकेचे) प्रयत्न आहेत, हे शंकरराव चव्हाणांनी जगाला ठणकावून सांगितले. या संघटनेच्या कारवायांना वेळीच आळा घालणे आवश्यक होते. अन्यथा देशाचे सार्वभौमत्व धोक्यात आले असते. तो धोका टाळण्यासाठी शंकररावांनी एल.टी.टी.ई. ही संघटना बेकायदेशीर असल्याचे केंद्र सरकारच्या वतीने जाहीर केले. शंकररावांच्या या घोषणेमुळे राज्य सरकारला नैतिक बळ

मिळाले. या संघटनेवर प्रतिबंध घालण्यासाठी राज्य सरकारला आधार मिळाला. शंकररावांच्या कर्तव्यकठोर भूमिकेमुळे तामिळनाडू राज्यातील एल.टी.टी.ई. या उग्रवादी संघटनेची पाळेमुळे खणून काढणे शक्य झाले. तामिळनाडू हा देशाचा एक लचका तोडण्याचा फुटिरतावाद्यांचा कुटील डाव हाणून पाडला.

## कणखर नेतृत्व

ज्याप्रमाणे पंजाबमधील काही दहशतवादी संघटना स्वतंत्र खलिस्तानची मागणी करीत होत्या, त्याचप्रमाणे मिझोरामचे नेते लालडेंगा यांनी मिझोरामला स्वायत्तता देण्याविषयी ताठरपणाची भूमिका घेतली होती. अशा फुटीरतावादी प्रवृत्तींना दाद दिल्यास देशाची एकात्मता व अखंडता धोक्यात येईल, हे शंकररावजी ओळखून होते. म्हणून गृहमंत्री ना. शंकरराव चव्हाण यांनी कोणत्याही परिस्थितीत मिझोरामला स्वायत्तता द्यायचीच नाही, अशी खंबीर भूमिका घेतली होती. अखेर लालडेंगा यांनाच नमते घेऊन स्वायत्ततेचा आपला चुकीचा आग्रह सोडून द्यावा लागला. ना. चव्हाणांच्या कणखर व पोलादी भूमिकेमुळे ईशान्य भारतातील छोट्या राज्यांना असलेला फुटीरतावादाचा धोका टळला. गृहमंत्री म्हणून ना. शंकररावांनी देशाच्या स्वायत्ततेशी आणि सार्वभौमत्त्वाशी कधीच तडजोड केली नाही.

पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळात शंकरराव चव्हाण यांनी शिक्षणमंत्री, अर्थमंत्री, नियोजनमंत्री, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, संरक्षणमंत्री या नात्याने इंदिराजींच्या बाणेदार वृत्तीला अनुसरून अनुरूप कार्य केलेच, परंतु त्यानंतर पंतप्रधानपदी विराजमान झालेल्या राजीव गांधीना राजकारणाचा फारसा अनुभव नसतानाही त्यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी गृहमंत्रिपदाची जबाबदारी तितक्याच

क्षमतेने व विश्वासाने सांभाळली. इंदिराजींच्या हत्त्येनंतर देशभर जातीय दंगली उसळल्या. विशेषतः उत्तर भारतातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती हाताबाहेर गेली होती. देश अराजकाच्या तोंडावर उभा होता. अशा कसोटीच्या काळात राष्ट्राची अखंडता व एकात्मता अबाधित राखण्याखाठी देशाला लष्करी शिस्तीचा गृहमंत्री हवा होता आणि तो शंकररावजींच्या रूपाने लाभला. असे कणखर नेतृत्व नसते तर कदाचित देशाच्या चिरफाळ्या उडाल्या असत्या.

## उद्दाम पोलिसांना पायबंद

ज्या राज्यामध्ये राष्ट्रपती राजवट असेल त्या राज्यात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडून सामान्य जनतेचा अतोनात छळ होत असे. कारण आणीबाणीच्या नावाखाली अशा उद्दाम अधिकाऱ्यांच्या हाती निरंकुशपणाचे कोलीत आले होते. अशा दमनप्रवृत्तीच्या अधिकाऱ्यामच्या जुलमाला बळी पडून सामान्य माणसे जीव मुठीत धरून जगत होती. अशा काही बातम्या वर्तमानपत्रांच्या माध्यमांतून केंद्रीय गृहमंत्री शंकरराव चव्हाणांच्या वाचनात आल्या होत्या. रयतेच्या गवताच्या काडीलासुद्धा कुणी हात लावता कामा नये, असे प्रजाहितदक्ष आदेश देणार्याय छत्रपती शिवाजी महाराजांच्या कल्याणकारी राज्यपद्धतीचा वारसा निष्ठेने सांभाळणाऱ्याच शंकरराव चव्हाणांनी या गोष्टीची गंभीर दखल घेतली. अशा रग्गेल पोलीस अधिकाऱ्यांना पायबंद घालण्यासाठी शंकररावांनी केंद्रीय कायदेमंडळात एक विधेयक मांडले. एखाद्या जुलमी पोलीस अधिकाऱ्याने प्रजेला त्रास देण्याचा गुन्हा केला असेल तर त्याला सेवेतून त्वरित बडतर्फ करण्यात यावे. त्याला कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही. या संदर्भातील कुठेही गुन्हा दाखल करता येणार नाही. या संदर्भातील सर्व अधिकार केंद्र सरकार व राज्य सरकारकडे असतील, असा या विधेयकाचा आशय होता. हे विधेयक एकमताने संमत झाले. या विधेयकामुळे अरेरावी प्रवृत्तीच्या पोलीस अधिकाऱ्यांना प्रतिबंध बसला

आणि सामान्य माणसाला अभय मिळाले. त्यांना सुखाचा श्वास घेता येऊ लागला. असे होते जनसामान्यांविषयी जागता जिव्हाळा बाळगणारे केंदीय गृहमंत्री शंकरराव चव्हाण!

## कुटुंबनियोजन : काळाची गरज

लोकसंख्या वाढीच्या बाबतीत भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. आपल्या देशात लोकसंख्या वाढीचा विस्फोट झाला आहे. या लोकसंख्या वाढीचे जे अनेक दुष्परिणाम आहेत, त्यापैकी गुन्हेगारी आणि हिंसाचार ही वाढत्या लोकसंख्येची अनौरस अपत्ये आहेत. लोकसंख्या वाढीमुळे जनजीवन विस्कळीत होऊन जाते. लोकांच्या अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा भागवणे अशक्य होऊन जाते. शिवाय गुन्हेगारी आणि हिंसाचारामुळे सामान्य माणसांच्या मनात असुरक्षिततेची भावना घर करू लागते. सामान्य माणसाच्या मनात एकदा का अशी भावना बळावली, की त्याला देश आणि देशवासीयांविषयी अजिबात आस्था वाटेनाशी होते. अशा समाजमानसाची नस ओळखणारे शंकरराव हे द्रष्टे आणि कर्ते नेते होते.

कुटुंब नियोजनाचे महत्त्व पटवून देताना ते एकदा म्हणाले होते, "कुटुंब नियोजनाचा प्रश्नस जर आपण अतिशय गांभिर्याने हाताळला नाही तर दहा वर्षानंतर माणसे माणसांना खायला धावतील, अशी अवस्था या देशामध्ये येईल. हे जर समजून घ्यायच्या मनःस्थितीत नसाल तर माणसात आणि जनावरात काहीही फरकच राहिलेला नाही, असेच म्हणावे लागेल. किती बच्चे झाले हे जनावरांना कळत नाही आणि त्यांच्या संगोपनाची जबाबदारीही जन्मदात्यांवर नसते. पण माणसाने स्वतःच्या आणि स्वतःच्या मुलाबाळांचा

विचार करावा अशी अपेक्षा असते. ज्या गोष्टी आपल्या जीवनामध्ये उपलब्ध झाल्या नाहीत, त्या निदान येणाऱ्या पिढीला तरी आपल्याला उपलब्ध करून देता याव्यात, अशी प्रामाणिक इच्छा असेल तर आपले स्वतःचे कुटुंब मर्यादित ठेवण्याची निकड प्रत्येकाला सहज पटू शकेल.”

कुटुंब नियोजनाच्या बाबतीत काही लोक धर्माची ढाल पुढे करून तिच्याआड दडण्याचा लटका प्रयत्ना करत असतात. अशा लोकांना फटकारताना शंकररावजी म्हणाले होते, “गरिबी ही जाती-धर्माचा भेद ठेवते कुठे? मुसलमान, ख्रिश्चन, सिंधी हा प्रश्न यात येतच नाही. दारिद्र्य हे जातवार असते की काय? जो सूज्ञ व शहाणपणाने वागतो तो कोणीही माणूस कुराणाचा हा अर्थ काढूच शकणार नाही. कुराणामध्ये याच्या अगदी उलट आहे. दुसरी बायको करण्याकरितादेखील फार मोठे निर्बंध कुराणात घातलेले आहेत. धर्मग्रंथामध्ये असेही म्हटले आहे की, मुलांना आपण जन्म देण्यापूर्वी याचाही विचार केला पाहिजे की किती मुलांना आपण पोसू शकू. पोसण्याची ऐपत पाहून आपण वागले पाहिजे. मूल झाल्यानंतर कोणता पालक असे म्हणणार आहे, की माझ्या डोळ्यांदेखत मुलाने भीक मागितली पाहिजे. कुटुंबाची अमर्याद वाढ-मग ती कुठल्याही जाती-धर्मातील व्यक्तीची असो, म्हणजे गरिबीला स्वतःहून दिलेले निमंत्रणच असते. म्हणूनच मेहेरबानी करून धर्माचे नाव या कार्यामध्ये आडवे आणून आपल्या गरिबीला वाढवू नका. कारण कुटुंब नियोजनाच्या कार्यात अडथळा निर्माण

करण्याकरिता धर्माचे नाव घेणे यासारखा दुसरा कुठलाही अधर्म असेल असे मला वाटत नाही.”

## मानवाधिकारांचे रक्षण

केंद्रीय गृहमंत्री या नात्याने शंकरराव चव्हाण यांनी सप्टेंबर १९९२ मध्ये दिल्लीत देशातील सर्व राज्यातील मुख्यमंत्र्यांची बैठक बोलावली. या बैठकीचा एकच विषय होता आणि तो म्हणजे देशात मानव अधिकार सामिती स्थापन करणे. ठरल्याप्रमाणे सामाजिक मानसशास्त्राचा अभ्यास असलेल्या शंकररावांनी मानवाधिकार समिती स्थापन केली. या समितीच्या अध्यक्षपदी शंकरराव चव्हाण यांची निवड झाली. देशात कुठेही मानवी अधिकारांचे उल्लंघन होणार नाही आणि मूलभूत अधिकारांची पायमल्लीच होणार नाही, यासाठी सावध असलेल्या या समितीची अधिवेशने मुंबई, कोलकाता, दिल्ली , हैदराबाद या ठिकाणी संपन्न झाली. आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समितीचे अध्यक्ष आणि पदाधिकारी यांनी वेळोवेळी प्रत्येक राज्याचे मुख्य सचिव आणि त्या त्या राज्याचे पोलीस महासंचालक यांच्याशी संवाद साधत सजग राहून कार्य केले. त्यामुळे मानवी अधिकारांसदर्भात देशभर एक वैचारिक जागृती घडून आली आणि त्यामुळे पर्यायाने देशाची राष्ट्रीय एकात्मता व अखंडता कायम राखण्यास हातभार लागला.

मानवी अधिकार समितीचे अध्यक्ष या नात्याने केंद्रीय गृहमंत्री शंकरराव चव्हाण हे ज्या भागात बैठक असेल त्या भागातील पोलीस अधिकाऱ्यांना त्या बैठकीसाठी आवर्जून बोलावून घेत असत. शंकररावांनी अशा पोलीस

अधिकाऱ्यांना स्वच्छ शब्दात सूचना देऊन ठेवल्या होत्या, की जनतेच्या जीविताचे व मालमत्तेचे रक्षण करणे हे पोलीस अधिकाऱ्यांचे प्रमुख कर्तव्य आहे. गुन्हेगारांवर अंकुश ठेवण्यासाठी त्यांच्यावर वेळीच गुन्हे दाखल केले पाहिजेत, त्यांच्या विरोधात न्यायालयात सबळ पुरावे सादर केले पाहिजेत. कोणताही गुन्हेगार पोलिसांच्या कचाट्यातून आणि न्यायालयीन पळवाटांतून सुटताच कामा नये. यासाठी पोलीस अधिकाऱ्यांनी सदैव सजग राहिले पाहिजे. पूर्वग्रहदूषित ठेवून कोणाही व्यक्तीवर गुन्हा दाखल होता कामा नये. मानवी हक्क, विशेषतः स्त्रियांचे प्रश्न तसेच सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या वर्गातील व्यक्तींची पोटच्या लेकराप्रमाणे काळजी घेणे हे प्रत्येक पोलीस अधिकाऱ्याचे आद्य कर्तव्य आहे, हे शंकरराव चव्हाणांनी केंद्रीय गृहमंत्री या नात्याने सर्व पोलीस अधिकाऱ्यांना बजावले होते. अशा घटनांतून शंकरराव चव्हाणांची सामान्यातिसामान्य माणसाविषयीची बांधिलकीची भावना आणि कळकळ दिसून येते. सामान्य माणसांच्या सुख-दुःखाविषयी ते किती सजग होते, याचीच अशा प्रसंगांतून पावती मिळते.

## जे का रंजले गांजले . . . .

स्वातंत्र्यानंतरही दलित-आदिवासी जनतेच्या अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या मूलभूत गरजा पूर्ण होत नाहीत, ही या देशातील फार मोठी शोकांतिका आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित समाजाला अज्ञान आणि दारिद्र्याच्या कर्दमातून वर काढण्यासाठी आपले जीवन समर्पित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आचाराचा आणि विचारांचा उज्ज्वल वारसा सांगणाऱ्या गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांनी डॉ. आंबेडकरांच्या कार्याचे स्मरण म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आवास योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत बेघर दलितांना तीन हजारपेक्षा अधिक घरे बांधून देण्यात आली. दलित वस्त्यांमध्ये आरोग्य सुविधा आणि रास्त दराची धान्य विक्री केंद्रे सुरू करण्यात आली. या योजनेमुळे दारिद्र्यरेषेखालील अनुसूचित जातीच्या लोकांना आपले जीवनमान सुधारण्याची संधी मिळाली.

देशाच्या कानाकोपऱ्यातील रंजल्या गांजल्या लोकांवर प्रस्थापितवर्ग अन्याय-अत्याचार करणार नाही, यासाठी केंद्रीय गृहमंत्री म्हणून शंकरराव चव्हाण सदैव दक्ष असत. अशा गुंड-पुंड वर्गावर जरब बसविण्यासाठी शंकररावांनी वेळोवेळी कठोर पावले उचलली होती आणि दीनदलितांना अभय मिळवून दिले होते. अशीच एक घटना आहे, अलाहाबाद जिल्ह्यातील धनिया या गावची. गावातील लईखूप पटेल नावाच्या एका धनदांडग्याने व त्याच्या

साथीदारांनी गावातील मोतीलाल या दलिताच्या शिवपरिया नामक पत्नीची विवस्त्र करून गावातून धिंड काढली होती. या गुन्ह्यासाठी गुन्हेगारांना अटक तर झाली होती, परंतु पोलीस अधिकारी तपासामध्ये चालढकल करत होते. उलट शिवपरिया या स्त्रीच्या चारित्र्याविषयी संशय घेऊन गावातील लोक तिच्यावर आरोप करीत होते. दोन गटात वितुष्ट निर्माण झाले होते. अत्याचारित स्त्री उपेक्षित समाजातील असल्यामुळे तिला स्थानिक स्तरावर न्याय मिळण्याची शक्यता नव्हती. ही गोष्ट जेव्हा शंकरराव चव्हाणांना समजली तेव्हा त्यांनी या प्रकरणात विशेष लक्ष घातले. घटनेची सखोल माहिती मिळविली. प्राप्त माहितीच्या आधारे दोषी आरोपीला पोलीस अधिकारी पाठीशी घालत असल्याचे शंकररावांच्या लक्षात आले. त्यांनी लगेच दोषी अधिकाऱ्यांना बडतर्फ केले. निर्भय वातावरणात त्या ठिकाणी घटनेची चौकशी व्हावी यासाठी अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षकांची नियुक्ती करण्यात आली. मूळच्या पोलीस अधीक्षकांची तडकाफडकी बदली करण्यात आली. एवढे करून भागणार नव्हते. म्हणून शंकररावांनी केंद्र सरकारतर्फे त्या अन्यायग्रस्त स्त्रीला एक लाख दहा हजार रुपयांची शासकीय मदत जाहीर केली. त्या पीडित कुटुंबाला पूर्णतः संरक्षण दिले. यापुढे अशा प्रकारच्या असंस्कृतपणाच्या घटना घडू नयेत व दोन समूहांमध्ये जातीय दंगली उद्‌भवू नयेत यासाठी केंदीय गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांनी उत्तर प्रदेश सरकारला कडक शब्दात सूचना केल्या. तसेच देशातील सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनाही दीनदलितांवर

गावातील गुंड-पुंडांकडून अन्याय-अत्याचार होणार नाहीत, यासाठी दक्ष राहण्याचे आदेश देण्यात आले. गरिबातल्या गरीब माणसांविषयी शंकररावांनी इतकी संवेदनशीलता बाळगली होती. म्हणून त्यांच्या सत्तेला समाजाभिमुखतेचे लेणे चढले होते.

## मऊ मेणाहुनि. . . .

दिवाळीचे दिवस होते. गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांनी मौनव्रत धारण केले होते. ते कमालीचे अंतर्मुख झाले होते. त्याला कारणही तसेच होते. हजरतबाल दर्ग्यात अतिरेक्यांनी घुसखोरी केली होती. दिवाळीचे दिवस असून शंकररावजींच्या चेहऱ्यावर अस्वस्थतता होती. घरात कुसुमताईंनी दिवाळी म्हणून बासुंदीचा स्वयंपाक केला होता, परंतु ना. चव्हाणांनी दिवाळीत गोड पदार्थाला स्पर्शसुद्धा केला नाही. एक दिवस मनाचा हिय्या करून सौ. कुसुमताईंनी शंकररावजींना विचारले, "आज चार दिवस झाले. आपण एकदम गप्पगप्प आहात. दिवाळीत आपण एक घासदेखील गोड खाल्ले नाही. असे काय घडले ?"

शंकररावांनी क्षणभर सौ. कुसुमताईंकडे पाहिले आणि नंतर खिडकीतून बाहेर शून्यात दृष्टी लावून पाहत ते बोलले. "हजरतबाल दर्गा प्रकरणामुळे माझी तहानभूक पार उडून गेलीय. मन बेचैन होते. अतिरेकी दर्ग्यात दडलेत. दर्ग्याबाहेर आमचे जवान रात्रंदिवस कडाक्याच्या थंडीत डोळ्यात तेल घालून पहारा देत आहेत. जिवावर उदार होऊन अतिरेक्यांशी झुंज देत आहेत. सदैव त्यांचाच विचार डोक्यात घोळतो. अशा परिस्थितीत रोजची भाकरी घशाखाली उतरत नाही तर दिवाळीचे गोड पदार्थ कसे खावेसे वाटतील?"

जगाला कठोर नि कणखर वाटणाऱ्या शंकररावांची सवेदनशीलता सौ. कुसुमताईंनी जवळून अनुभवली. देशाच्या सार्वभौमत्त्वाच्या संरक्षणासाठी वीर जवानांच्या चिंतेने व्याकूळ होणारा असा गृहमंत्री विरळा! 'मऊ मेणाहुनि आम्ही विष्णुदास । कठीण वज्रास भेदू ऐसे।' ही शंकररावांची वृत्ती होती.

## दहशतवादाला आळा घातला

भारत सरकारने दि. ३ सप्टेंबर १९८७ रोजी देशद्रोह्यांच्या अतिरेक कारवायांना आळा घालण्यासाठी आणि देशात शांतता व सुव्यवस्था राखता यावी यासाठी एक कायदा पारित केला होता. परंतु या कायद्याच्या परिणामकारकतेबाबत शंकरराव चव्हाण समाधानी नव्हते. शिवाय या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे अतिरेक्यांचा प्रश्नर सुटण्याऐवजी त्यात गुतागुंत वाढली होती. केंद्रीय गृहमंत्री या नात्याने शंकरराव चव्हाण यांनी या कायद्याचा आणि त्यातील मर्यादांचा कसून अभ्यास केला. या कायद्याची परिणामकारकता वाढविण्यासाठी, देशाद्रोह्यांवर वचक निर्माण व्हावा यासाठी शंकररावांनी या कायद्यात दुरूस्ती करणारे विधेयक संसदेत मांडले. याच कायद्याच्या आधारावर पुढे भारत आणि संयुक्त राष्ट्रे यांच्यात अतिरेकी आणि गुन्हेगार यांचे हस्तांतरण करण्याचा करार झाला. या कराराची कालमर्यादा पुढे २३ मे १९९५ पर्यंत वाढविण्यात आली. या कायदा दुरुस्तीमुळे दहशतवाद्यांच्या अतिरेकी कारवायांवर अंकुश बसला. अतिरेक्यांचे समूळ उच्चाटन जरी होऊ शकले नाही तरी या प्रवृत्तीवर फार मोठी दहशत निर्माण झाली. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील देशद्रोही व अतिरेकी संघटनांना पायबंद घालण्यासाठी शंकरराव चव्हाण यांनी जी खंबीर पावले उचलली त्यामुळे देशात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित होऊ शकली.

ना. शंकरराव चव्हाण यांनी ज्यावेळी देशाच्या गृहमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारली त्यावेळी देशासमोर अनेक अंतर्गत तसेच बाह्य समस्या उभ्या होत्या. अतिरेक्यांच्या दहशतवादी कारवायांनी देशाची अंतर्गत सुरक्षाव्यवस्था अक्षरशः पोखरून निघाली होती. दहशतवाद ही केवळ एकट्या भारताचीच नव्हे तर आंतरराष्ट्रीय समस्या होऊन बसली होती. काही अतिरेकी व दहशतवादी संघटना परदेशात राहून भारतात घातपाती कारवाया करत होत्या. पंजाबात घातपात घडवून आणणाऱ्या देशद्रोही संघटनांची पाळेमुळे थेट इंग्लंडपर्यंत पोचली होती. ही पाळेमुळे खणून काढल्याशिवाय देशात शांतता प्रस्थापित होणे आणि देशाचा विकास होणे शक्य नव्हते. अशा कसोटीच्या प्रसंगी गृहमंत्री ना. शंकरराव चव्हाण यांनी इंग्लंड, बल्गेरिया, रुमानिया, रशिया, फ्रान्स, जर्मनी इ. देशांशी दहशतवादविरोधी सहकार्याचा करार घडवून आणला. या करारामुळे अतिरेक्यांना मिळणारी आर्थिक मदत व शस्त्रपुरवठा थांबला. सहकार्य करारात बांधले गेल्यामुळे दहशतवाद्यांना इतर देशात आता लपायला आश्रय मिळेनासा झाला. देशात शांतता व सुरक्षितता प्रस्थापित झाली. यातून शंकररावांची दूरदृष्टी दिसून येते.

देशद्रोह्यांच्या कारवायांना प्रतिबंध करणाऱ्या कायद्यात दुरूस्ती केल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांनी देशातील पोलीस महासंचालक आणि इन्सपेक्टर जनरल ऑफ पोलीस यांची एक महत्त्वपूर्ण बैठक बोलावली. या बैठकीत शंकररावांनी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी

पोलीसांनी सदैव सजग रहावे असे सांगितले. ते पुढे म्हणाले की, समाजाच्या तळागाळातील माणसाच्या जीविताचे व मालमत्तेचे रक्षण करणे तसेच देशाची एकात्मता व अखंडता कायम राखणे हे प्रत्येक भारतीय पोलिसाचे परमकर्तव्य आहे. आपल्या आयुष्यातील प्रत्येक दिवस हा लढाईचा दिवस आहे असे समजा. हे करत असताना आपल्यावर ताण-तणाव आणि दबाव निर्माण होईल याची मला जाणीव आहे. परंतु त्याला बळी न पडता समर्पित भावनेने देशाची सेवा करावी. देशाचे भवितव्य अखेर आपल्यासारख्या रक्षणकर्त्यांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून आहे.

## मुंबई बॉम्बस्फोटप्रकरणी तत्परता

शंकरराव चव्हाण भारताचे गृहमंत्री असताना दहशतवाद्यांनी महाराष्ट्राची राजधानी मुंबईत दि.१२ मार्च १९९३ रोजी बॉम्बस्फोटांची मालिकाच घडवून आणली. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असली तरी ती या देशाची आर्थिक राजधानी मानली जाते. या देशाच्या आर्थिक हृदयावर बॉम्बस्फोट करून देशाची अर्थव्यवस्थाच विस्कळीत करून टाकावी, असा दहशतवाद्यांचा कुटील डाव होता.

मुंबईतील शेअर बाजार, काकीया बाजार, मज्ञीत बंदर, एअर इंडियाची इमारत, नरिमन पॉईंट, झवेरी बाजार, सेंटॉर हॉटेल, सांताक्रूज, जुहू, सेंच्युरी बाजार, वरळी पेट्रोलपंप आणि प्लाझा सिनेमा कंपाऊंड इत्यादी गजबजलेल्या अकरा ठिकाणी एकापाठोपाठ एक बॉम्बस्फोट झाल्यामुळे सबंध देश हादरला. मुंबईसह देशात भीतीचे वातावरण निर्माण करावे, आर्थिक राजधानीची नीट बसलेली घडी विस्कळीत करून टाकावी आणि त्या माध्यमातून देशात अराजक निर्माण करावे असा अतिरेक्यांचा कुटील डाव होता. ही घटना घडल्याबरोबर केंदीय गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांनी मुंबईला तात्काळ भेट दिली. परिस्थितीची पाहणी करून मुंबईची परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी महाराष्ट्र सरकारला आवश्यक त्या सूचना दिल्या व केंद्रीय गृहमंत्री या नात्याने संपूर्ण सहकार्य दिले.

## धर्म आणि राजकारणाची गल्लत नको

अलीकडच्या काळात धर्म आणि राजकारण यांची सरमिसळ केली जाते. काही संधिसाधू लोक आणि जातीयवादी राजकीय पक्ष धर्माचा आधार घेऊन, लोकांच्या धार्मिक भावना भडकवून राजकीय सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्नध करतात. या वृत्तीला शंकरराव चव्हाणांचा नेहमीच तीव्र विरोध होता. शंकरराव चव्हाण हे स्वतः धार्मिक आणि अध्यात्मिक वृत्तीचे असले तरी त्यांनी कधीही धर्म आणि राजकारण यांची गल्लत होऊ दिली नाही. किंबहुना धर्मसत्ता आणि राजसत्ता ह्या स्वतंत्र बाबी आहेत. त्यांचे परस्परांच्या अधिकार क्षेत्रात अतिक्रमण होता कामा नये, असे शंकररावांचे आग्रही प्रतिपादन होते. म्हणूनच ते निधर्मी देशाचे गृहमंत्री म्हणून यशस्वी होऊ शकले.

६ डिसेंबर, १९९२ रोजी काही धर्मांध लोकांनी अयोध्येतील बाबरी मज्जिदीचा ढाचा उद्ध्वस्त केला. त्यावेळी शंकरराव चव्हाण हे भारताचे गृहमंत्री होते. हा दुर्दैवी प्रकार टाळता आला नाही, याबद्दल काही विरोधक त्या अपयशाचे खापर गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या माथ्यावर फोडतात. परंतु त्यात फारसे तथ्य नाही, हे इतिहासाचे परिशीलन केले असता आपल्या लक्षात येते. दि. ६ डिसेंबर रोजी शंकरराव चव्हाण यांनी दूरचित्रवाणीवरून राष्ट्राला उद्देशून भाषण केले होते. त्यात ते म्हणाले होते, “काही समाजविघातक लोकांनी आयोध्येतील बाबरी मज्जिदीचा ढाचा अत्यंत वाईट

हेतूने पाडला. त्यामुळे देशभर दहशत निर्माण झाली असून सर्वच स्तरातून संताप व्यक्त होत आहे. वास्तविक त्या जागेच्या रक्षणाची जबाबदारी राज्य सरकारची होती. राज्य सरकारने न्यायालयात तशा आशयाचे शपथपत्रही सादर केले होते. परंतु त्यांनी मश्जिदीचे संरक्षण न करून जनतेचा, न्यायालयाचा आणि केंद्र सरकारचाही विश्वासघात केला आहे. एवढेच नसून राष्ट्रीय एकात्मता परिषदेच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केले आहे."

वास्तविक शंकरराव चव्हाण यांनी गृहमंत्री या नात्याने अयोध्येतील धार्मिक ढाचा सुरक्षित राखण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले होते. हिंदू आणि इस्लाम धर्मातील नेत्यांमध्ये सहमती घडवून आणून सुसंवाद साधण्याचा प्रयत्न केला होता. धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचे संरक्षण करण्यासाठी प्रयत्नांठची पराकाष्टा करण्यात आली होती. धार्मिक वास्तूंना धक्का पोचवून समाजात विसंवाद निर्माण करणाऱ्या धर्मांध घटकांवर आणि जातीयवादी संघटनांवर बंदी घालण्याचे सुतोवाच त्यांनी केले होते. ज्यांनी या दुष्कृत्यात भाग घेतला त्या लोकांवर खटले भरले होते. एवढे करूनसुद्धा काही लोक या घटनेबद्दल पूर्वग्रहदूषित दृष्टीने शंकरराव चव्हाण यांना दोषी ठरवतात. या दोषारोपात काडीइतकेही तथ्य नाही, हे वेळोवेळी सिद्ध झाले आहे.

## पंजाबची समस्या सोडविली

गृहमंत्री या नात्याने शंकरराव चव्हाण यांनी काश्मीरप्रमाणेच पंजाबची समस्यासुद्धा अतिशय कौशल्याने हाताळली. त्यांच्या कुशल नेतृत्वामुळे केंद्र सरकारला पंजाबातील दहशतवाद निपटून काढणे शक्य झाले. पंजाबात विधानसभेच्या निवडणुका शांततापूर्ण पार पाडता आल्या. ही मोहीम पार पाडण्यासाठी शंकररावांनी आसाम रायफलदलाचा कौशल्याने उपयोग करून घेतला. जर शंकररावांनी आसाम रायफलदलाचा उपयोग काश्मीर व पंजाब समस्या हाताळण्यासाठी केला नसता तर या दोन्ही राज्यातील जनजीवन हाताबाहेर गेले असते. त्याशिवाय या दोन्ही राज्यात निवडणुका घेऊन येथे लोकशाही बहाल करणे केंद्र सरकारला कदापिही शक्य झाले नसते. कदाचित जनतेचा राज्यघटनेवरचा आणि लोकशाही शासनप्रणालीवरचा विश्वासही उडाला असता. ते देशाच्या एकात्मतेच्या आणि अखंडतेच्या दृष्टीने अधिक घातक ठरले असते.

भारतीय संघराज्याला प्रादेशिकतावादाचा शाप आहे. भारतात विविधतेत एकता आहे, असे आपण कितीही म्हणत असलो, आणि ते बऱ्याच अंशी खरे असले तरी देशाच्या कानाकोपऱ्यात अधूनमधून प्रादेशिकतावादाच्या बुरख्याआडून फुटिरतावादी प्रवृत्ती उग्र व हिंसक चळवळी करून देशाच्या एकसंघतेवर व अखंडतेवर घाला

घालण्याचा प्रयत्नी करत असतात. अशा प्रवृत्तींना वेळीच पायबंद घातला नाही तर, देशाची एकात्मताच धोक्यात येऊ शकते. अशाच फुटीरतावादी प्रवृत्तीने आसाममध्ये उचल खाल्ली होती. आसाममधील बंडखोरांना वेगळी चूल मांडण्याचे डोहाळे लागले होते. गृहमंत्री या नात्याने ना. शंकरराव चव्हाण यांनी आसाममधील सर्व पक्ष, संघटना व नेत्यांची शिलाँग येथे बैठक बोलावली. संबंधितांशी व्यापक चर्चा घडवून आणून जनमत जाणून घेतले. आसामच्या विकासाचा सर्वांना विश्वास दिला. विशिष्ट कालावधीमध्ये बांगला देशातून आलेल्या विस्थापितांना भारताचे नागरिकत्व देण्याचा करार केला. घटनात्मक मार्गाने आसामात निवडणुका घेतल्या. लोकनियुक्त सरकार सत्तारूढ झाले. विघटनवादी व फुटिरतावादी प्रवृत्तींना कायमचा आळा बसला. अशा प्रकारे आसामला मुख्य राष्ट्रीयप्रवाहात सामील करण्याचे श्रेय ना. शंकरराव चव्हाण यांच्याकडे जाते.

पंजाब, काश्मीर, आसाम, त्रिपुरा, तामिळनाडू येथील स्फोटक परिस्थिती हाताळणे हे शंकरराव चव्हाणांच्या गृहमंत्री पदाच्या कारकीर्दीतील एक फार मोठे आव्हान होते. स्वच्छ राष्ट्रीय दृष्टिकोन असणाऱ्या शंकरराव चव्हाणांनी हे आव्हान लीलया स्वीकारले आणि तितक्याच ताकदीने त्यांनी ते शिवधनुष्य पेललेसुद्धा. ज्या काळात अतिरेकी आणि दहशतवादी देशाच्या वेगवेगळ्या भागात शस्त्र हाती घेऊन देशाचे तुकडे पाडण्यासाठी टपले होते, त्या काळात शंकरराव चव्हाणांनी देशाचे गृहमंत्री हे पद स्वीकारणे आणि सांभाळणे ही एक प्रकारे तारेवरची कसरतच होती. जनतेचा

दहशतवाद्यांना पाठिंबा मिळता कामा नये, जनमानसातून विघटनवादी कृत्यांना प्रतिष्ठा मिळता कामा नये, अशा पद्धतीने शंकररावांनी गृहमंत्रिपदाची सूत्रे सांभाळली. स्वातंत्र्यानंतर तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लअभभाई पटेल यांनी कणखरपणे संस्थाने खालसा करून ती अखंड भारतीय प्रजासत्ताकात सामील केली. म्हणून या देशाने 'लोहपुरुष' या सार्थ नामाभिधानाने त्यांचा यथोचित गौरव केला. त्याच कणखर वृत्तीने शंकररावांनी विघटनवादी आणि राष्ट्रद्रोही शक्तींचा बीमोड केला. संकुचितवृत्तीच्या फुटिरतावाद्यांना राष्ट्राच्या प्रमुख प्रवाहात सामील करून घेतले. देशाची अखंडता, एकात्मता आणि सार्वभौमत्व अबाधित राखले. देशाची लोकशाही सुदृढ आणि बळकट केली. त्यामुळे शंकररावांचे चरित्र अभ्यासक शंकररावांच्या या भूमिकेची आणि कार्याची तुलना सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याशी करतात. ती अगदी यथार्थ आहे. या अर्थाने शंकररावजीसुद्धा कणखर बाण्याचे 'लोहपुरुष' ठरतात.

## दुसऱ्यांदा मुख्यमंत्री

शंकरराव चव्हाण यांना पहिल्यांदा दि. २१ फेब्रुवारी १९७५ ते २७ फेब्रुवारी १९७७ या काळात आणि दुसऱ्यांदा दि. १२ मार्च १९८६ ते २६ जून १९८८ या काळात असा दोनवेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होण्याचा बहुमान प्राप्त झाला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होण्यापूर्वी शंकरराव चव्हाण यांच्या गाठीशी विविध खात्यांची मंत्रिपदे सांभाळण्याचा प्रदीर्घ अनुभव होता. त्यांनी महसूल खात्याचे उपमंत्री, पाटबंधारेमंत्री, दळणवळणमंत्री आणि कृषिमंत्री म्हणून या खात्यांचा कारभार अधिक लोकाभिमुख केला होता. त्यामुळे जनसामान्यांत एक कुशल प्रशासक म्हणून त्यांचा लौकिक वाढला होता. त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीमुळे पक्षश्रेष्ठींच्या नजरेत शंकरराव चव्हाण यांची उंची वादातील वाढली होती. आपल्या कार्यपद्धतीने ते 'लोकनेते' बनले होते.

दि. २० फेब्रुवारी १९७५ रोजी मुंबई येथे महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेसपक्षाची बैठक झाली. मुख्यमंत्री श्री वसंतराव नाईक यांनी स्वतःच सभागृहाच्या नेतेपदासाठी शंकरराव चव्हाण यांचे नाव सुचविले. सभागृहाचे उपनेते वसंतदादा पाटील यांनी शंकररावांच्या नावाला अनुमोदन दिले. अशाप्रकारे काँग्रेस पक्षाच्या ध्येयधोरणानुसार शंकरराव चव्हाण यांची नेतेपदी एकमताने निवड झाली. दि. २१ फेब्रुवारी १९७५ रोजी शंकरराव चव्हाण यांनी

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. शपथविधी समारंभानंतर शंकरराव चव्हाण यांनी राज्यातील जनतेला उद्देशून जे भाषण केले त्यातून मुख्यमंत्री म्हणून त्यांच्या कार्याची दिशा सूचित होते.

मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण म्हणाले, “महाराष्ट्राची शासनयंत्रणा अधिक कार्यक्षम आणि शिस्तबद्ध व नेटकी करण्याच्या दृष्टीने मी अग्रक्रमाने प्रयत्न् करीन. शासकीय अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी दप्तरदिरंगाईला थारा न देता कार्य करावे म्हणजे जनतेचा वेळ वाया जाणार नाही. दप्तरदिरंगाई आणि अकार्यक्षमता या दुर्गुणांमुळे भ्रष्टाचारी लोकांची पोळी पिकते. या दृष्टीने शासनयंत्रणा अधिक कार्यक्षम आणि जनसेवेत तत्पर असावी यासाठी मी विशेष लक्ष देणार आहे. भ्रष्टाचाराच्या बाबतीत वाजवी पुराव्यानिशी दाखल केलेल्या प्रत्येक तक्रारींची यथायोग्य दखल घेतली जाईल. राज्यासमोर असलेल्या समस्या सोडविण्यासाठी विरोधी पक्षांना विश्वासात घेऊन विकासाचा कार्यक्रम राबविण्याची मी ग्वाही देतो. मुख्यमंत्री म्हणून नव्हे तर राज्याचा एक जनसेवक म्हणून या राज्याच्या विकासात मी कुठेही कमी पडणार नाही, याची आपण खात्री बाळगावी.”

आपल्या पहिल्याच भाषणातून शंकररावांनी कर्तव्यकठोर भूमिका घेऊन भ्रष्टाचाराच्या विरोधात रणशिंग फुंकल्यामुळे ज्यांचे हात या यंत्रणेत बरबटले होते त्यांचे धाबे दणाणले.

केंद्र सरकार, केंद्रीय नियोजन आयोग, रिझर्व बँक यांच्याशी सतत संपर्क ठेवून जीवनावश्यक वस्तूंच्या

किंमतीच्या बाबतीत सौदेबाजी करणाऱ्या दलालांपासून सामान्य जनतेला संरक्षण देण्याची भूमिका शंकरावांनी सुरुवातीपासूनच घेतली होती. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री होण्यापूर्वी शेतकऱ्यांना कापूस एकाधिकार योजनेत खरेदी केलेल्या रकमेपैकी फक्त ३० टक्के रक्कम आधी दिली जात असे. मुख्यमंत्री शंकरराव यांना शेतकऱ्यांच्या व्यथा-वेदनांची तीव्रतम आच असल्यामुळे त्यांनी ही रक्कसम ५० टक्क्यांपर्यंत वाढविली. सहकारी संस्थेच्या थकबाकीशिवाय अन्य कोणत्याही कर्जाची वसुली या रकमेतून करू नये अशा सक्त सूचना शंकररावांनी सर्व यंत्रणेला आधीच देऊन ठेवल्या होत्या. कापूस एकाधिकार योजना सुरू होण्यापूर्वी व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक होत असे. शेतकऱ्यांचे हे रक्तशोषण थांबविण्यासाठी शंकररावांनी कापूस एकाधिकार योजनेला केंद्रीय अर्थसाहाय्य मिळवून दिले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री या नात्याने शंकररावांनी अल्पभूधारक आणि अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविल्या. तशा योजना त्यांच्या आधीही नव्हत्या आणि त्यांच्या नंतरही तग धरून राहू शकल्या नाहीत, असे खेदाने म्हणावे लागते.

महाराष्ट्रात ग्रामीण भागात ४ लक्ष २९ हजार भूमिहीन मजूर आहेत. हे दयनीय चित्र शंकररावांच्या नजरेतून सुटू शकले नाही. अशा भूमिहीन कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी शंकररावांनी लक्ष केंद्रित केले. अशा सुमारे एक लाख लोकांना त्यांनी शासकीय जमिनी उपलब्ध करून दिल्या. भूमिहीनांना गायरान जमिनीचे पट्टे त्यांच्या नावाने

करून दिले. त्यामुळे भूमिहीन माणूस शेतजमिनीचा मालक झाला. बेघरांना घरे बांधून देण्याची कल्याणकारी योजना शंकरराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री या नात्याने या महाराष्ट्रात राबविली. ज्यांना पायाखाली हक्काची जमीन नव्हती, ज्यांच्या डोक्यावर केवळ आभाळाचेच छत्र होते अशा हजारो व बेघर लोकांच्या डोक्यावर हक्काचे छत्र शंकररावांनी निर्माण करून दिले. अशा हजारो लोकांच्या कळवळ्याचे व लोककल्याणाचे तेज शंकररावांच्या मुख्यमंत्रीपदाला लाभले होते.

## उर्दू भाषेची पाठराखण

महाराष्ट्रामध्ये उर्दू भाषिकांची संख्या बरीच मोठी आहे. ही गोष्ट लक्षात घेऊन शंकरराव चव्हाणांनी राज्यात उर्दू माध्यमाच्या शाळा सुरू केल्या. शंकररावांचे उर्दू भाषेवर मराठी इतकेच प्रभूत्व होते. एक महत्त्वाची भारतीय भाषा म्हणून ते नेहमी उर्दूचे महत्त्व अधोरेखित करीत असत कारण सांस्कृतिकदृष्ट्या उर्दू भाषेचे योगदान ते जाणून होते. उर्दू भाषेत सकस व दर्जेदार साहित्यनिर्मिती व्हावी आणि या साहित्याला राजाश्रय मिळावा या हेतूने ना. चव्हाण यांनी उर्दू अकादमीची स्थापना केली. त्यामुळे उर्दूच्या साहित्यनिर्मितीला बहर तर आलाच शिवाय राष्ट्रीय एकात्मता बळकट होण्यास मदत झाली.

## लोकसंख्या नियंत्रणाला पर्याय नाही

लोकसंख्या विस्फोट ही महाराष्ट्रासमोरचीच नव्हे तर सबंध देशासमोरची एक भीषण समस्या आहे. या समस्येचा सामना करण्यासाठी मुख्यमंत्री या नात्याने शंकरराव चव्हाण यांनी कठोर भूमिका घेतली. त्यांनी छोट्या कुटुंबाचे महत्त्व जनसामान्यांपर्यंत पोचविण्यासाठी शासनस्तरावर प्रचार व प्रसिद्धी माध्यमांतून आग्रही प्रयत्न केलेच. शिवाय सक्तीचे कुटुंब नियोजन करण्यासाठी त्यांनी खंबीर पावले उचलली. शंकररावजींच्या नेतृत्वाखाली आरोग्यमंत्री श्री. क.म. पाटील यांनी दि. ३० मार्च १९७६ रोजी कुटुंब नियोजन सक्तीचे करण्याची तरतूद असलेले विधेयक राज्य विधिमंडळाच्या सभागृहात सादर केले. कुटुंब नियोजनाची सक्तीने अंमलबजावणी करणारे शंकरराव चव्हाणांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र हे या देशातील पहिले राज्य समजले जाते. तत्कालीन राज्यपाल अलीयावर जंग यांनीसुद्धा शंकररावांच्या भूमिकेचे स्वागत केले होते. कुटुंब नियोजनाच्या अंमलबजावणीत धर्माचा प्रश्न आड येऊ दिला जाणार नाही, अशी निःसंदिग्ध ग्वाही माननीय राज्यपालांनी दिली होती. या प्रश्नी शंकररावांना अनेकांचा रोष पत्करावा लागला, परंतु राष्ट्रीय समस्येची जाण असलेल्या शंकररावांनी त्यातून अजिबात माघार घेतली नाही. ही त्यांची कर्तव्यकठोर भूमिका सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कणखर कार्याची आठवण करून देते. शंकररावजींच्या

मार्गदर्शनाखाली १९७५ ते १९७७ या कालखंडात महाराष्ट्राने लोकसंख्या नियंत्रणाच्या क्षेत्रात केलेल्या भरीव कामगिरीबद्दल राज्याला केंद्र सरकारकडून राष्ट्रीय स्तरावरची अकरा पारितोषिके मिळाली. अशा राष्ट्रीय कार्यक्रमातून शंकररावांच्या नेतृत्वाखाली पुरोगामी महाराष्ट्राने अन्य राज्यांसमोर एक आगळा-वेगळा असा कृतिशील आदर्श निर्माण करून दिला.

## झोपडपट्टीवासियांना घरे दिली

महाराष्ट्राची राजधानी मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखली जाते. औद्योगिकीकरणाचे दुष्परिणाम म्हणून अशा औद्योगिकदृष्ट्या प्रगत शहरांमध्ये काही नागरी समस्या डोके वर काढत असतात. झोपडपट्टी आणि त्या अनुषंगाने येणारे अन्य गैरव्यवहार हे अपरिहार्य म्हणून स्वीकारावेच लागतात. मुंबईच्या झोपडपट्ट्यांमध्ये लाखो लोक हलाखीचे जीवन जगत होते. ही स्थिती राज्यप्रमुख या नात्याने शंकरराव चव्हाण यांना पाहवत नव्हती. या समस्येवर मात करण्यासाठी जनतेच्या राहणीमानात सुधारणा व्हावी, म्हणून शंकररावांनी झोपडपट्टीवासियांना टुमदार घरे बांधून दिली. अशा उपेक्षित वस्त्यांमध्ये महापालिकेच्या माध्यमातून वीज, पाणी, सार्वजनिक शौचालये इ. मूलभूत सोयीसुविधा पुरविण्यात आल्या. अशा घरकुल धारकांना केवळ वीस रुपये इतके मासिक भाडे आकारावे असे ठरले. अशा भाड्यापोटी जमा झालेला निधी अन्य झोपडपट्टी क्षेत्राचा विकास करण्यासाठीच वापरण्यात आला.

झोपडपट्टीतील नागरिकांची दुःखे यापूर्वीच्या राज्यकर्त्यांना दिसत नव्हती असे नव्हे. त्यांना कळत होते पण वळत नव्हते, ही खरी शोकांतिका होती. परंतु शंकरराव चव्हाणांनी मात्र ही समस्या सोडविण्यासाठी धाडसाने पावले उचलली. जागतिक बँकेचे अध्यक्ष मॅक्नमारा हे मुंबईत आले

असता त्यांनी झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनासाठी शंकररावांनी केलेल्या कार्याचा मुक्तरकंठाने गौरव केला.

राज्य सरकारची महामंडळे आणि शासकीय समित्या ह्या सत्ताधारी पक्षाच्या सत्तेबाहेरील कार्यकर्त्यांना सत्तेत सामावून घेण्याचे राजमार्ग असतात. १९७६ पर्यंत महाराष्ट्रात एकूण ४४ महामंडळे अस्तित्वात आली होती. या महामंडळांच्या स्थापनेमागचा हेतू जरी शुद्ध असला तरी त्यांच्या कार्यात एकसूत्रीपणाचा आणि समन्वयाचा अभाव होता. ही अडचण दूर करण्यासाठी शंकरराव चव्हाण यांनी या महामंडळांची संख्या ४४ वरून २७ करण्याचा धाडसी निर्णय घेतला. महामंडळांची संख्या अकारण फुगत गेल्यामुळे जनतेच्या पैशाचा अपव्यय होत होता आणि पर्यायाने शासकीय तिजोरीवर निष्कारण ताण पडत होता. शंकररावांच्या प्रयत्नाणने महामंडळांची संख्या कमी करून त्यांच्यात समन्वय साधल्यामुळे आणि त्यांच्या प्रशासनात कार्यक्षमता निर्माण केल्यामुळे उत्पादनवाढीस मदत झाली. अशा निर्णयामुळे काही हितसंबंधीयांचे हितसंबंध दुखावले गेले असले तरी शंकररावांच्या काटकसरीच्या धोरणाचे सार्वत्रिक स्वागतच झाले.

असाच एक उपेक्षित घटक म्हणजे आदिवासी समाज. या गिरिजन समाजासाठी शासनाने वेळोवेळी विविध योजना जाहीर केल्या असल्या तरी त्याचा त्यांना फारसा लाभ होत नसे. आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेत काही आदिवासींच्या जमिनी सावकारांनी आणि परिसरातील धनदांडग्यांनी गिळंकृत केल्या होत्या. आदिवासींचे एकमात्र

उपजिविकेचे साधन असलेली शेती हिरावून घेतली गेलेली होती. शंकररावजींनी मुख्यमंत्री असताना या प्रश्नावर आपले लक्ष केंद्रित केले. आदिवासींच्या जमिनी आदिवासींना परत मिळाव्यात यासाठी एक कायदा संमत केला. या कायद्याच्या बडग्यामुळे सबंध महाराष्ट्रात जवळजवळ ७१६९ हेक्टर जमीन आदिवासींना परत मिळाली. आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीत शंकररावांनी ग्रामीण भागातून चाललेल्या सावकारशाहीच्या अवैध धंद्यांना आळा घातला.

# आदिवासींचा विकास

एकीकडे महाराष्ट्राचे मोठ्या प्रमाणावर नागरीकरण व आधुनिकीकरण होत असताना अनेक वननिवासी जमाती मात्र अजूनही उपेक्षित आहेत. त्यांच्या कल्याणासाठी शासनस्तरावर व्हावे तेवढे प्रयत्नी होत नाहीत. आदिवासींच्या विकासासाठी जेवढा निधी राखून ठेवला जातो तेवढा त्यांच्यापर्यंत  पोचत नाही, ही वस्तुस्थितीसुद्धा कुणाला नाकारता येणार नाही. पूर्वी आदिवासींच्या कल्याणावर एकूण शासकीय निधीपैकी केवळ दीड टक्का एवढाच निधी खर्च होत असे. शंकरराव चव्हाण यांनी आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीत हा निधी साडेचार टक्क्यावर नेला. आदिवासी जगताचे जीवन सुधारण्यासाठी डोंगराळ भागात दवाखाने सुरू केले. डोंगरी भागातील मुला-मुलींना शिक्षणाच्या सोयी उपलब्ध व्हाव्यात म्हणून प्राथमिक शाळा सुरू केल्या. अशा विद्यार्थ्यांच्या राहण्या-जेवण्याच्या अडचणी लक्षात घेऊन निवासी आश्रमशाळा सुरू केल्या. शिक्षणाच्या माध्यमातून प्राप्त झोलेली साक्षरता टिकविण्यासाठी वाचनालये सुरू केली. अशा मूलभूत सोयीसुविधांमुळे आदिवासी समाजात एक प्रकारचा आत्मविश्वावस रुजला आणि जनजीवनात अभूतपूर्व असे नवचैतन्य आले. आदिवासींचे, हरिजनांचे, गिरिजनांचे जीवन शंकरावांनी जवळून पाहिले होते. त्यांच्या जीवनमानात सुधारणा करावयाची असेल तर केवळ सचिव

आणि अधिकाऱ्यांनी ठरविलेल्या शासकीय धोरणांवर विसंबून राहता येणार नाही, याची खुणगाठ शंकररावांनी बांधली होती. शंकररावांनी स्वयंप्रेरणेने आदिवासींच्या विकासासाठी विविध योजना कार्यान्वित केल्यामुळे केवळ राजकारणी म्हणून नव्हे तर एक कार्यक्षम, कुशल व प्रजाहितदक्ष राज्यकर्ता प्रशासक अशी शंकररावांची महाराष्ट्राला ओळख झाली.

## भिकाऱ्यांचे पुनर्वसन

आपल्या देशात भिकाऱ्यांची संख्या इतकी प्रचंड आहे की, इतर प्रगत देशांमध्ये आपल्या देशाची ओळख 'भिकाऱ्यांचा देश' म्हणून झाली आहे. ही ओळख पुसून टाकण्यासाठी शासकीय आणि सामाजिक स्तरावर व्यापक प्रयत्न होणे गरजेचे आहे, ही जाणीव शंकररावांना फार पूर्वीपासून होती. मंदिरे, मज्जिदी आणि अन्य धर्मियांची प्रार्थनागृहे, धर्मशाळा हे भिकाऱ्यांचे अड्डे बनले होते. धडधाकट भिकारीसुद्धा केविलवाणे तोंड वेंगाडून एखाद्या प्रार्थनागृहाच्या दाराशी आपला कटोरा पुढे करतात, हा आपल्या समाजव्यवस्थेवरचा एक कलंक आहे. तो कलंक पुसून टाकण्यासाठी शंकररावांनी एक महत्त्वाकांक्षी योजना आखली. दि. २४ जानेवारी १९७६ रोजी इंदिरा गांधी यांच्या सत्तेला दहा वर्षे पूर्ण झाली होती. या घटनेचे औचित्य साधून मुख्यमंत्री शंकररावांनी मुंबईतील भिकारी हटविण्याची योजना अंमलात आणली. धडधाकट व कार्यक्षम भिकाऱ्यांना धरणांच्या कामांवर पाठवून दिले. भीक मागणाऱ्या लहान मुलांना सामाजिक संस्थांच्या स्वाधीन करून त्यांच्या शिक्षणाची सोय लावून दिली. अपंग, अशक्ति, वृद्ध, महारोगी इ. भिकाऱ्यांची भिकारी नियंत्रण कायद्याखाली मुंबईबाहेर स्थापन केलेल्या पुनर्वसन केंद्रांवर रवानगी केली. अशाप्रकारचा प्रयत्न पूर्वी झाला नव्हता आणि नंतरही कोणी केला नाही.

## राजकारणातील 'हेडमास्तर'

शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री असताना सकाळी पावणे दहाच्या सुमारास मंत्रालयात उपस्थित होत असत. त्यानंतर सचिवालयाचे प्रवेशद्वार बंद होत असे. त्यामुळे सचिवालयातील अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना वेळेवर उपस्थितीपटावर स्वाक्षरी करून कामाला लागावे लागत असे. उशिरा येणारा अधिकारी किंवा कर्मचारी आढळल्यास शंकररावजी त्याचा लेटमार्क नोंदवत असत आणि त्याच्याकडून खुलासा मागवत असत. शंकररावजी आपल्या समोरच्या फाईलींचा अभ्यास करत १० ते २ या वेळात कार्यालयीन कामात व्यस्त असत. खुद्द मुख्यमंत्रीच एखाद्या सनदी प्रशासकाप्रमाणे वेळेवर कार्यालयात उपस्थित होऊन कामात गढून जात असतील तर इतरांनासुद्धा काम हातावर घ्यावेच लागते. परिणामी अधिकारी व कर्मचारी फाईलीत डोके खुपसून स्वतःला कामाला जुंपून घेत असत. त्यामुळे दप्तरदिरंगाईला फाटा बसला. टेबलावर दाखल झालेल्या फाईली शक्य तितक्या लवकर निकाली निघाल्या पाहिजेत, कोणत्याही फाईलीवर अधिकाऱ्यांचे दोनपेक्षा अधिक शेरे असता कामा नयेत, सर्वसामान्य माणसाला बारीकसारीक कामांसाठी सचिवालयात निष्कारण खेटे घालण्याची गरज पडू नये, अशा सक्त सूचना शंकररावजींनी सचिवालयातील अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना देऊन ठेवल्या होत्या. त्यामुळे

त्या यंत्रणेला एक प्रकारची शिस्त लागली. लालफितीला सुट्टी मिळाली.

कार्यक्षम, गतिमान व शिस्तप्रिय राज्यकर्ता कसा असावा याचा उत्तम आदर्श शंकररावजींनी आपल्या कृतीतून घालून दिला. त्यांच्या या कार्यपद्धतीमुळे राजकीय व प्रशासकीय वर्तुळात त्यांना ‘हेडमास्तर’ संबोधले जात असे. काहींनी ‘हेडमास्तर’ हे दूषण मानले असले तरी शंकररावांनी जनतेच्या भल्यासाठी कामचुकारांना शिस्त लावणारे, जेष्ठ, करारी व आदर्श व्यक्तिमत्त्व या अर्थाने ‘हेडमास्तर’ ही उपाधी भूषणावहच मानली. कोणत्याही पदाधिकाऱ्याच्या हाताखालील अधिकारी व कर्मचारी हे त्या पदाधिकाऱ्याचे पाणी जोखत असतात आणि त्यानुसार आपली कार्यालयीन कार्यपद्धती ठरवत असतात. शंकररावजी हे कठोर प्रशासक असल्यामुळे त्यांनी नोकरशाहीला नियंत्रणात तर ठेवलेच शिवाय आपल्या शिस्तशीर कार्यपद्धतीने त्यांच्यावर एकप्रकारचा नैतिक धाक बसविला होता. प्रजेच्या विकासाच्या कोणत्याही कामात दिरंगाई झालेली त्यांना अजिबात खपत नसे. अशा कामचुकारांना वेळोवेळी शिक्षा करून त्यांनी सचिवालयातील नोकरशाहीवर अंकुश ठेवला होता. त्यामुळे सचिवालयातील फाईलींचा वेळेच्या आत निपटारा होत असे.

शिस्त आणि कर्तव्यकठोर धोरणे यांचा दीर्घकाळासाठी समाजाला फायदा होत असला तरी काही लोकांना त्याचा जाच वाटत असतो. शंकररावजींच्या शिस्तप्रिय स्वभावाचा आणि लोकाभिमुख तत्पर कार्यपद्धतीचा भोवतालच्या

लोकांना असाच जाच वाटत असल्यास नवल नाही. कारण शंकररावजींनी नेहमीच लोकानुनयापेक्षा आणि लोकरंजनापेक्षा लोककल्याणावर अधिक भर दिला. त्यांनी कधी कुणाचे लांगुलचालन केले नाही. उलट ‘जनतेच्या हिताच्या धोरणांच्या आड येणाऱ्यांची कदापिही गय केली जाणार नाही,’ असे ते गर्जत असत. स्वाभाविकच पक्षातील काही असंतुष्ट लोकांनी शंकररावजींना मुख्यमंत्री पदावरून पायउतार करण्याचा जणू चंगच बांधला. या मोहिमेत शंकररावजींचे सारे कट्टर राजकीय विरोधक एकत्र आले आणि त्यांनी शंकररावजींच्या विरोधात अक्षरशः आघाडी उघडली. काहींनी एकत्र येऊन शंकररावजींच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव दाखल केला. परंतु अनुशासनप्रिय प्रशासक असलेले शंकरराव चव्हाण सर्व राजकीय प्रतिस्पर्ध्यांना पुरून उरले. शंकरराव चव्हाणांचे स्वच्छ प्रशासन, त्यांनी केलेली जनकल्याणाची कामे, त्यांच्या पक्षावर आणि पक्षश्रेष्ठींवर असलेल्या अव्यभिचारी निष्ठा पाहून शंकरराव चव्हाणांवरील अविश्वास ठराव तर फेटाळून लावलाच, शिवाय त्यांच्या लोककल्याणकारी कार्याचा यथोचित गौरवही केला. शंकररावजींना मुख्यमंत्रिपदी कायम ठेवून पक्षश्रेष्ठींनी त्यांच्या सत्तेलाच नव्हे तर त्यांच्या ध्येयधोरणांना आणि उपक्रमशीलतेला जणू नैतिक पाठिंबाच दिला.

महाराष्ट्रातील पोलीस यंत्रणा ही अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या तुलनेत नेहमीच उपेक्षित राहिलेली आहे. वास्तविक रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून या यंत्रणेला

राज्यशकट सांभाळावा लागतो. परंतु त्यांच्या अडीअडचणींची व गैरसोयींची कुणी कधी फारशी दखल घेतलेली नव्हती. पोलीसांना घरांची योजना राबविण्यासाठी अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद केली जात नसे. परंतु शंकरराव चव्हाणांनी १९७६-७७ च्या वार्षिक अर्थसंकल्पात पोलीसांना घरे बांधून देण्यासाठी चार कोटी रुपयांची भरघोस तरतूद केली. पुढे दरवर्षी ही तरतूद वाढविण्यात आली. त्यातून सबंध महाराष्ट्रामध्ये जिल्ह्यांच्या व तालुक्यांच्या ठिकाणी व जिथे पोलीस स्टेशन आहे तिथे पोलिसांसाठी स्वतंत्र कॉलनी उभ्या असलेल्या आपणास दिसतात. शंकररांवानी केवळ पोलीसांच्या घरांचाच प्रश्न सोडविला असे नव्हे तर पोलिसांच्या पाल्यांसाठी कॉलनीच्या परिसरात प्राथमिक शाळा, आरोग्यविषयक सुविधा, क्रीडांगण, वाचनालय, बाग-बगीचा इ. प्राथमिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. तात्पर्य : पोलीसांच्या अडचणींकडे आस्थेवाईकपणे पाहणारे शंकररावजी हे पहिले मुख्यमंत्री होत.

## मराठवाडा ग्रामीण बँक

मराठवाडा ग्रामीण बँक ही मराठवाड्याच्या विकासाची अर्थवाहिनी मानली जाते. मराठवाड्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी आणि छोट्या उद्योजकांना उद्योगांसाठी अर्थसहाय्य मिळविण्यात येणाऱ्या अडचणी शंकररावजींनी जवळून पाहिल्या होत्या. पुरेशा अर्थपुरवठ्याशिवाय मागास मराठवाड्यातील शेती आणि उद्योगांचा यथोचित विकास होऊ शकणार नाही, याची शंकररावजींना सार्थ जाणीव होती, म्हणून त्यांच्या प्रेरणेने दि. २६ ऑगस्ट १९७६ मराठवाड्यात ग्रामीण बँकेची स्थापना करण्यात आली. ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासासाठी जाणीवपूर्वक स्थापना करण्यात आलेली ही मराठवाड्यातीलच नव्हे तर सबंध महाराष्ट्रातील पहिली बँक होय. आता ही देशातील एक मोठी बँक म्हणून मान्यता पावली आहे. या बँकेने आतापर्यंत गरजू शेतकरी व सुशिक्षित बेकार यांना अल्पमुदतीचा व दीर्घमुदतीचा पतपुरवठा उपलब्ध करून दिल्यामुळे या भागात लहान-मोठे उद्योग उभे राहिले आहेत. शेतकऱ्यांना पीक कर्ज दिल्यामुळे शेतकरी तग धरून राहू शकला. शेतकऱ्यांच्या पिकांना विम्याची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे शेतकऱ्यांना संरक्षण मिळाले. सुशिक्षित बेकारांचा प्रश्न सोडविण्यासाठी मदत झाली. मराठवाड्याच्या विकासासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ हैदराबाद आणि देना बँक या बँकांची विभागीय

कार्यालये शंकररावांच्या प्रयत्नांमुळे मराठवाड्यात सुरू झाली. या बँकांचे जाळे विणले गेल्यामुळे मराठवाड्याच्या सामाजिक, आर्थिक, औद्योगिक आणि कृषिविषयक विकासाला चालना मिळाली, याचे श्रेय निःसंशय श्री शंकरराव चव्हाण यांच्याकडे जाते.

## आमदारांना प्रशिक्षण

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेले प्रतिनिधी किंवा विधानसभेत, विधानपरिषदेत नव्याने निवडून आलेले प्रतिनिधी यांना सभागृहात आपल्या विभागाचे प्रश्न पुरेशा परिणामकारकपणे मांडता येत नाहीत. याचे कारण आपण लोकशाही राज्यपद्धती स्वीकारली खरी, परंतु दुर्दैवाने आपल्याकडे लोकशाहीच्या शिक्षणाचा अभावच राहिलेला आहे. तसे कुणी जाणीवपूर्वक प्रयत्नही केलेले नव्हते. परंतु नव्याने निवडून आलेल्या आमदारांना सभागृहात निर्भयपणे बोलता यावे, अभ्यासूपणे विचार मांडता यावेत, धोरणात्मक निर्णयप्रक्रियेत आपला सहभाग नोंदवता आला पाहिजे यासाठी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाणांनी नवागत आमदारांना विधीमंडळाच्या कार्यपद्धतीचे प्रशिक्षण दिले. त्यांना कायदेमंडळातील प्रत्येक बारीकसारीक बाबींची माहिती दिली. स्वातंत्र्यानंतरच्या चाळीस वर्षात आमदारांना विधिमंडळ कार्यप्रणालीचे प्रशिक्षण देऊन त्यांना 'दक्ष लोकप्रतिनिधी' बनविणारे शंकरराव हे पहिले मुख्यमंत्री होत.

## शून्याधारित अर्थसंकल्प

शंकररावजी हे प्रवाहाविरुद्ध पोहणारे एक धाडसी मुख्यमंत्री होते. त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीत त्यांनी घेतलेले काही निर्णय विवाद्य ठरले, तर काही निर्णय त्यांच्या हितचिंतकांनी जाणीवपूर्वक विवाद्य ठरविले. शंकररावजींच्या काही धाडसी निर्णयांबद्दल काही विरोधकांनी जाणीवपूर्वक संशयाचे वातावरण निर्माण करून गैरसमज पसरविण्याचे प्रयत्नि केले. शून्याधारित अर्थसंकल्प (झीरो बजेट) हा सुद्धा शंकररावांनी घेतलेला निर्णय असाच वादग्रस्त ठरविण्यात आला. वास्तविक शून्यधारित अर्थसंकल्प ही मूळची अमेरिकेच्या अर्थकारणातील संकल्पना. शंकररावांनी अमेरिकेच्या दौऱ्यात या संकल्पनेचा बारकाईने अभ्यास केला आणि ही संकल्पना आपल्या देशात राबविता येईल काय याचा डोळसपणे विचार केला. शून्याधारित अर्थसंकल्प ही संकल्पना राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य होय. शंकररावांच्या या धोरणावर जरी टीका झाली असली तरी या योजनेमुळे शासकीय निधीची उधळपट्टी थांबली. कालबाह्य योजनांवर होणाऱ्या निरर्थक खर्चाला आळा बसला. राज्याच्या आर्थिक नुकसानीला पायबंद बसला आणि पर्यायाने राज्याची आर्थिक स्थिती मजबूत झाली. शून्याधारित अर्थसंकल्पाआधारे शासकीय निधीची उधळपट्टी आणि कालबाह्य योजनांवर होणारा खर्च थांबल्यामुळे

राज्याच्या तिजोरीत एक वर्षात शंभर कोटी रुपये जमा झाले. असा धाडसी निर्णय घेणारे शंकररावजी हे महाराष्ट्रातील पहिले मुख्यमंत्री ठरतात. या उदाहरणावरून शंकररावजींच्या आर्थिक धोरणांच्या अभ्यासूवृत्तीची साक्ष पटते.

## विद्यार्थ्यांची फी भरणारे मुख्यमंत्री

वसंतदादा पाटील यांच्या मुख्यमंत्री पदाच्या राजीनाम्यानंतर पक्षश्रेष्ठींनी मुख्यमंत्रीपदासाठी शिवाजीराव पाटील निलंगेकर यांची निवड केली. एका प्रकरणावरून निलंगेकरांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा घ्यावा लागला. अशा परिस्थितीत आता महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण ? असा प्रश्न पक्षश्रेष्ठींसमोर पडला. या काळात शंकररावजी भारताचे गृहमंत्री म्हणून केंद्र सरकारात सर्वोच्च् पदावर कार्यरत होते. पंजाब, काश्मीर आणि दहशतवादी कारवायांच्या समस्या सोडविण्यासाठी शंकररावजी प्रयत्न शील होते. पुन्हा दुसऱ्यांदा आपल्याला महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद स्वीकारावे लागेल, याची त्यांना कल्पनाही नव्हती आणि शंकरराव चव्हाणांशिवाय या पदासाठी पक्षश्रेष्ठींसमोर दुसरे सक्षम नाव नव्हते. म्हणून पक्षश्रेष्ठींनी शंकररावजींना दुसऱ्यांदा मुख्यमंत्रीपद स्वीकारण्याचा आदेश दिला. पक्षश्रेष्ठींचा आदेश शिरसावंद्य मानून शंकररावांनी दुसऱ्यांदा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारली. शंकररावांची एकमताने झालेली ही निवड त्यांच्या कर्तबगारीची पावती मानली जाते.

१९८६ मध्ये जेव्हा शंकररावजी दुसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले तेव्हा महाराष्ट्रात दुष्काळसदृश्य परिस्थिती होती. अशा परिस्थितीत सत्कार सोहळे स्वीकारणे शंकररावजींच्या समाजशील व संवेदनशील प्रकृतीला

मानवण्यासारखे नव्हते. कारण रयत दुष्काळात होरपळून निघत असताना स्वतः मिरवून घेणे शंकररावांना मुळीच आवडत नव्हते. म्हणून शंकररावांनी हितचिंतकांना आवाहन केले, ‘आपला सत्कार करण्यात खर्च करण्यापेक्षा टंचाई निवारण कार्यासाठी मुख्यमंत्री सहाय्य निधीला सढळ हाताने पैसा द्यावा.’ या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळाला. जमलेल्या निधीतून शंकररावांनी टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची परीक्षा फी देण्याची व्यवस्था केली. इतके शंकररावांचे प्रशासन लोकाभिमुख होते. शंकररावांनी राज्याचे मुख्यमंत्रिपद नव्हे तर जणू त्यांनी प्रजेचे पालकत्व स्वीकारले होते.

मे १९८६ पासून व्यवस्थापनाने एम्प्रेस मील बंद करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे सहा हजार कामगार बेकार बनले होते. शिवाय महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासातील एक महत्त्वाचा उपक्रम बंद पडल्यामुळे राज्याच्या औद्योगिक विकासाला खीळ बसली होती. हे दृष्टचक्र थांबविण्यासाठी शंकररावांनी एक धाडसी पाऊल उचलले. एम्प्रेस मीलचे राष्ट्रीयीकरण करण्याच निर्णय घेतला. या निर्णयामुळे सहा हजार कामगारांना रोजगार तर मिळालाच शिवाय औद्योगिक विकासाला चालना मिळाली. याच धर्तीवर त्यांनी जळगावच्या खानदेश मीलचे आणि मुंबईच्या श्रीनिवास मीलचेही राष्ट्रीयीकरण केले. शंकररावजींनी घेतलेला हा ऐतिहासिक निर्णय महाराष्ट्राच्या उद्योगक्षेत्रासाठी अत्यंत उपकारक ठरला.

## शिक्षणातील अपप्रवृत्तींवर प्रहार

प्राथमिक स्तरावर शिक्षण घेत असलेल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमधून स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून प्रज्ञावंत विद्यार्थी निवडून त्यांना विशेष शिक्षण देण्याची कल्पना पुढे आली. यातूनच १९८६ साली नवोदय विद्यालयांची कल्पना साकार झाली. पहिले नवोदय विद्यालय अमरावती येथे स्थापन झाले. पुढील काळात टप्प्याटप्प्याने विदर्भ, मराठवाडा आणि कोकण या भागात जवाहर नवोदय विद्यालय स्थापन झाले. नवोदय विद्यालयांच्या माध्यमातून प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना शोधून त्यांना स्वतंत्र असे निवासी शिक्षण दिल्यामुळे महाराष्ट्राचा शैक्षणिक स्तर उंचावण्यास हातभार लागला. याचे श्रेय शंकरराव चव्हाण यांच्याकडे जाते.

गरीब विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांसाठी देण्यात येणाऱ्या शासकीय अनुदानावर काही संस्थाचालक आपले उखळ पांढरे करून घेतात, हे संतापजनक दृश्य शंकररावजींच्या चाणाक्ष नजरेतून सुटू शकले नाही. अशा स्वार्थी संस्थाचालकांना त्यांनी पुढील शब्दात ठणकावले, "गरिबांच्या मुलांना शिक्षण घेता यावे याकरिता कोट्यवधी रुपयांचा खर्च आपण शिक्षणावर करीत असताना त्या मुलांना शिक्षण मिळत नसेल, वसतिगृहात चांगले जेवण मिळत नसेल तर ती बाब अतिशय गंभीर मानावी लागेल. आपले वर्ग न चालविता पैसा घेणे, वसतिगृहातील विद्यार्थ्यांची

संख्या वाढवून अनुदान घेणे, असले प्रकार शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रात चालविण्यासारखे दुसरे मोठे पाप नाही. शिक्षणक्षेत्रात राहून गरीब मुलांच्या जिवाशी खेळणाऱ्या मंडळींना मला आग्रहपूर्वक सांगायचे आहे की, कृपा करा आणि असले उद्योग या क्षेत्रात करू नका. गरिबांच्या नावाने दिलेल्या पैशाचा गैरवापर झाल्यास अत्यंत कठोर अशी उपाययोजना करावी लागेल. अशी वेळ आणू नका. केवळ शासनाची फसवणूक यामुळे होते असे नाही, तर आशेने शाळेत येणाऱ्या मुलांच्या जीवनाशी हा डाव आत्मघातकी असतो, याचीही जाणीव ठेवा."

## गर्भलिंगचिकित्सा व स्त्रीभ्रुण हत्याबंदी कायदा

आपल्या पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीला नेहमीच दुय्यम स्थान दिले जाते. मुलगा हा ‘वंशाचा दिवा’ तर मुलगी हे ‘परक्याचं धन’ ही आपल्याकडची लोकधारणा आहे. या सनातनी मानसिकतेमुळे आपल्या समाजात स्त्रीभ्रुणहत्त्येचे प्रमाण चिंताजनक वाढले आहे. भारतातील दर हजारी मुलींचे प्रमाण ९३३ आहे तर महाराष्ट्रात हेच प्रमाण ९२२ इतके कमी आहे. ‘वंशाचा दिवा’ म्हणून मुलगाच हवा या वेड्या अट्टाहासापायी समाजातील स्त्रियांचे प्रमाण भयप्रद पद्धतीने घटत चालले आहे. ही घसरण रोखण्यासाठी १९८८ मध्ये गर्भलिंगनिदान चाचणीवर महाराष्ट्रात कायद्याने बंदी घालण्यात आली. पुढे १९९४ मध्ये भारत सरकारने तो कायदा संमत केला. परंतु काळाची पावले ओळखून शंकररावांच्या नेतृत्वाखाली स्त्रीभ्रुणहत्येवर बंदी घालणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले पुरोगामी राज्य ठरते.

## वैधानिक विकास मंडळांना विरोध

महाराष्ट्रातील मागास भागांचा विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी शासनाने वैधानिक विकास मंडळे स्थापन करावीत याकरिता गोविंदभाई श्रॉफ यांच्यासह अन्य काही नेते आग्रही होते. परंतु अशा मंडळांच्या स्थापनेला शंकरराव चव्हाण यांचा आरंभापासून विरोध होता. या विरोधामागची आपली तात्त्विक भूमिका स्पष्ट करताना एका मुलाखतीत शंकररावजींनी तीन कारणे दिली आहेत.

एक : असे मंडळ अस्तित्वात आले तर त्यामुळे निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचे अधिकार जातील आणि त्या प्रदेशाच्या विकासासंबंधीचे सर्व अधिकार राज्यपालाच्या हाती केंद्रित होतील. म्हणजे प्रतिनिधींचे अधिकार बाजूला राहून एकाच व्यक्तीच्या हाती सत्तेचे केंद्रीकरण होईल. ब्रिटिशांच्या काळात अशी तरतूद करण्यात आली होती. त्यावेळी सगळे अधिकार गवर्नराच्या हाती केंद्रित होऊन लोकप्रतिनिधींच्या हाती मात्र काहीच सत्ता नसे. राज्यपालाने धोरण ठरवावयाचे आणि प्रतिनिधींनी त्यावर विधानसभेत फक्त चर्चा करावयाची, अशी परिस्थिती उद्भवेल. प्रतिनिधींना निर्णय घ्यायचा अधिकार उरणार नाही. निर्णय जर घेता येत नसेल तर प्रतिनिधींचा उपयोग काय? असा सवालही शंकररावांनी उपस्थित केला होता.

आपल्या राज्यघटनेची मूळ बैठक (बेसिक फ्रेमवर्क) लोकशाही प्रक्रिया चालू राहावी अशी आहे. अशा प्रक्रियेमध्ये

लोकप्रतिनिधींचे स्थान महत्त्वाचे आहे. अशा स्थितीत कोणत्याही तरतुदीमुळे असो किंवा मंडळामुळे असो, प्रतिनिधींचे सर्व अधिकार काढून घेणे हे घटनेच्या मूळ चौकटीत (फ्रेमवर्क) बसतच नाही, अशी शंकररावांची भूमिका होती.

या संदर्भातील तिसरी अडतण सांगताना शंकररावजी म्हणाले, की विधानसभेत राज्यपाल वादाचा विषय होता कामा नये. एकदा राज्यपालाला कार्यकारी अधिकार (एक्झिक्युटीव पावर) दिले म्हणजे विधानसभेत जे आरोप निवडलेल्या शासनावर केले जातात, ते आरोप राज्यपालावरही होऊ शकतात. पण अशावेळी राज्यपाल दोन्ही सभागृहांचा सभासद नसल्यामुळे त्या आक्षेपांना उत्तर देऊ शकत नाही. त्याला उत्तर द्यायला, आपले म्हणणे जाहीरपणे मांडायला जागाच (प्लॅटफॉर्म) नाही. असे करणे म्हणजे लोकशाहीच्या मूळ बैठकीलाच सुरूंग लावल्यासारखे नाही का? असा प्रश्न शंकररावांनी मांडला होता.

लोकाग्रहास्तव पुढे १९९३-९४ मध्ये वैधानिक मंडळांची रीतसर स्थापना झाली. त्याला शंकररावांनी विरोध केला नाही, परंतु आपली तात्त्विक भूमिकाही सोडली नाही. वैधानिक विकास मंडळांच्या स्थापनेनंतर दहा वर्षांनी म्हणजे २००४ मध्ये या मंडळांच्या कार्याचे मूल्यमापन करण्यासाठी केंद्रीय नियोजन आयोगाची एक समिती स्थापन केली होती. महाराष्ट्राच्या वैधानिक विकास मंडळांनी नियोजनप्रक्रियेत महत्त्वाचे बदल घडवून आणले असले तरी संतुलित प्रादेशिक विकास आणि सार्वजनिक निधीचा कार्यक्षम

उपयोग या उद्दिष्टांनी मंडळाच्या शिफारसी व भूमिका अनेकदा विसंगत होती, असे मत केंद्रीय योजना आयोगाच्या मूल्यमापन समितीने व्यक्तन केले. तसेच सन २००६ नंतर अनुशेषाचे सनियंत्रण (मॉनिटरिंग) आणि तो अद्ययावत करणे यासाठी ही मंडळे चालू ठेवण्यात येऊ नयेत, असे स्पष्ट प्रतिपादन या मूल्यमापन समितीने केले आहेत.

याचाच अर्थ असा, की वैधानिक विकास मंडळांच्या संबंधीची शंकररावजींची भूमिका ही कुण्या भाबड्या विरोधकाची भूमिका नव्हती तर लोकशाहीवादी डोळस नेत्याची ती दृढ भूमिका होती. मूल्यमापन समितीच्या या निष्कर्षांच्या कितीतरी वर्षे आधी शंकररावांनी घेतलेल्या भूमिकेवरून त्यांच्या दूरदर्शी अभ्यासूवृत्तीची प्रचिती येते.

शंकरराव चव्हाण यांनी १९८४ साली भारताचे गृहमंत्री म्हणून शपथ घेतली. १९८९ मध्ये ते दुसऱ्यांदा भारताचे गृहमंत्री झाले. १९९४ पर्यंत ते या पदावर कार्यरत होते. ज्या ज्या वेळी देश संकटात होता, अंतर्गत आणि बाह्य संकटांचा सामना करीत होता त्या त्या वेळी देशाने मराठी नेतृत्वाला आदरपूर्वक दिल्लीत आमंत्रित केले आहे. पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्त्येनंतर देशभर जातीय दंगली उसळली. शीख समाज या दंगलीत होरपळला जाऊ लागला. परिणामी देशाची अंतर्गत सुरक्षा धोक्यात आली होती. अशा परिस्थितीमध्ये राजीव गांधी यांची देशाच्या पंतप्रधानपदी निवड झाली आणि त्यांनी मोठ्या विश्वासाने गृहमंत्रीपदाची जबाबदारी शंकरराव चव्हाण यांच्यावर टाकली. ती त्यांनी लिलया पेलली.

## अनुशासन पर्वाचा अंत

काँग्रेसची केंद्रातील सत्ता गेल्यानंतर १९९७ पर्यंत शंकररावजी राज्यसभेचे सदस्य होते. या कालावधीत त्यांनी राज्यसभेतील कायदामंडळ सदस्य, मंत्रालय सल्लागार समितीचे सदस्य, व्यवसाय मार्गदर्शन परिषदेचे सदस्य, सामान्य प्रशासन समितीचे सदस्य आणि मानव संसाधन समितीचे सदस्य म्हणून काम पाहिले.

शंकररावांनी नांदेड येथील शारदा भवन शिक्षण संस्था आणि धर्माबाद शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागात शैक्षणिक क्रांती घडवून आणली. केलेल्या कामांच्या माध्यमातून शेतकरी व शेतमजुरांच्या चेहऱ्यावरचा आनंद त्यांनी अनुभवला. पुणे येथे मराठवाडा मित्र मंडळाच्या स्थापनेत पुढाकार घेऊन या संस्थेचा विकास घडवून आणला. पुणे येथील टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरूपदही त्यांनी भूषविले. नवी दिल्ली येथील भारत स्काऊट आणि गाईड संस्थेचे अध्यक्षपदही त्यांच्याकडे चालत आले. शंकररावांनी वेगवेगळ्या निमित्ताने इंग्लंड, अमेरिका, रशिया, फ्रान्स, मलेशिया, बल्गेरिया, मोरोक्को, बेल्जियम, सायप्रस, पोर्तुगाल, ग्रीस, वेस्ट इंडीज, चीन, स्वित्झर्लंड, जर्मनी, रूमानिया, कॅनडा, फिनलंड, इटाली इ. देशाचे अभ्यास दौरे केले.

जीवनाच्या वाटचालीत सौ. कुसुमताई ह्या शंकरराव नावाच्या हिमालयाची सावली बनून वावरत होत्या. या

दाम्पत्याला पाच मुली आणि दोन मुले अशी सात अपत्ये झाली. दुर्दैवाने मोठा मुलगा शिवाजी हा अल्पजीवी ठरला. शंकरराव आणि कुसुमताईंनी आपली कन्यारत्ने आणि सुपुत्र अशोकराव यांना शिक्षणाबरोबरच नीतिमूल्यांचे शाश्वत संस्कार दिले. निवडणूक म्हटली की जय-पराजय आलाच. दोन्ही परिस्थितीत मनाची स्थिरता ढळू न देण्याचे धडे दिले.

अशोकराव सलामीलाच नांदेड लोकसभा मतदारसंघातून खासदार झाले. पुढे मुदखेड मतदारसंघातून दोनवेळा आमदार झाले आणि आता राज्याचे कॅबिनेटमंत्री आहेत. समर्पित भावनेने समाजकार्य करण्याचा वडिलांचा वारसा ते तितक्याच निष्ठेने चालवित आहेत. शंकररावजींच्या पाचही सुकन्या आपापल्या संसारात सुखी आहेत.

शंकररावांच्या सहधर्मचारिणी सौ कुसुमताई यांचे दि. २७ फेब्रुवारी २००३ रोजी मुंबई येथे निधन झाले. जन्माच्या जोडीदाराने अशी साथ सोडल्यावर शंकररावजी मनाने विकल झाले. शंकररावांच्या कर्तृत्वाचा व धवल कीर्तीचा झेंडा आभाळभर पोचला होता. कुसुमताई ह्या त्या झेंड्याची भक्कम काठी होत्या. कमला नेहरूंच्या निधनानंतर पंडितजींची जी अवस्था झाली, वेणुताईंच्या निधनानंतर यशवंतराव चव्हाणांची जी अवस्था झाली अगदी तशीच अवस्था सौ. कुसुमताईंच्या निधनानंतर शंकररावजींची झाली. कुसुमताईंच्या वियोगाने शंकररावजींच्या आयुष्यातील सुगंधच हरवला जणू. वरून कर्तव्यकठोर व कणखर दिसणारे शंकररावजी कुसुमताईंच्या निर्वाणानंतर

कमालीचे एकाकी वाटत होते. ६६ वर्षांचा समर्पित सुखी संसार........ मिळून घेतलेले सुख-दुःखाचे अनुभव...... त्या आठवणींचा धूर शंकररावजींच्या मनात कोंदाटला असेल कदाचित! कन्या-पुत्राचे सांत्वन करणारे, त्यांना धीर देणारे शंकररावजी किती कुसुमकोमल अंतःकरणाचे आहेत, हे कुसुमताईंच्या निधनानंतर निकटवर्तीयांना जाणवत होते.

दि. १४ फेब्रुवारी २००४ रोजी मुंबई मुक्कामात शंकररावजी स्नानगृहात पाय घसरून पडल्याचे निमित्त झाले. वास्तविक एक वर्षापूर्वी सौ. कुसुमताईंच्या निधनानंतर शंकररावजी मनाने आधीच मोडून पडले होते....... आणि आता शरीराने! मेंदूत रक्ताची गाठ झाल्यामुळे उपचारासाठी त्यांना बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. दि. २० फेब्रुवारी रोजी शस्त्रक्रिया करून मेंदूतील रक्ताची गाठ काढण्यात डॉक्टरांना यश आले. तथापि शंकररावांची प्रकृती औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हती. त्यांना जीवनरक्षक यंत्रणेवर ठेवण्यात आले होते. बारा दिवस ते मृत्यूशी निकराने झुंज देत होते. उशापायथ्याला तज्ज्ञ डॉक्टरांचा ताफा उपचारासाठी सज्ज होता. सुपुत्र ना. अशोकराव आणि स्नुषा सौ. अमिताताई शंकररावजींना बरे करण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करीत होत्या. पण त्यात त्यांना यश आले नाही. अखेर दि. २६ फेब्रुवारी २००४ रोजी दुपारी ३-५५ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. एका निष्कलंक चारित्र्याचा व अनुशासन पर्वाचा अंत झाला. महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावरचा एक तेजस्वी तारा निखळला.

.......ही दुर्दैवी बातमी वाऱ्यासारखी महाराष्ट्रभर पसरली. शंकरराव चव्हाण यांचे पार्थिव मुंबईत त्यांचे सुपुत्र ना. अशोकराव चव्हाण यांच्या सागर या निवासस्थानी दि. २७ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत ठेवण्यात आले. त्यानंतर भारतीय वायुदलाच्या खास विमानाने शंकररावजींचे पार्थिव नांदेड येथे आणण्यात आले. आयटीएमच्या सभागृहात लाखो चाहत्यांनी शंकररावजींचे अंत्यदर्शन घेतले. अनेकांना आपल्या अश्रुंना आवर घालणे अशक्य झाले.

दि. २८ रोजी सकाळी आठ वाजता शिवाजीनगरमधील आनंदनिलयम बंगल्यावरून शंकररावजींची अंत्ययात्रा निघाली. आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप देण्यासाठी लाखोंचा जनसागर लोटला होता. यावेळी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, तत्कालीन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्यासह अनेक मंत्री, खासदार, आमदार व मान्यवर व्यक्ती उपस्थित होत्या.

सकाळी ११-३० वाजता शंकररावजींचे पार्थिव यशवंत महाविद्यालयाच्या प्रांगणातील फुलांनी सजविलेल्या ओट्यावर ठेवण्यात आले. वेदमंत्राच्या पठणात ना. अशोकरावांनी चितेस मंत्राग्नी दिला. संपूर्ण शासकीय इतमामात शंकररावजींच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. दि. २८ फेब्रुवारी २००३ रोजी सौ. कुसुमताईंच्या पार्थिवावर मुंबई येथे अंत्यसंस्कार करण्यात आले आणि बरोबर एक वर्षानंतर त्याच दिवशी म्हणजे २८

फेब्रुवारी २००४ रोजी शंकररावजी पंचतत्वात विलीन झाले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी व सामान्यजनांनी अश्रुचिंब नेत्रांनी या आधुनिक भगिरथाला भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. तत्कालीन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी नांदेडच्या विष्णुपुरी प्रकल्पाला 'शंकरराव चव्हाण विष्णुपुरी प्रकल्प' असे नाव देण्याची घोषणा केली.

.......चितेच्या ज्वाला आभाळाला भिडल्या. धरणीमातेने आपल्या लाडक्या लेकराला प्रेमाने आपल्या कुशीत घेतले. ना. अशोकराव, सौ. स्नेहलताताई, पुष्पाताई, शीलाताई, आशाताई, मंगलताई या भावंडांनीच नव्हे तर अख्या मराठवाड्याने पोरकेपण काय असते ते अनुभवले.

शंकररावजी हे पुट्टपर्थीच्या श्री सत्यसाईबाबांचे निःसीम भक्तस होते. त्यामुळे त्यांच्या आयुष्याला एक भक्कम असे नैतिक व अध्यात्मिक अधिष्ठान लाभले होते. त्यांचे व्यक्तीमत्त्व अतिशय प्रांजळ व संयमी होते. शंकररावांनी विविध सत्तापदांवरून केलेली निरलस राष्ट्रसेवा हा राष्ट्रसेवेचा मानदंड ठरला, इतकी ती महत्त्वाची व भरीव स्वरूपाची आहे. जायकवाडी प्रकल्प, विष्णुपुरी प्रकल्प, शारदा भवन शिक्षण संस्था, धर्माबाद शिक्षण संस्था, अंबाजोगाईचे स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय, नांदेडचे श्री गुरू गोविंदसिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालय आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ही शंकररावजींच्या कर्तबगारीची चिरंजीव उद्यममंदिरे आहेत आणि चिरंतन स्मारकेही आहेत. अभ्यासू, व्यासंगी, कार्यकुशल, कार्यक्षम,

सहिष्णू, शांत, समतोल आणि स्वच्छ अशा कार्यशैलीमुळे शंकररावजींचे प्रशासन अतिशय पारदर्शक झाले होते. त्यांनी आपल्या श्रद्धा व निष्ठांशी कधीच तडजोड केली नाही. निष्ठेचा धगधगता निखारा पदरात बांधून शंकररावजींनी खडतर राजकीय प्रवास केला, परंतु पदरही पेटू दिला नाही आणि निष्ठेचा निखाराही विझू दिला नाही. आजच्या घसरड्या आणि निसरड्या सभोवतालात असे निग्रही नेतृत्व दुर्मिळच!

शंकररावजींच्या निधनाने महाराष्ट्राच्या ५० वर्षांच्या सार्वजनिक जीवनातील सुवर्णकाळ संपला. एक युगकर्ता गेला. एक धवल चारित्र्याचे कणखर राजकीय नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले. १९४७ ते २००४ या कालखंडातील शंकररावजींचे सार्वजनिक जीवन हे एक सर्जनशील ध्यासपर्व होते. दि. २६ फेब्रुवारी २००४ रोजी या ध्यासपर्वाला पूर्णविराम मिळाला. शंकररावजी ८३ वर्षांचे तृप्ततेचे, मनाच्या समाधानाचे, कृतार्थतेचे व कृतज्ञतेचे अम्लान आयुष्य जगले आणि जगाला चुटपुट लावत त्यांनी या जगाचा निरोप घेतला.

# समारोप

जब आये थे तब मूँद गली पलक।
चले गये तब आँख खुली।।

असं आपलं आतापर्यंत अनेक विभूतीमत्त्वांच्या आणि व्यक्तिमत्त्वांच्या बाबतीत घडत आलं आहे. राम-कृष्णही यातून सुटले नाहीत. जेव्हा एखादे महान व्यक्तिनमत्त्व आपल्या सोबत असते, तेव्हा समाजाला त्या व्यक्तिमत्त्वाच्या महत्तेची कदर नसते. पण नंतर जेव्हा त्या व्यक्तीचे मोठेपण जाणवू लागते तेव्हा खूप उशीर झालेला असतो. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि भारताचे माजी केंद्रीय गृहमंत्री कै. शंकररावजी चव्हाण यांच्या बाबतीतही काहीसं असंच घडलेलं आहे. भगवान शंकराने समुद्रमंथनाच्या वेळी जे हलाहल निघाले ते स्वतः पचविले आणि अनमोल रत्नच इतरांना दिली. तद्वतच शंकरराव चव्हाणांनी उत्तुंग सामाजिक कार्य करीत असताना टीकेचे हलाहल पचविले आणि भावी पिढ्यांसाठी जलसिंचन प्रकल्पांच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या समृद्धीसाठी कल्पवृक्षांची लागवड केली.

## महाराष्ट्राच्या जलसंस्कृतीचे जनक

कुटुंबात कोणताही राजकीय वारस नसताना शंकररावजींनी शून्यातून विश्व निर्माण केले. त्यांच्या राजकीय कार्यकर्तृत्वाची कमान सदैव चढती-वाढती राहिली. लक्ष्मीबाई - भाऊराव हे माता - पिता, जेष्ठ बंधू नारायणराव आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या शाश्वत संस्कारांच्या मुशीतून शंकररावजींचे व्यक्तिमत्त्व घडले होते. महाराष्ट्राचे पाटबंधारे मंत्री आणि मुख्यमंत्री म्हणून त्यांनी जो ठसा महाराष्ट्राच्या पाटबंधारे क्षेत्रावर उमटविला तो काळालाही मिटविता येण्यासारखा नाही. शंकररावजींनी विविध लघु, मध्यम व मोठे पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करून कोरडवाहू शेतीत रात्रंदिवस राबराब राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या जीवनात हरितक्रांती घडविली. विष्णुपुरी प्रकल्प योजना आणि जायकवाडी प्रकल्प योजना ह्या तर जणू शंकररावांच्या मानसकन्याच आहेत. अनेक अडचणींवर मात करून शंकररावांनी हे पाटबंधारे प्रकल्प पूर्णत्वास नेले. या प्रकल्पांबरोबरच कोयना, वारणा, कन्हेर, दूधगंगा, तितरी, सूर्या, अप्पर वर्धा, पेंच, मनार, सिद्धेश्वहर, येलदरी, निम्न तेरणा, दुधना, अप्पर पैनगंगा, मांजरा, नांदूर मधमेश्वर, लेंडी, खडकवासला, इटियाडोह, पूर्णा, मुळा, काळमावाडी, गिरणा, घोड, सुखी इ. पाटबंधारे प्रकल्पांच्या कालव्यांतून वाहणारे पाणी शंकररावांच्या कर्तृत्वाची गाणी गात आहे. या क्षेत्रात त्यांनी जो अमीट असा ठसा उमटविला, हे प्रकल्प

सिद्धीस नेण्यासाठी शंकररावजींचे जे भगिरथ प्रयत्न केले, त्यामुळे शंकररावजी ‘आधुनिक भगिरथ’ म्हणून ओळखले जातात. महाराष्ट्राच्या ‘जलसंस्कृतीचे जनक’ असाही शंकररावजींचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात येतो. तो अगदी यथार्थ आहे.

पैठणचा जायकवाडी प्रकल्प होऊ नये यासाठी विरोधकांनी अगदी रान पेटविले होते. विरोधकांची शंकररावजींच्या खुनाचा प्रयत्नठ करण्यापर्यंत मजल गेली होती. शक्य तोपर्यंत विरोधकांना आपले विचार पटवून देऊन आणि शक्य नसेल तर विरोधकांचा विरोध पत्करून शंकररावजींनी ‘नाथसागर’ साकार केला. त्यावेळी या प्रकल्पाला विरोध करणाऱ्यांचे डोळे आता पन्नास वर्षांनी उघडले आहेत. परिसरातील शेतीला पाणीपुरवठा करण्याबरोबरच औरंगाबाद शहराला पिण्याचे पाणी आणि औद्योगिक क्षेत्रासाठीही पाणी याच नाथसागरातून पुरविले जाते. आज औरंगाबाद शहराचा जो औद्योगिक चेहरा मोहरा बदलून गेला आहे, त्या विकासाचे आद्य शिल्पकार खऱ्या अर्थाने शंकररावजीच ठरतात. जर विरोधकांच्या विरोधाला भीक घालून शंकररावजींनी जायकवाडी प्रकल्प निर्मितीचा प्रयत्न सोडून दिला असता तर आज पाण्याविना औरंगाबाद शहराची अवस्था काय झाली असती याची नुसती कल्पना केली तरी पुरे.

जायकवाडी आणि विष्णुपुरी प्रकल्प म्हणजे शंकररावांनी मराठवाड्याच्या तृषार्त मातीला बहाल केलेले दोन अमृतकुंभ आहेत, असे म्हटल्यास ते अतिशयोक्तीचे

ठरणार नाही. रान पेटविणे ही जशी क्रांती आहे तशीच रान भिजविणे हीसुद्धा एकप्रकारे क्रांतीच आहे. या अर्थाने शंकररावजींचे जलसिंचनाच्या क्षेत्रातील कार्य क्रांतिकारी ठरते.

शंकरराव चव्हाणांनी महाराष्ट्राच्या सिंचनक्षमतेचा इतका बारकाईने अभ्यास केला होता की, त्यांचा तो व्यासंग पाहून आंतरराष्ट्रीय कीर्तीचे इंजिनीअर व केंद्रीयमंत्री के.एल. राव हे देखील आश्चर्यचकित झाले होते. शंकररावजी जेव्हा मुख्यमंत्री झाले तेव्हा ना. शरद पवार हे त्यांच्या मंत्रिमंडळात मंत्री होते. त्यानंतर शंकररावजी मुख्यमंत्री पदावरून पायउतार झाल्यानंतर ना. शरद पवार हे मुख्यमंत्री झाले आणि त्यांच्या मंत्रिमंडळात शंकररावजी मंत्री म्हणून सहभागी झाले. त्यात त्यांनी कधीही आणि कुठेही कमीपणा मानला नाही. आपल्या मनाचा समतोलपणा ढळू दिला नाही. सभ्यता व सुजनता ही कधी सोडली नाही. आपल्याला अमुकच एक खाते हवे असा त्यांनी कधी आग्रहही धरला नाही. पक्षश्रेष्ठींच्या आदेशानुसार मंत्रिमंडळात जे खाते मिळेल त्याचा बारकाईने अभ्यास करायचा, त्या खात्यातील खाचाखोचा जाणून घ्यायच्या आणि आपल्या कार्यशीलतेने नोकरशाहीवर जरब ठेवायची, हा शंकररावजींचा खाक्या होता. भारताचे सरसेनापती जनरल करिअप्पा एकदा म्हणाले होते की, जर तुमच्याकडे मोटार असेल तर तुम्ही नुसती चालवायला शिकू नका तर मोटार दुरुस्त करायलासुद्धा शिका. जर तुम्ही तसे केले तर तुमचा ड्रायव्हर तुम्हाला फसवू शकणार नाही. सामान्यतः

सनदी नोकरवर्ग मंत्र्यांचे पाणी जोखतो आणि त्याला आपल्या इच्छेनुसार निर्णय घ्यायला भाग पाडतो. परंतु शंकररावजींचे असे नव्हते. ते ज्या खात्याचा कारभार स्वीकारत, त्या खात्याचा त्यांनी बारकाईने अभ्यास केलेला असल्यामुळे त्यांना चुकीचा सल्ला देण्याची कुणा सनदी अधिकाऱ्याची प्राज्ञा नसे. शंकररावजी हे एक संयत तरीही कडवे प्रशासक होते. त्यांनी आपल्या टिकाकारांना आपल्या कृतिशीलतेने वेळोवेळी चोख उत्तर दिले.

## निष्कलंक चारित्र्याचा हिमालय

महाराष्ट्राची विधानसभा, विधानपरिषद, लोकसभा आणि राज्यसभा या चारही प्रतिनिधीगृहांचे सन्माननीय सभासद राहिलेले आणि तेथून मंत्रिमंडळात जाणारे ना. शंकरराव चव्हाण हे एक आगळेवेगळे लोकप्रतिनिधी होते.

काही कमी काळाचा अपवाद वगळता शंकररावजी ५० वर्षे सत्तेत होते. कुणालाही हेवा वाटावा अशीच त्यांची राजकीय कारकीर्द होती. इतका दीर्घकाळ सत्तेत राहूनही शंकररावजींनी कधी सत्ता आपल्या डोक्यात चढू दिली नाही. सत्ता हे जनसेवेचे साधन मात्र आहे, तो शोभेचा अलंकार नाही, ही जाणीव त्यांनी आजन्म मनीमानसी बाळगली. 'सत्ता ही बहुजनहितार्थ राबवावी', हा स्वामी रामानंद तीर्थांनी दिलेला कानमंत्र शंकररावजींनी आयुष्याच्या अंतापर्यंत सांभाळला. ही सत्ता मिळवावी म्हणून शंकररावजींनी कधी मुद्दाम प्रयत्न केले नाहीत. लाजिरवाण्या खटपटी-लटपटी केल्या नाहीत. शंकररावजींचे नेतृत्वच असे विलक्षण होते की, ती पदे त्यांच्याकडे अक्षरशः चालत आली. प्रत्येक मराठी माणसाला भूषणावह वाटावी अशी शंकररावजींची उज्ज्वल कारकीर्द होती.

शंकररावांचे निष्कलंक चारित्र्य हेच त्यांचे अतिशय प्रभावी असे बलस्थान होते. या बलस्थानापुढे नतमस्तक होण्यासही अनेकांना धन्यता वाटत असे.

महाराष्ट्राच्या पाटबंधारे व कृषिक्षेत्राच्या विकासासाठी शंकररावजींनी केलेल्या अजोड कार्याची नोंद घेऊन परभणीच्या मराठवाडा कृषी विद्यापीठाने दि. २३-३-१९८६ रोजी त्यांना डॉक्टर ऑफ सायन्स ही मानद देऊन त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव केला.

दि. १० ऑगस्ट १९९४ रोजी दिल्ली येथे राष्ट्रीय स्तरावर ना. शंकरराव चव्हाण यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. त्यावेळी बोलताना तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी म्हणाले "नैतिकता हा मराठवाड्याच्या मातीचा गुण आहे. मनुष्यजन्म अतिदुर्लभ, त्यात आरोग्यदायी व जनसेवेसाठी खर्च झालेला जन्म अतिदुर्लभ आहे, असे आपला धर्म सांगतो. शंकररावांचे जीवन हे तसे आहे. त्यांना आजवर जी सत्तापदे प्राप्त, झाली त्यामागे त्यांची साधना आहे. त्यांच्या व्यक्तित्त्वात कठोर परिश्रम, सखोल अध्ययनशीलता आणि जाणकार प्रशासन कुशलता यांचा सुंदर असा त्रिवेणी संगम आहे. आज चोहीकडे जो अंधार दिसत आहे त्यात शंकररावांचे चारित्र्यपूर्ण जीवन हे एखाद्या दीपस्तंभासारखे आहे."

विरोधी पक्षातील राष्ट्रीय नेत्याकडून अशा शब्दात जाहीर गौरव व्हावा यातच शंकररावांच्या कार्यकर्तृत्वाची पावती मिळते.

## बोले तैसा चाले.....

शंकररावजींनी आपल्या राजकीय जीवनात जसे चांगले दिवस पाहिले तसे वाईट दिवसही पाहिले. सत्तेचे चांगले दिवस आले म्हणून शंकररावजी कधी उतले-मातले नाहीत किंवा सत्तेची खुर्ची दूर गेल्यावर शंकररावजी कधी खचले-पिचलेही नाहीत. हाती घेतलेला लोककल्याणाचा वसा आणि वारसा त्यांनी तहहयात चालविला. सत्ता असो अथवा नसो गोदाकाठचा हा राजयोगी सदोदित स्थितप्रज्ञ वृत्तीने जीवन जगत राहिला. आजच्या काळात काम कणभर आणि दंभ मणभर अशी राजकीय स्थिती निर्माण झाली आहे. अशा काळ्याकुट्ट पार्श्वभूमीवर शंकररावजी कधीच सवंग लोकप्रियतेच्या मागे धावले नाहीत. त्यांनी स्वतःचा वेगळा असा राजकीय पंथ किंवा संप्रदाय निर्माण केला नाही. उलट काँग्रेसच्या मुख्य विचारधारेशी त्यांनी नेहमी अव्यभिचारी निष्ठा बाळगली. मनाचा उमदेपणा आणि चित्ताची प्रसन्नता हे शंकररावजींच्या व्यक्तिमत्त्वाचे ठळक वैशिष्ट्य होते. जर एखादे काम होत असेल तर पाहू अन्यथा ते काम होणार नाही, इतक्या स्पष्टपणे ते सगळ्यांशी वागत असत. शक्य नसलेले काम करण्याचे खोटे आश्वासन देऊन शंकररावजींनी कधी कुणाला आपल्या भोवताली घुमवत ठेवले नाही.

या संदर्भात त्यांनी एकदा म्हटले होते, "व्यक्तीच्या बोलण्यातून आणि आचरणातून त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा

ठसा समाजावर उमटत असतो. समाजजीवनाशी ज्यांचा संबंध असतो अशा अधिकारी व पदाधिकाऱ्यांनी जनहिताची कामे करताना दिलेला प्रत्येक शब्द म्हणजे अलिखित वचन होय, असेच मानले पाहिजे. वचनपूर्तीकरिता परिश्रमाची पराकाष्ठा केली पाहिजे. मी स्वतः शब्द देण्याचे अतिशय कटाक्षाने टाळत असतो; कारण मी असे मानतो, की एक तर माणसाने शब्दच देऊ नये आणि द्यायचाच झाला तर तो पाळण्याची नैतिक जबाबदारी पूर्णपणे स्वीकारली पाहिजे. दिलेला शब्द कृतीने प्रत्यक्षात आणणे शक्य नसेल तर त्या ठिकाणी शब्द न देणेच अधिक श्रेयस्कर ठरते. कारण आपल्या शब्दाने जनतेच्या इच्छा अपेक्षा वाढवून नंतर त्यांची घोर निराशा करण्यापेक्षा शब्द न देणे हेच अधिक चांगले.”

लोकरंजनापेक्षा लोककल्याण हे शंकररावजींचे जीवितध्येय होते. त्यासाठी त्यांनी कधी खोटा लोकानुनय केला नाही. राजकीय पुढारी सामान्यतः निवडणुकीवर नजर ठेऊन वागतात-बोलतात. परंतु शंकररावजींनी निवडणुकीचा नव्हे तर पुढच्या अनेक पिढ्यांचा विचार करून निष्काम भावनेने रचनात्मक कार्य केले. म्हणून त्यांचे विरोधकसुद्धा त्यांच्याकडे कधी बोट दाखवू शकले नाहीत.

ना. मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना त्यांनी शंकरराव चव्हाण यांच्या अमृतमहोत्सवाचे औचित्य साधून महाराष्ट्र विधानभवनात त्यांचा हृद्य सत्कार घडवून आणला. त्यावेळी मनोहर जोशी आपल्या भाषणात म्हणाले होते, “ना. शंकरराव चव्हाण हे कधीच कोणाच्या पाठीत खंजीर खुपसत नाहीत. राजकारणाचा उपयोग त्यांनी संपत्ती गोळा

करण्यासाठी केला नाही. कोणत्याही अमिषाला ते कधी बळी पडले नाहीत. भ्रष्टाचारापासून दूर राहण्याचे कठीण व्रत चव्हाणांनी पाळले. शंकरराव चव्हाण हे चकाकणारे राष्ट्रीय नेते ठरतात, यात शंका नाही."

शंकरराव चव्हाण केंद्रीय मंत्री असताना भाजपाचे नेते सिकंदर बख्त राज्यसभेत विरोधी पक्षनेते होते. कविवृत्तीच्या सिकंदर बख्त यांनी एकदा म्हटले, "सरत चाललेल्या पिढीतील शंकरराव चव्हाण हा आशेचा किरण आहे. राज्यसभेत आमची नजरभेटच होत नाही तर आमची दिलं एकमेकांना भेटतात."

आपल्या पक्षातील नेत्या-कार्यकर्त्यांनी कौतुक करणे स्वाभाविक असते. परंतु सेना-भाजपच्या उपरोक्तन दोन नेत्यांनी काँग्रेसच्या शंकरराव चव्हाणांबद्दल असे गौरवोद्गार काढणे ही दुर्मिळ गोष्ट आहे.

शंकरराव चव्हाणांचे पाटबंधारे क्षेत्रातील कार्य पाहून पंडीत जवाहरलाल नेहरू एकदा म्हणाले होते की शंकररावांनी महाराष्ट्राला भारताच्या सिंचनाच्या नकाशावर ठळक स्थान मिळवून दिले आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शंकररावजींना दोन वेळा काम करण्याची संधी मिळाली. या संधीचे शंकररावांनी अक्षरशः सोने केले. महाराष्ट्राच्या प्रशासनाला शिस्त लावली. काही लोकांनी शंकररावजींना 'हेडमास्तर' असे दूषण दिले असले तरी ते भूषणावह ठरावे इतके निष्कलंक आणि अनुशासनपूर्ण चारित्र्य शंकररावजींना लाभले होते. आधुनिक महाराष्ट्राच्या

शिल्पकारांमध्ये शंकररावजींचे नाव अग्रक्रमाने आणि सुवर्णाक्षरांनी नोंदवावे लागेल.

काँग्रेसचे जेष्ठ नेते (कै.) माधवराव सिंदिया यांनी शंकरराव चव्हाणांच्या बाबतीत जे उद्गार काढले ते कुणाही मराठी माणसाला अभिमान वाटावा, त्याची छाती कृतार्थतेने फुलून यावी असेच आहे. ते म्हणतात, “महाराष्ट्र हे भारताला सदैव प्रेरणा देत आलेले राज्य आहे. याच महाराष्ट्रातून ना. शंकरराव चव्हाणांसारखे स्वच्छ चारित्र्याचे, कडक शिस्तीचे, गरिबांसाठी राजकारण करणारे नेते भारताला लाभले आहेत.”

ना. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री असताना पंतप्रधान इंदिरा गांधी दि. २२ फेब्रुवारी १९७६ रोजी तीन दिवसाच्या महाराष्ट्र दौऱ्यावर आल्या होत्या. त्यांनी पहिल्या दिवशी मुंबईच्या शिवाजी पार्कवर झालेल्या अभूतपूर्व सभेत अलोट जनसागरासमोर भाषण करताना ना. शंकरराव चव्हाणांच्या कार्याचा मुक्तपकंठाने गौरव केला, ही इतिहासाची साक्ष आहे.

शंकरराव चव्हाण त्यांच्यासमोर जी व्यक्ती उपस्थित नाही त्या व्यक्तीबद्दल सहसा बोलत नसत. यदाकदाचित बोलण्याचा प्रसंगच उद्भवला तर त्या व्यक्तीविषयी आदरणीय पातळीवरूनच बोलत असत. त्यांच्या बोलण्यात इतरांच्याविषयी कुचेष्टा, निंदाव्यंजकता किंवा मूल्यमापनात्मकता कधीच नसे. शंकररावजींच्या आहार-विहारात जसा संयम आणि शिस्त होती तशीच त्यांच्या आचार-विचारातसुद्धा संयम आणि शिस्त होती. त्यांच्या

आचार-विचारात दुर्लभ अशी शिस्तबद्धता, नेमकेपणा आणि काटेकोरपणा होता. त्यांच्या उक्ती आणि कृतीत अन्यत्र अभावानेच आढळणारी सुसंगती होती. शंकररावजींनी हयातीत डोंगराइतकी कामे केली. परंतु कधी त्या कामांचा गाजावाजा केला नाही किंवा स्टंटबाजीही केली नाही. आपले व्यक्तिगत स्तोम माजविण्याचा कधी अजाणतेपणीही प्रयत्न केला नाही. हे काम करत असताना त्यांनी कधी आपल्या निष्ठा व श्रद्धांशी तडजोडही केली नाही. शंकररावजींचे व्यक्तिमत्त्व, नेतृत्व आणि कर्तृत्व समाजाला सदैव समृद्धीची, सृजनशीलतेची, उद्यमशीलतेची आणि सुसंस्कारांची सदोदित प्रेरणा देत राहील.

## असा लोहपुरुष होणे नाही!

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे माजी अध्यक्ष तथा माजी पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव एकदा एका सार्वजनिक समारंभात भावोत्कट होऊन म्हणाले होते, "आजही काही गोष्टी परखडपणे सांगायच्या असतील तर मी शंकररावांना पुढे करीन. शब्द किती निखळ असतात हे अशा वेळी जाणवते. मनातल्या भावना शब्दात मांडता येत नाहीत. पण भावना शब्दात मांडाव्या लागतातच का? भावना या अनुभवाच्या असतात. आज माझ्या मनाची स्थिती तशीच झाली आहे. आज माझे मन आठवणीत गुंतले आहे. शंकररावांबरोबरच्या त्या आठवणी या अनेक वर्षे मागे नेतात. अगदी स्वामी रामानंद तीर्थांपासून ते चालू होते. आम्ही दोघे त्यांचे सचिव होतो. मी कुसुमताईंशी स्पर्धा करणार नाही, पण त्यांच्यानंतर माझाच नंबर लागेल. मी पंतप्रधान झालो तेव्हा राष्ट्रवादी अशा गृहमंत्र्याची मला गरज होती. शंकररावांना म्हणूनच गृहमंत्री केले."

दीर्घकाळ मित्र आणि मराठवाडा मुक्तिसंग्रामातील सहकारी राहिलेल्या व पुढे पंतप्रधान झालेल्या पी.व्ही. नरसिंहराव यांच्या वरील उद्गारावरून आपणास ना. शंकरराव चव्हाण यांच्या सत्यनिष्ठा, स्पष्टवक्तेपणा आणि राष्ट्रवादी वृत्तीचे प्रत्यंतर येते.

इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि पी.व्ही. नरसिंहराव या पंतप्रधानांच्या समवेत शंकररावजींना केंद्रात शिक्षणमंत्री,

नियोजनमंत्री, संरक्षणमंत्री, अर्थमंत्री, गृहमंत्री इ. खात्यांचे विश्वावसू मंत्री व निकटवर्ती सहकारी म्हणून काम करण्याची संधी मिळाली. गृहखात्याचे मंत्री म्हणून काम करताना शंकररावांनी जे कर्तव्यकठोर आणि धाडसी निर्णय घेतले, त्यामुळे त्यांच्या त्या कारकीर्दीची तुलना अनेकजण लोहपुरुष सरदार वल्लडभभाई पटेल यांच्या कारकीर्दीशी करतात. गृहमंत्री म्हणून शंकररावांनी काश्मीर प्रश्न, आसामचा प्रश्न, पंजाब मधील अतिरेकी कारवाया इ. नाजूक समस्या कौशल्याने सोडविल्या. शंकररावांनी जे विकासात्मक कार्य केले ते तालुका किंवा जिल्हा हा घटक नजरेसमोर ठेवून नव्हे किंवा एखादा विभाग किंवा प्रदेशाचा विकास करावा असाही त्यांचा संकुचित दृष्टिकोन नव्हता तर महाराष्ट्राचा आणि एकूणच राष्ट्राचा सर्वांगीण विकास व्हावा असा शंकररावांचा व्यापक दृष्टिकोन होता.

निजामाच्या सरंजामशाही संस्थानात राहिल्यामुळे मराठवाड्याच्या भाळी शतकानुशतकांचे मागासलेपण गोंदले गेले होते. अशा मागास भागात शंकररावजींनी पायाभूत सुविधांची पायाभरणी केली. त्यांनी उभारलेले प्रकल्प म्हणजे त्यांच्या कर्तबगारीची चिरंजीव उद्यम मंदिरे आहेत. शंकररावजींच्या प्रयत्नांमुळेच हा भूभाग आज सुबत्तेने सळसळतो आहे.

गोदातीरापासून यमुनातीरापर्यंतची शंकररावजींची राजकीय वाटचाल ही अनेक खाचखळग्यांनी भरलेली आहे. तरीसुद्धा भारताच्या राजकीय क्षितीजावर शंकररावजी आपल्या अंगभूत तेजाने तेजस्वी ताऱ्यासारखे तळपत

राहिले. ते दिवसातून अथक पंधरा-पंधरा तास काम करत असत. सामान्य माणूस हीच त्यांच्या कार्याची प्रेरणा होती. राज्यशकट सामान्यातिसामान्य माणसासाठी झिजला पाहिजे. अशा राज्यकारभारातून जर माणूसच वजा झाला तर त्या राज्यकारभाराला काडीइतकाही अर्थ उरणार नाही, अशी शंकररावजींची धारणा होती. त्या धारणेपोटीच हा बुद्धिवान, श्रद्धावान आणि कीर्तिवान कर्तबगार माणूस अहोरात्र कष्टत राहिला. कठोर आर्थिक शिस्तीशिवाय प्रशासनात बदल होणार नाही अशी त्यांची पक्कीण धारणा होती. म्हणून त्यांनी विश्वस्ताच्या भूमिकेतून सार्वजनिक पैशाचा विनियोग केला. कष्टकऱ्यांच्या घामातून उभ्या राहिलेल्या पैशातून एक पै सुद्धा वाया जाणार नाही, यासाठी शंकररावजी सदैव सतर्क राहिले. शंकररावजींचे ५० वर्षांचे सार्वजनिक व खाजगी जीवन एखाद्या आरशासारखे लख्ख होते. शंकररावजी कृतज्ञ आणि कृतार्थ आयुष्य जगले. अशी कृतार्थता आणि कृतज्ञता फार कमी लोकांना लाभते. अशा भाग्यवंतांपैकी शंकररावजी हे एक होते.

दि. १० ऑगस्ट १९९४ रोजी दिल्ली येथे तत्कालीन राष्ट्रपती शंकरदयाळ शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली ना. शंकरराव चव्हाण यांचा भव्य असा अमृतमहोत्सव साजरा करण्यात आला. या सोहळ्यात देशभरातील सर्वपक्षीय राष्ट्रीय नेते सहभागी झाले होते. यावेळी ना. चव्हाण यांच्या कार्याचा राष्ट्रपती शंकरदयाल शर्मा यांनी पुढील शब्दात गौरव केला, “कमलपत्राप्रमाणे सार्वजनिक जीवनीत वावरणारे शंकरराव चव्हाण हा राष्ट्राला प्रेरणा देणारा एक

आदर्श आहे. धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही हे स्वतंत्र भारताच्या वास्तूचे पायाचे दगड असून ना. चव्हाण यांनी सार्वजनिक जीवनात या मूल्यांचा सतत पाठपुरावा केला आहे. कमलपत्राप्रमाणे पाण्यात राहूनही भोवतालच्या घाणीपासून अलिप्तच असणारे शंकरराव चव्हाण हे एक अजात शत्रू व्यक्तियमत्त्व आहे. राज्यात व केंद्रात त्यांनी जी अनेक पदे भूषविली, तेथे त्यांनी आपल्या पदाचा ठसा उमटविला. ते राजकीय जीवनातील अनमोल जीवनमूल्यांचे प्रतिनिधित्व करणारे अजोड व्यक्तिमत्त्व आहे. म्हणूनच राष्ट्रपुरुषांच्या मालिकेमध्ये चव्हाणांचा क्रमांक लागतो.”

आपल्या देशाच्या सर्वोच्चय पदावरील महनीय व्यक्तीने केलेल्या या गौरवातून शंकरराव चव्हाण यांच्या अद्वितीय व्यक्तिकमत्त्वाची प्रचिती येते.

## विनम्र अभिवादन!

राजकारणात राहूनही शंकररावजींनी कमळपत्राप्रमाणे शुचिता सांभाळली. शंकररावजींचे व्यक्तित्व, नेतृत्व आणि कर्तृत्व हे या देशाला घवघवीत आणि तेजस्वी मापदंड ठरेल, सबंध राष्ट्राला ललामभूत ठरेल असे आहे. त्यांच्या निष्कलंक नेतृत्वाला आणि हिमालयासारख्या उत्तुंग कर्तृत्वाला विनम्र अभिवादन!

# संदर्भसूची


| | |
|---|---|
| १) | ‘कुसुमांजली’ (आत्मचरित्र) |
| | लेखिका : सौ. कुसुम शंकरराव चव्हाण |
| २) | प्रकाशक : श्री जयंत शहा, पुणे |
| ३) | ‘शंकरराव चव्हाण : जीवन व कार्य’ |
| ४) | लेखक : डॉ. उत्तम सावंत |
| ५) | प्रकाशक : निर्मल प्रकाशन, नांदेड |
| ६) | ‘गोदाकाठचा राजयोगी’ |
| ७) | संपादक : प्रा. उत्तम सूर्यवंशी |
| ८) | प्रकाशक : सचिव, धर्माबाद शिक्षण संस्था धर्माबाद |
| ९) | ‘भारताच्या राजकारणातील चारित्र्याचा हिमालय’ |
| १०) | संपादक : विकास कदम |
| ११) | प्रकाशक : बालाजी चव्हाण |
| १२) | सा. ‘मराठी स्वराज्य’ शंकरराव चव्हाण विशेषांक |
| १३) | संपादक : आनंद कल्याणकर |
| १४) | ‘मराठवाड्याचा विकास : दिशा आणि गती’ |
| १५) | संपादक : स.मा. गर्गे |
| १६) | प्रकाशक : डॉ. जे.जी. वाडेकर |
| १७) | ‘पाणीदार’ |
| १८) | लेखक : डॉ. सुधीर भोंगळे, |

| | |
|---|---|
| १९) | प्रकाशक : सुज्ञान प्रकाशन पुणे |
| २०) | ‘श्रद्धांजली’ दै. ‘सत्यप्रभा’ चा कै. शंकरराव चव्हाण विशेषांक, |
| २१) | संपादक : मधुकर भावे, |
| २२) | प्रकाशक : ओमप्रकाश चालिकवार |
| २३) | दै. ‘गावकरी’ दि. २७-२-२००४ |
| २४) | दै. ‘प्रजावाणी’ दि. २७-२-२००४ |
| २५) | दै. ‘सत्यप्रभा’ दि. २७-२-२००४ |

| | |
|---|---|
| २६) | दै. ‘सामना’ दि. २७-२-२००४ |
| २७) | दै. ‘एकमत’ दि. २७-२-२००४ |
| २८) | दै. ‘गोदातीर समाचार’ दि. २७-२-२००४ |
| २९) | दै. ‘देशोन्नती’ दि. २७-२-२००४ |
| ३०) | दै. ‘श्रमिक एकजूटे’ दि. २८-२-२००४ |
| ३१) | दै. ‘लोकमत टाईम्स’ दि. २८-२-२ ० ०४ |
| ३२) | दै. ‘महाराष्ट्र टाईम्स’ दि. २८-२-२००४ |
| ३३) | दै. ‘लोकसत्ता’ दि. २८ -२-२००४ |
| ३४) | दै. ‘सकाळ’ दि. २८-२-२००४ |
| ३५) | दै. ‘गावकरी’ दि. २८-२-२००४ |
| ३६) | दै. ‘देशोन्नती’ दि. २८-२-२००४ |
| ३७) | दै. ‘सत्यप्रभा’ दि. २८-२-२००४ |
| ३८) | दै. ‘देवगिरी तरुण भारत’ दि. २८-२-२००४ |
| ३९) | दै. ‘सामना’ दि. २८-२-२००४ |
| ४०) | दै. ‘लोकमत समाचार’ दि. २८-२-२००४ |
| ४१) | दै. ‘सत्यप्रभा दि. २९-२-२००४ |
| ४२) | दै. ‘देशोन्नती’ दि. २९-२-२००४ |
| ४३) | दै. ‘सत्यप्रभा’ दि.१ मार्च २००४ |
| ४४) | सा. ‘मराठी स्वराज्य’ दि. १ मार्च २००४ |
| ४५) | सा. ‘गोदा-प्रवरा’ दि. ९ मार्च २००४ |
| ४६) | सा. ‘नांदेड पत्रिका’ दि. १६-३-२००४ |